

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी २०१०। किंमत १५रु.



# मेहता पब्लिशिंग हाऊसची
# आगामी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | अनुवादक |
|---|---|---|
| **स्लमगर्ल ड्रिमिंग** | | |
| (रुबिना अली - माय जर्नी टू द स्टार्स) | | मैत्रेयी जोशी |
| **जिना** इंडिया - पार्टिशन - इनडिपेंडन्स | जसवंतसिंग | अशोक पाध्ये |
| **सीविच** | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये |
| **डिजिटल फॉर्ट्रेस** | डॅन ब्राऊन | अशोक पाध्ये |
| **लेट्स किल गांधी** | तुषार गांधी | अजित ठाकूर |
| **शांताराम** | ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अपर्णा वेलणकर |
| **बेटर इंडिया बेटर वर्ल्ड** | नारायण मूर्ती | चित्रा वाळिंबे |
| **विल द आयर्न...** | अरुण शौरी | कॅप्टन राजा लिमये |
| **रुसी मोदी :** | पार्थ मुखर्जी / | |
| **द मॅन हू ऑल्सो मेड स्टील** | ज्योती सबरवाल | अंजनी नरवणे |
| **उधाण वारा** | तसलिमा नासरिन | विलास गिते |
| **पिरॅमिड** | टॉम मार्टीन | उदय भिडे |
| **टेन फिंगर्स फॉर गॉड** | डोरोथी क्लर्क विल्सन | नीला चांदोरकर |
| **अनकंडिशनल लव्ह** | नतालिया आगिआनो/ | |
| | व्हॅनेसा होवार्ड | नीला चांदोरकर |
| **क्रायसिस** | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **नेक्स्ट** | मायकेल क्रायटन | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **क्रिटिकल** | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **द फर्म** | जॉन ग्रिशॅम | अनिल काळे |
| **वन शॉट** | ली चाइल्ड | बाळ भागवत |
| **नथिंग टू लूज** | ली चाइल्ड | उदय कुलकर्णी |
| **पिंक सारी** | मोई संपतपाल | सुप्रिया वकील |
| **मीरेच्या प्रेमतीर्थावर** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा एक वसंत आहे** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा - भाग ३** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा - भाग ४** | ओशो | स्वाती चांदोरकर |

◆ फेब्रुवारी २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक दुसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **वन नाईट ॲट द कॉल सेंटर :** | |
| अनु. सुप्रिया वकील | ५४ |
| **उष्ण जलोपचार :** अनु. सुभाष जोशी | ६२ |
| **तीन छोटे मासे :** अरुंधती महाम्बरे | ६८ |
| **द सिक्रेट सेव्हन :** | |
| अनु. प्रियंका कुलकर्णी | ७२ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ७८ |
| **पुरस्कार** | ८३ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९२ |
| **श्रद्धांजली** | ९८ |
| **बालनगरी** | १०० |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय



## डॉ. द. भि. कुलकर्णी यांचे अभिनंदन

पुणे येथे मार्च २०१०मध्ये होणाऱ्या ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नामवंत समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांची निवड झाल्याने त्यांच्या गेल्या साठ वर्षांतील वाङ्‌मयीन व्यासंगावर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाले आहे. साठोत्तरी काळातले एक अग्रगण्य वाङ्‌मयीन भाष्यकार म्हणून, समीक्षक म्हणून डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी समकालीन साहित्यातील महत्त्वपूर्ण कलाकृतींची आणि प्रतिभावंतांची नोंद घेत, त्यांच्या श्रेष्ठत्वाची नेमकी कारणमीमांसा करण्यावर भर दिला. स्वत:च्याच मनाचा आणि रसिकतेचा आंतरिक शोध घेत, त्या त्या कलावंताच्या किंवा कलाकृतीच्या स्वत:वर पडलेल्या प्रभावाचा उलगडा करीत राहणे, पुन:पुन्हा त्याची छाननी करीत अधिकाधिक खोलवर जात गाभ्यापर्यंत पोचणे, रूढ समीक्षात्मक संकल्पनांच्या पलीकडे जाऊन कलाकृतीच्या श्रेष्ठतेचे आणि निर्मितिप्रक्रियेचे अंत:स्तर स्पष्ट करण्यासाठी नव्या संकल्पनांची मांडणी करणे हा त्यांचा स्थायीभावच झाला. ज्ञानेश्वरी म्हणजे ज्ञानदेवांनी रसिकांशी साधलेला श्रोतृसंवाद ही कल्पना त्यांच्या मनात आल्याबरोबर ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांशी सलगी साधण्यासाठी केलल्या प्रयत्नांची उदाहरणे त्यांना जागोजाग विखुरलेली दिसतात आणि ज्ञानेश्वरांशी त्यांची जवळीक साधली जाते. ज्ञानेश्वरीतील सौंदर्य जाणून घेण्याची जणू एक नवी किल्लीच गवसल्याची भावना त्यांचा ठाव घेते. कविवर्य बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेने, समीक्षेने, सिद्धांतांनी संपूर्ण मराठी साहित्यक्षेत्रातच एक नवे पर्व निर्माण झाले हे सर्वच अभ्यासक मान्य करतात. परंतु मर्ढेकरांच्या साहित्याचे वेगळेपणच नव्हे तर मोठेपण कशात आहे, त्यांच्या सौंदर्यशास्त्राचे महत्त्व नेमके कशात आहे याची चिकित्सा करीत डॉ. द. भि. कुलकर्णी त्याची पुन:स्थापना करू पाहतात. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथा, विश्राम बेडेकरांची रणांगण ही कादंबरी, सुरेश भटांची कविता, शरच्चंद्र मुक्तिबोध-दिलीप चित्रे-पु. भा. भावे प्रभृतींचे लेखन हे सर्व त्यांना पुन:पुन्हा आस्वाद्य वाटते आणि प्रत्येक वाचनानंतर अधिक काहीतरी सांगत, सुचवत राहते. त्यामुळे पहिल्यांदा रणांगण, दुसऱ्यांदा रणांगण, तिसऱ्यांदा रणांगण, पहिली परंपरा, दुसरी परंपरा अशी त्यांची स्वत:च्याच आकलनाची टप्पेबाजी, युगांतर आणि युगान्त यासारखी निष्कर्षात्मक सीमाआखणी चालू राहते. आपल्या समीक्षामक ग्रह-

आग्रहांची त्यांची तपासणी अखंड चालू आहे आणि कांद्याचा एकेक पापुद्रा दूर करीत जावे तसा आपल्या आस्वादप्रक्रियेचा एकेक पापुद्रा दूर करीत ते गाभ्यापर्यंत, मूळ केंद्रापर्यंत पोचू पाहतात. जीएंच्या कथा आवडतात, त्या आपल्या अस्तित्वाला आव्हान देतात हे पहिल्याच वाचनात जाणवल्यावर, त्या नेमके काय गारूड आपल्यावर आणि वाचकांवर करतात याचा शोध द. भि. घेऊ लागतात. जीएंवर वेळोवेळी ते लिहीत राहिले. जीएंच्या प्रत्येक नव्या कथासंग्रहावर ते लिहीत राहिले. रूपककथांवर भाष्य करीत राहिले. महत्त्वाच्या कथांची आस्वादक चिकित्सा करीत राहिले... आपल्या पीएचडीच्या विद्यार्थ्यांना जीएंशी संबंधित विषय देत राहिले... सातत्याने चाललेल्या या चिंतन लेखनाचा संकलित, एकत्रित आविष्कार 'जीएंची महाकथा' या त्यांच्या ताज्या संकलित पुस्तकात प्रगट होतो, तेव्हा एका शोधयात्रेचा तो अंतिम टप्पा आहे हे लक्षात येते.

'जीएंच्या कथेने कादंबरीप्रमाणेच महाकाव्य प्रकाराचे धर्मही आत्मसात केले आहेत. कादंबरी, महाकाव्य आणि शोकनाट्य यांचे अनेक धर्म आत्मसात करूनही जीएंची कथा ही कथाच असते आणि ती 'जीएंची कथा' असते, या निष्कर्षापर्यंत दभि येतात. त्या संदर्भात त्यांनी केलेली विचारव्यूहाची मांडणी लक्षवेधक आहे. त्यांची काही विधाने येथे द्यावीशी वाटतात...

* मानवी जीवनासहच पशुपक्षी - भुतेखेते - देवदेवता, शाप-उ:शाप या समग्र अस्तित्वाचा उभा छेद (महाकाव्य गुण), अज्ञान-आसक्ती-दु:ख, ज्ञान (शोक-नाट्य गुण), पुनरावृत्त पूर्ववृत्तकथन (भावकाव्यगुण), मानसगोचर नेपथ्यस्वरूप परिसर चित्रण (नाट्यगुण), पात्र-प्रसंग-काळ यांची व्यामिश्रता (कादंबरी गुण), अंतिम अस्तित्वसूत्राचा शोध (ज्ञानशास्त्रगुण) इ. अनेक वैशिष्ट्ये जीएंच्या 'काजळमाया' या संग्रहातील कथांमध्ये एकवटलेली आहेत. त्यांचा सौंदर्यात्म, एकात्म प्रत्यय आला की जीएंच्या प्रतिभेची आणि निर्मितीची वाङ्मयीन महात्मता आपणास जाणवू लागते आणि आधुनिक मराठी वाङ्मयास जागतिक सांस्कृतिक क्षेत्रात नामाचेच नाही तर मानाचे पान मिळवून देण्यास हा देशी ग्रंथ पात्र आहे याबद्दल शंका उरत नाही. (जीएंची महाकथा ८४).
* जीएंच्या कथा म्हणजे महाकाव्याचे सर्ग असे म्हटले जाते, ते सत्यच आहे. परंतु अंतिमार्थाने बोलायचे झाले तर जीएंच्या कथांमध्ये महाकाव्यगुण ओतप्रोत भरलेला आहे. विशालता, भव्यता, वस्तुनिष्ठा, नि:पक्षपातीपणा, समग्र अस्तित्वाचा केवळ मानवी जीवनाचा नव्हे - उभा छेद, निरूपण कुशलता, सांस्कृतिक संचिताचे दर्शन ही महाकाव्य प्रकाराची ठळक वैशिष्ट्ये... त्यांच्या 'काजळमाया'मधील सर्व कथांमध्ये - विशेषत: ठिपका, गुलाम, कळसूत्र, रत्न व विदूषक कथा रूपककथांमध्ये आढळतात. म्हणूनच म्हणायचे

की जीएंच्या कथेने कादंबरीप्रकाराप्रमाणेच महाकाव्यप्रकाराचे धर्मही आत्मसात केले आहेत. (८०)

* जीएंच्या भावकथेने वाचकास केवळ भावनाप्रत्यय दिला असता तर त्यांना कुटुंबकथा, संसारकथा म्हणणे रास्त ठरले असते; परंतु भावनाप्रत्ययासहच जीएंच्या कथा एक तीव्र ज्ञानात्मक प्रत्ययही देत असते, हे जीएंचे असाधारण बलस्थान आहे. (८१)
* वैचारिकता आणि कल्पकता यांची अनेक विलसिते सर्व रूपककथांतून विखुरली आहेत. ही वैचारिकता निव्वळ तात्त्विक पातळीवरच राहते असे नाही. कधी तिला चतुरोक्तीचे स्वरूप येते. 'विदूषक' आणि 'गुलाम' या कथांमध्ये अशा चतुरोक्ती प्राचुर्याने आहेत. अशा चतुरोक्तीमुळे या रूपककथा अनेकदा विष्णू शर्मा, इसाप, बिरबल यांच्या परंपराकथांचे बळ आत्मसात करून जातात. (६७)
* रूपककथा लक्ष्यार्थप्रधान असतात तर प्रतीककथा व्यंग्यार्थप्रधान असतात. रूपककथेत वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ असतो तर प्रतीककथेत वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ असतो. रूपककथेतील वाच्य आणि लक्ष्य यांच्यात मूलत: द्वैत असते. त्यांचा परस्परसंबंध अलंकरण-अलंकार्य या स्वरूपाचा असतो. (६७)
* मानवी जीवनाकडे वस्तुनिष्ठ, निर्मम, आर्त आणि प्रतीकात्मक दृष्टीने पाहण्याचा आणि त्याच पातळीवर मानवी जीवनाचे चित्रण करण्याचा एक महत्त्वाचा महाकाव्यात्म गुणधर्म सोडवण, पराभव, राधी, माघारा या कथांमध्ये आढळतो. (५६)
* जीएंच्या सर्व कथा, त्यांतील सर्व अनुभूती, त्यांतील सर्व अंतिम सत्यरूपे यांचे माहेर जीएंचे मन आणि त्यांची पंचज्ञानेंद्रिये म्हणून त्यांची कथा प्रतीकात्मक अर्थ पेलूनही विचारजड, तर्कगम्य, निबंधवजा होत नाही; म्हणूनच त्यांच्या कथांवर संवेदना प्रतिमांची कांती दिसते. (५७)
* ही एककेंद्री, स्थिरकेंद्री कथा नव्हे, अनेककेंद्रीही कथा नव्हे, ही फिरत्या गतिशील केंद्राची कथा आहे. कादंबरीचे बळ घेऊनही कथा राहणारीच ही लघुकथा आहे. फिरत्या केंद्राचे हे आपले यश जीएंनी रक्तचंदनपर्यंत वाढतच ठेवले आहे. (३४)
* समग्र मराठी कथेचे गुणविशेष जीएंनी आपल्या कथासृष्टीत एकवटून टाकले हे त्यांचे अनन्यसाधारण कर्तृत्व आहे. दिवाकर कृष्णांची काव्यात्मकता, फडक्यांची तंत्रदक्षता, खांडेकरांचा बोधवाद, य. गो. जोश्यांची कौटुंबिकता, चोरघड्यांची तरलता, भाव्यांची उत्कटता, गाडगीळांची भ्रमनिरस्तता... या

साऱ्यांचे एकजीव रसायन जीए यांच्या कथासृष्टीत दिसेल. जीएंची कथा या अर्थाने सर्वसमावेशक कथा आहे. (३१)

* जीएपूर्व नवकथेने आपल्या लवचिक जिवंतपणाने कथा-लघुनिबंध, कथा-भावकाव्य, यांच्यातील अंतर पुसून टाकले होते, पण त्या नवकथेस कथा आणि कादंबरी यांच्यातील अंतर पुसता आले नव्हते; कादंबरीपुढे कथा धाकटीच वाटत होती... जीएंनी कथेला कादंबरीचा आवाका मिळवून दिला. केवळ दीर्घत्वामुळे नव्हे तर व्यामिश्रतेमुळे, एकेका पात्राशी वाचकास आपले आयडेंटिफिकेशन करावयास लावून... असे आयडेंटिफिकेशन कथाप्रकारात अपेक्षित नसते. (३१)
* जीएंनी साहित्यकृतीतील सामाजिक आशयाची मर्यादा दाखवून दिली... असामाजिक वृत्तीचा, नियतिवादाचा आणि अज्ञेयवादाचा निराशापूर्ण गौरव केला. या अर्थाने जीऐ निश्चयाने प्रतिगामी जीवनदृष्टीचे लेखक होते. पण त्यांच्या कथांतील अनुभवाचा कस, त्यांतील घटकांचा परस्परसंबंध इतका अस्सल, कलात्मक होता की सामाजिक आशयाची पताका खांद्यावर घेतलेल्या टीकाकारांनाही त्यांच्यावर टीका करण्याचे धैर्य झाले नाही. ते ऐतिहासिक नियतीची आणि क्रांतीच्या क्षणांची वाट बघत बसले. (३१)

डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे स्वरूप टिपणात्मक आहे असे म्हटले जाते. ते स्वत:ही समीक्षा ही टिपणात्मकच असते असे मानतात आणि आपल्या लेखनाचे समर्थन करतात. परंतु वेळोवेळी लिहिलेल्या स्फुट लेखनातून 'जीएंची महाकथा' यासारखा एक संपूर्ण विचारव्यूह सिद्ध होऊ शकतो हे लक्षात घ्यायला हवे. खुद्द दभिंच्याही हे लक्षात आले आहे. त्यामुळेच आपल्या पूर्वप्रसिद्ध लेखांची विषयवार मांडणी करून कादंबरी-स्वरूप आणि समीक्षा, महाकाव्य-स्वरूप आणि समीक्षा, नाटक-स्वरूप आणि समीक्षा, सुरेश भट-नवे आकलन, प्रतीतिविश्रांती ज्ञानेदवांची वगैरे पुस्तके त्यांनी सिद्ध केली आहेत. ती अभ्यासकांची सोय साधणारी आहेत. साहित्याबद्दलची आपली जाण आणि आस्था अधिक डोळस व अंतर्भेदक होण्याच्या दृष्टीने दभिंची समीक्षा महत्त्वपूर्ण आहे यात शंकाच नाही.

डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या अध्यक्षीय भाषणात नवे विचार आणि चिंतन निश्चित असेल अशी खात्री वाटते. त्यांच्या अध्यक्षतेखाली होणारे अ. भा. मराठी साहित्य संमेलन संस्मरणीय व्हावे हीच अपेक्षा.



T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# T बुक क्लब १८


## सभासद फी ५०रु.
## आजच सभासद व्हा!

**जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद आणि तेही निम्म्या किमतीत! एका क्लबमध्ये ६ पुस्तके**

## टी बुक क्लब १८ मधील उपलब्ध पुस्तके

**पहिले पुस्तक**

### डिसेप्शन पॉईंट




**डॅन ब्राऊन** । अनु. अशोक पाध्ये

कधीतरी एक उल्का उत्तर ध्रुवाजवळच्या बर्फात घुसली. आणि तेथून सुरू झालं एक चमत्कारिक नाट्य!

थरार, पाठलाग, हत्या! सत्य हे वेगळेच होते. मेंदूला मुंग्या आणणारी डॅन ब्राऊनची थरारक कादंबरी!

**५००रु. सभासदांना २५०रु. पोस्टेज ३०रु.**

**दुसरे पुस्तक**

### द ॲटर्नी





**स्टीव्ह मार्टिनी** । अनु. अजित ठाकूर

प्रसिद्ध लेखक स्टीव्ह मार्टिनी यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रमी खप झालेली नवीन रोमांचक न्यायालयीन रहस्यकथा.

**३५०रु. सभासदांना १७५रु. पोस्टेज ३०रु.**

## तिसरे पुस्तक




# क्रायसिस


मूळ लेखक
**डॉ. रॉबिन कुक**

अनुवाद
**डॉ. प्रमोद जोगळेकर**

हलगर्जीपणाने रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याबद्दल क्रेग बोमन या अतिशय निष्णात हृदयरोगतज्ज्ञावर, खटला सुरू होतो. लग्न अवघ्या दोन दिवसांवर आलं असताना केवळ बहिणीचा संसार वाचावा म्हणून जॅक स्टेपलटन सत्य उघडकीस आणण्यासाठी पुढे येतो. अनेक महिन्यांपूर्वी दफन केलेल्या मृतदेहाचं शवविच्छेदन करण्याचा धाडसी निर्णय घेतो. जिवावर उदार होऊन जॅक हे काम पार पाडतो. पण त्यामधून बाहेर आलेलं सत्य फारच भयंकर निघतं.

**३५०रु. टी बुक क्लब सभासदांना १७५रु.**
**पोस्टेज ३०रु.**

## टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारी पुस्तके




# द फर्म

**जॉन ग्रिशॅम**

अनु. अनिल काळे

**एक माफिया फॅमिली :**

विविध प्रकारच्या गुन्ह्यांमधून जमवलेला प्रचंड काळा पैसा पांढरा करणारी...

त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारी...

**एका वकिलांची फर्म :**

माफिया फॅमिलीचा सभ्य धुवट चेहरा असलेली...

फॅमिलीच्या काळ्या पैशाचं बेमालूमपणे 'शुद्धीकरण' करणारी...

**एक वकील :**


नुकताच शिक्षण घेऊन बाहेर पडलेला अत्यंत हुशार, चलाख तरुण फर्ममध्ये नोकरी मिळवतो. त्याला आणि त्याच्या सुंदर बायकोला स्वप्नं पडतात ती फक्त उज्ज्वल भविष्यकाळ, भरपूर पैसा, बीएमडब्ल्यू... यांची.

प्रत्यक्षात मात्र दोघंही

एकीकडे माफिया फॅमिली, तर दुसरीकडे एफबीआय,

अशा कात्रीत सापडतात...


आणि जीव वाचवण्यासाठी पळत सुटतात... दिशा मिळेल तिकडे.




# वन शॉट

**ली चाइल्ड**
अनु. बाळ भागवत

सहा शॉट्स. पाच ठार.
काही तासांत बिनतोड पुराव्याच्या आधारावर
गुन्हेगाराला अटक होते, पण तो तोंडातून अक्षर काढत नाही.
खूप प्रयत्नांनंतर तो बोलतो, 'तुम्ही चुकीच्या माणसाला पकडले आहे...
माझ्यासाठी जॅक रीचरला बोलवा.'
रीचर तेरा वर्षे मिलिटरी पोलीस असतो. तपास करण्यात, माग काढण्यात तरबेज. त्याला अडकवण्यासाठी निरपराध व्यक्तीचा खून करण्यापर्यंत मजल जाते. संतापलेला रीचर बचाव पक्षाच्या तरुण आणि सुंदर वकिलाला घेऊन खरा गुन्हेगार शोधायला लागतो.
गोळीचे उत्तर गोळीनेच द्यायला हवे हे त्याला ठाऊक असते.
जॅक रीचरचा शोध घेणे सोपे नसते.
पण टी.व्ही.वरच्या बातम्या बघून रीचरची
खात्री पटते की काहीतरी घोटाळा आहे.
गुन्हेगार हा लष्करातला नेमबाज असताना त्याचा शॉट चुकलाच कसा?
आणि शहरात पोहोचल्यावर आपले या शहरातले अस्तित्व कुणाला तरी खुपते आहे हे रीचरच्या लक्षात येते.





# नेक्स्ट

**मायकेल क्रायटन**
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

कर्करोगाच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांच्या पेशी मिळवून
त्या विद्यापीठाला विकणारा डॉक्टर.
या पेशींच्या मालकीसाठी काहीही करायला तयार
असणारे उद्योगपती आणि मतलबी प्राध्यापक.
चिम्पँझी मादीच्या जनुकसंचात स्वत:चेच जनुक मिसळून बेकायदेशीररीत्या
'ह्यूमंझी' बनवणारा बेजबाबदार जीवशास्त्रज्ञ.
धर्म आणि विज्ञान यांची चलाखीनं सरमिसळ करणारा, आपल्या विद्यार्थ्यांचं
संशोधन चोरणारा आणि राजकारणात राजकारण्यांनाही मागे टाकणारा शास्त्रज्ञ
रॉबर्ट बेलार्मिनो.
स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी कोणत्याही थराला
जाणारे प्रसिद्धी माध्यमांचे लोक.
या सगळ्या काळ्या पार्श्वभूमीवर मनोरंजन करणारा आणि
गणित सोडवणारा बुद्धिमान पोपट....
या सगळ्यातून तयार होते प्रश्नांची मोठी मालिका.
उत्तरं नसलेले, अस्वस्थ करणारे प्रश्न....
मन मानेल ते करायला सज्ज असणारं आजचं जीवशास्त्र पाहता
पुढे काय होणार?

## आगामी

# गर्ल्स ऑफ रियाध




**रजा अल्सानिया**

अनुवाद
**स्नेहल जोशी**

शुक्रवारची प्रार्थना संपल्यावर एक ई-मेल ऑनलाईन नेटवर्कवरील सदस्यांत प्रसारित केली जाते.

रियाधमधील विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या गाम्राह, मिचैल्ली, सादीम आणि लामीस या चार उच्च स्तरीय विद्यार्थिनींच्या आयुष्यातील विदारक वास्तव वर्षभराच्या कालावधीत समोर येते.

एकीकडे स्वातंत्र्याची ओढ आणि दुसरीकडे सनातनी वातावरण यात अडकलेल्या या मुली आहेत. या पेचातून त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या नकळत केलेले डेटिंग, अनुभवलेले शहरी जगणे, सेक्स आणि यातून त्यांच्या आयुष्याची झालेली घुसमट आपल्यासमोर येते.

ह्या चार तरुणींना सामाजिक, प्रेमविषयक, व्यावसायिक आणि लैंगिक दु:खांना तोंड द्यावे लागते. अजूनही जुन्या पद्धतीने जगणाऱ्या समाजात वाढत असताना, न संपणाऱ्या सांस्कृतिक मतभेदांना सामोरे जावे लागते.

या तरुण सौदी स्त्रियांच्या गुंतागुंतीच्या जीवनातून प्रकटलेली एक अविस्मरणीय जाणीव म्हणजे 'गर्ल्स ऑफ रियाध'!

# साहित्यवार्ता

*** सातारा ग्रंथ महोत्सव**

बा. सी. मर्ढेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या नावाने जिल्हा परिषदेच्या मैदानावर उभारलेल्या साहित्यनगरीत सुरू झालेल्या ग्रंथमहोत्सवाने एकप्रकारे ऐतिहासिक अजिंक्यताऱ्याच्या साक्षीने साताऱ्यात 'पुस्तकांचे गाव'च बहरल्याचे दिसून साहित्यिक, साहित्यप्रेमी व विद्यार्थी, शिक्षकांच्या उपस्थितीने आणि विविध साहित्य, सांस्कृतिक व कलाविषयक उपक्रमांनी गजबजलेली ही अक्षरसंस्कृती आता तपपूर्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. वाचनसंस्कृती वाढीस लागावी यासाठी ११ वर्षांपूर्वी सुरू झालेला व 'सातारा पॅटर्न' अशी ओळख असणारा जिल्हा ग्रंथमहोत्सव ८ ते ११ जानेवारी दरम्यान साजरा झाला. या महोत्सवात विविध साहित्यिक, सांस्कृतिक, कलाविषयक कार्यक्रमांची रेलचेल होती.

ग्रंथ दिंडीने महोत्सवाची सुरवात झाली. विविध चित्ररथ असलेल्या या दिंडीचा प्रारंभ गांधी मैदानावरून झाला. या महोत्सवात राज्याच्या विविध भागातील प्रकाशन संस्था, ग्रंथविक्रेत्यांचे एकूण १०० हून अधिक स्टॉल आले आहेत. यामध्ये विशेषत: नवनीत, मेहता पब्लिकेशन, संस्कृती प्रकाशन, किताब कॉर्नर श्रीज्योती स्टोअर्स आदी प्रकाशन संस्था सहभागी झाल्या आहेत. दर वर्षीच्या स्टॉलमध्ये वितरकांची संख्या मोठी असते; मात्र यंदा स्वत:हून आलेल्या प्रकाशकांची संख्या अधिक असल्याचे दिसून आले. मान्यवरांची व्याख्याने, निमंत्रितांचे कविसंमेलन, बालवाचक मेळावा, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले होते.

*** समीक्षकांनी मर्ढेकरांना न्याय दिला नाही.**

कवी बा. सी. मर्ढेकर यांनी काव्याचा तमाशा केला नाही. स्वत:ची कविता कधी वाचली नाही. मराठी रसिकांच्या मनात जिवंतपणा आणला. त्यांच्यावर दीडशे लोकांनी ग्रंथलेखन केले असले तरी अस्वादकांची ती केवळ अफवा आहे. मराठी समीक्षकांनी त्यांना अद्याप न्याय दिलेला नाही, असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. आनंद पाटील यांनी व्यक्त केले.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवात जन्मशताब्दी निमित्ताने 'आठवणी साहित्यिकांच्या' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक व ग्रंथमहोत्सव समितीचे अध्यक्ष

शंकर सारडा अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे यांनी प्रभाकर पाध्ये यांच्या तर प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांनी ग. ल. ठोकळ, बा. भ. बोरकर व ना. घ. देशपांडे आणि मधू नेने यांनी पु. भा. भावे यांच्या आठवणी कथन केल्या.

डॉ. आनंद पाटील म्हणाले, मर्ढेकर जन्मशताब्दी हा हौशा-गवशांचा उत्सव झाला आहे. 'ओल्या पिंपात मेले उंदीर' या कवितेवर २५० पानांचे पुस्तक आले आहे. हा प्रकार अजब आहे. मर्ढेकरांनी उंदरावरच्या ६ कविता इंग्रजीत लिहिल्या. हे उंदीर बेळगावचे, जळगावचे की इंग्लंडचे? मर्ढेकरांच्यावर अश्लीलतेचा खटला चालवला गेला. पण या प्रकारात त्यांनी माफी मागितलेली नाही. या प्रकरणावर एम. फील, पीएच.डी. होत नाही, अलीकडे बीज नसलेले बीज भाषण देण्यात येते तर वर्णन नसलेले प्रवासवर्णन प्रसिद्ध होत आहे. मनोरंजनाच्या अफूच्या साहित्याने मराठी माणसांना अपंग केले जात आहे, अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सदा डुंबरे यांनी प्रभाकर पाध्ये यांच्या आठवणी सांगितल्या. पाध्ये आणि त्यांचे समकालीन बा. सी. मर्ढेकर, रा. भा. पाटणकर या तिघांचे मराठी साहित्याच्या वाङ्मयीन इतिहासात मोठे योगदान आहे. सौंदर्यशास्त्राची पायाभरणी प्रभाकर पाध्ये यांनी असे सांगितले.

प्रभाकर पाध्ये इंटलेक्च्युअल प्रतिभावंत पत्रकार होते. त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याची व नैतिकतेची रुजवणूक केली. बौद्धिक दहशतवादी अशी त्यांची प्रतिमा होती. विचारवंतांची मोठी परंपरा असलेल्या सामाजिक राजकीय सळसळत्या कालखंडात महाराष्ट्राला मोठे करणाऱ्या नक्षत्रांमध्ये त्यांचा समावेश करावा लागेल. बौद्धिक तल्लखता तसेच जयप्रकाश नारायण, पंडित नेहरू अशा महान नेत्यांशी थेट संवाद असतानाही त्यांनी कोणताही अभिनिवेश बाळगला नाही. ती कवचकुंडले बाहेर ठेवूनच त्यांनी पत्रकारितेतील मूल्ये जपत अनेकांची वैचारिक कारकीर्द घडविली आहे. सामान्य लोकांचा आवाज, परिवर्तनाचे माध्यम असलेला लोकशाहीचा चौथा स्तंभ आज लोकशाहीलाच धमकावत असून, इतर उद्योगातील वस्तूप्रमाणे वृत्तपत्राची जागाच विकत असल्याचे सदा डुंबरे यांनी सांगितले. पत्रकारितेत संघर्ष करण्याचे, वेगळे मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य जपण्यास प्रभाकर पाध्ये यांनी शिकवले. ते उत्तम कथाकादंबरीकार, ललित लेखक, समीक्षक होते. त्यांची अत्यंत आक्रमक, ओजस्वी, धारदार शैली आकर्षित करणार होती, असे त्यांनी सांगितले.

प्रा. इंद्रजित भालेराव यांनी ना. घ. देशपांडे हे सर्वात लोकप्रिय कवी होते. त्यांनी एकदाच गद्य लिहिले; ते कवितेसंबंधी होते. नव्या पिढीतील कवींनी त्यांच्या कविता गाव्यात असे सांगून त्यांनी स्वत: त्यांच्या कविता म्हणून दाखवल्या. बोरकर, ग. ल. ठोकळ हे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहिले, पण शंकरराव खरात यांच्याकडून पराभव झाल्याचे जिव्हारी लागून ६ महिन्यांत त्यांचे निधन झाले,

अशी खंत व्यक्त करून अध्यक्षपदाची निवडणूक घेताना या गोष्टींचा वाङ्मयीन क्षेत्रातील लोकांनी विचार करावा, असे प्रा. भालेराव यांनी सुचविले. देशपांडे यांनी विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करण्यासाठी त्यांच्या मेहेकर गावी संमेलन भरवावे लागल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

शंकर सारडा यांनी सन १९०९ व १९१० मध्ये जन्म झालेल्या प्रमुख साहित्यिकांची माहिती सांगून त्यांच्या योगदानाचे स्मरण व्हावे यासाठी हा कार्यक्रम घेतल्याचे विशद केले.

*** 'ग्रंथाली ३५, गांगल ७०'**

''ग्रंथाली ही चळवळ सर्व समविचारी माणसांनी एकत्र येऊन सुरू केली. त्याकाळी आम्ही सर्वजण पत्रकारितेत होतो. जग जाणून घेण्याची आकांक्षा सर्वांना होती. त्यावेळच्या राजकारणाबद्दल जाणून घेण्याची इच्छा होती. त्याचबरोबर पुस्तक हे माध्यम प्रभावी असल्याचीही आम्हा सर्वांची भावना होती. त्यावेळी तेच एक माध्यम उपलब्ध होते. त्यावेळी प्रत्येक व्यक्तीच्या हाती पुस्तक असावे अशा भावनेतून 'ग्रंथाली'चा उदय झाला,'' असे 'ग्रंथाली वाचक चळवळी'चे संस्थापक दिनकर गांगल यांनी सांगितले. 'ग्रंथाली'या चळवळीला ३५ वर्षे व या चळवळीचे प्रवर्तक दिनकर गांगल यांना ७० वर्षे पूर्ण होण्याचा योग यंदाच्या वाचकदिनी जुळून आला.

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते दिनकर गांगल यांचा सत्कार करण्यात आला. ते म्हणाले की, नावात 'ग' असूनही 'ग' ची बाधा नसलेला हा माणूस आहे. 'ग्रंथाली'ने वाचनाची चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात तर रुजवलीच, पण दलित साहित्याला व लेखकांना प्रोत्साहन देऊन ब्राह्मण आणि दलित यांच्यातील दरी कमी करण्याचे कामही केले. 'ग्रंथाली ३५, गांगल ७०' या ग्रंथाचे प्रकाशन सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले की, महाराष्ट्राचा इतिहास 'ग्रंथाली' व गांगल यांनी आपल्यासमोर ठेवला आहे. महाराष्ट्रात वाचनाची चळवळ होती, पण ती एका मर्यादेपर्यंत होती. 'ग्रंथाली' ची ग्रंथयात्रा घेऊन गांगल खेडोपाडी गेले. त्यातून लेखक तयार झाले. या पुस्तकासाठी 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. 'ग्रंथाली' ही केवळ साहित्याची चळवळ नसून ती सामाजिक चळवळ आहे. महाराष्ट्रात अनेक जुने ग्रंथ आहेत. ते प्रकाशित होणे गरजेचे आहे व यासाठी सारस्वत बँकेतर्फे एक रुपया व्याजाने कर्ज देण्याची घोषणा एकनाथ ठाकूर यांनी यावेळी केली. दिनकर गांगल यांच्या पत्नी अनुराधा गांगल यावेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

प्रकाश चव्हाण यांचे 'उदई', सुधीर व नंदिनी थत्ते यांचे 'नोबेलनगरीतील

नवलस्वप्ने', भगवान इंगळे यांचे 'भिडू' ही पुस्तके व गोविंद काजरेकर यांचे 'उरल्या सुरल्या जगण्याचं रिमिक्स', अंजली कुलकर्णी यांचे 'बदलत गेलेली सही', शंकरराव दिघे यांचे 'या शतकाचा सात-बाराच होईल कोरा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य केंकरे व उषा मेहता यांच्या हस्ते करण्यात आले.

*** बच्चे कंपनीसाठी 'मोद संस्कृतम्' सीडी तयार**

आजच्या मल्टी लिंग्वल जमान्यात संस्कृत भाषा टिकून रहावी, मुलांना लहानपणीच संस्कृत भाषेची ओळख व्हावी म्हणून लहान-लहान संस्कृत कवितांचे पुस्तक आणि गाण्यांची 'मोद संस्कृतम्' सीडी यांचे प्रकाशन झाले आहे.

संस्कृतच्या प्राध्यापिका वर्षा सारडा यांनी गाण्यांचे लेखन केले आहे. लहानपणीच संस्कृत भाषा वारंवार कानावर पडली, तर मुलांना भाषा अनोळखी वाटणार नाही. संस्कृतचा वापरही करता येईल असे वर्षा सारडा यांनी नमूद केले.

नव्या भाषेची ओळख करून घेण्यासाठी या कवितांचा उपयोग होईल. पुस्तकात ११ कविता तर सीडीमध्ये २२ गाणी आहेत. पुस्तकात कवितांबरोबरच रंगीत चित्रेही आहेत. सीडीतील दोन गाण्यांमध्ये त्याचा अर्थ सांगणारे संस्कृत संवाद आहेत. पुस्तक किंवा सीडी या दोन्हींमध्ये कुठेही भाषांतर, अनुवादाचा वापर केलेला नाही.

संस्कृत शिकवताना आपण मुलांना श्लोकांचे पाठांतर करायला लावतो. त्याचा अर्थ त्यांना कळत नाही आणि त्यात विशेष गंमतही येत नाही. मुलांना सहज कळेल, असे काही दिले तर त्यांना भाषेची गोडी लागेल, या विचाराने गाण्यांचे लेखन केले गेले आहे.

*** इतिहास होणार 'बोलका'**

इतिहास हा विषय पुस्तकातून शिकणे म्हणजे किचकट घोकंपट्टी; पण तोच इतिहास प्रात्यक्षिक, वास्तूदर्शन किंवा गोष्टीरूपाने समोर आला तर तितकाच रंजकही होऊ शकतो, हे ध्यानात घेऊन फॉक्स हिस्ट्री चॅनेल आणि इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲण्ड कल्चरल हेरिटेज (इनटॅच) या संस्थेने 'माझे शहर माझा इतिहास' हा उपक्रम सुरू केला आहे.

पुण्यामध्ये साठ विद्यार्थ्यांना नुकतीच हेरिटेज वॉकमध्ये शनिवारवाडा, तांबटआळी, कसबा पेठ, याज्ञवल्क्य पथ आदी ठिकाणांची सफर घडवून आणण्यात आली. इनटॅचच्या समन्वयक सुप्रिया गोटुरकर यांच्यासह आर्किटेक्ट मानसी परदेशी आणि शुभदा कमलापूरकर यांनी या ठिकाणांची माहिती दिली.

गोटुरकर म्हणाल्या की, पुण्यात राहणाऱ्यांना पुण्यातील ऐतिहासिक वास्तू माहीत असणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष त्या वास्तूला भेट दिल्याने तिची केवळ माहितीच कळत नाही, तर तिची सद्य:स्थिती, जतन करण्याची गरज याविषयी

मुलांच्या मनात आस्था निर्माण होईल.

या हेरिटेज वॉकसाठी झाडांची पाहणी, वास्तू, ऐतिहासिक घटनांची ठिकाणे अशा अनेक थीम्स तयार करण्यात आल्या आहेत. या वॉकमध्ये सहभागी झालेल्या मुलांसाठी 'माझे शहर माझा इतिहास' या विषयावर निबंधलेखन स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे.

*** साहित्यासाठी अर्थसंकल्पात करणार भरीव तरतूद**

साहित्यक्षेत्रातील उपक्रमशीलता वाढवण्यासाठी येत्या अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करणार असल्याचे राज्याचे अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी सांगितले.

राज्यात साहित्य, कला, सांस्कृतिक आदी क्षेत्रांतील प्रयोगशीलता वाढीस लागण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र ५०व्या वर्षात पदार्पण करत असल्याने येत्या अर्थसंकल्पामध्ये त्यासंदर्भात तरतूद करण्यासाठी नामवंतांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल असे ते म्हणाले.

सध्याच्या शतकात तरुण पिढीसमोर वेगवेगळी आव्हाने असून त्यांना सामोरे जाण्यासाठी उत्तम साहित्याची आवश्यकता असल्याचे तटकरे म्हणाले.

*** नववे साहित्यिक कलावंत संमेलन**

महाराष्ट्राची जडणघडण ही संत आणि साहित्यिकांमुळे झाली असून, गोरगरीब व वंचित वर्गाची दु:खे मांडणारे साहित्य हेच खरे समृद्ध साहित्य आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी नवव्या साहित्यिक कलावंत संमेलनाचे उद्घाटन करताना केले.

संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे, अर्थमंत्री सुनील तटकरे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रमेश वांजळे, महापौर मोहनसिंग आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे उपस्थित होते. समाजाच्या वेदना मांडणारे साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे असे भुजबळ म्हणाले.

श्री. कांबळे यांनी छोट्या संमेलनांचे महत्त्व विशद केले. महाराष्ट्र हा साहित्य संमेलने भरविणाऱ्यांचा प्रदेश आहे, या संमेलनांचे स्वागत व्हायला हवे. साहित्य आणि कला म्हणजे आपल्या मनातील निसर्गाचे सादरीकरण असते. साहित्याचा अभ्यास करताना त्याची कारणमीमांसा तपासणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

साहित्य हा संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे सुप्रिया सुळे यांनी नमूद केले. आपल्यावर वाचनाचे संस्कार झाल्याने साहित्यक्षेत्राचे महत्त्व आपण जाणतो, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप बराटे यांनी केले. संमेलनात वि. दा. पिंगळे यांचे 'महाराष्ट्राची आई साने गुरुजी', के. डी. पवार यांचे 'युगपुरुष अण्णा हजारे',

बाबासाहेब जाधव यांचे 'सिंहगर्जना' व 'अलौकिक ज्योतिबा फुले' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

### * 'जातींचा विचार न करता योगदान देणाऱ्यांची गरज'

नवव्या साहित्यिक कलावंत संमेलनात 'महाराष्ट्राच्या जडणघडणीतील साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदान' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. लेखिका प्रा. डॉ. वीणा देव आणि प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांनीही परिसंवादात भाग घेतला. डॉ. रामचंद्र देखणे अध्यक्षस्थानी होते.

संपूर्ण समाज समजून घ्यायचा असेल, तर तुमचे वाचनही चौफेर असले पाहिजे. तसेच वाचक हा लेखकाला, पत्रकाराला त्याच्या जबाबदारीचे भान देणारा असला पाहिजे. समाज आज जातींच्या तुकड्यांत विभागल्याचे दुर्दैवी चित्र दिसते आणि सामाजिक भावनांना चुचकारत लिखाण करणारी पत्रकारिताही याची काही प्रमाणात कर्तीकरविती आहे, अशा परिस्थितीत मी कुठल्याही जातीचा नाही, तरीही हा महाराष्ट्र माझा आहे, अशा सम्यक् दृष्टीने समाजाकडे पाहता आले पाहिजे. तरच आपले या समाजासाठी काही योगदान राहू शकेल. साहित्याने मराठी माणसाला जीवनभान दिले. नव्या सामाजिक जाणिवाही दिल्या. 'मराठीची अस्मिता' हा विचार संतसाहित्याने दिला, स्वातंत्र्याची प्रेरणाही दिली. साहित्यानेच प्रगल्भ वाचक तयार केला, प्रगल्भ मने तयार केली, साहित्याने मराठी मनाची दृष्टी विस्तारली. म्हणूनच महाराष्ट्र हा भारतात सदैव निराळा, आगळा राहिला असे वीणा देव यांनी सांगितले.

या राज्याच्या जडणघडणीत मराठी साहित्याचे, विशेषत: संतसाहित्याचे योगदान निश्चितपणे आहेच, पण या साहित्याने जे काम होऊ शकले नाही ते दलित व नंतर आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन साहित्याने केले, असे प्रतिपादन प्राचार्य सबनीस यांनी केले.

केवळ भौगोलिकदृष्ट्या न पाहता संगीत, नृत्य, नाट्य, लोककला, संतपरंपरा, भक्तिपंथ, शाहिरी, लावणी, सुधारकांची परंपरा, बंडखोरांची परंपरा, साहित्याची परंपरा अशा अंगाने बघितले तर खरा महाराष्ट्र आपल्यासमोर उभा राहतो, असे डॉ. देखणे यांनी सांगितले.

### * बालसाहित्य हे विश्वसाहित्य

वेगवेगळ्या देशांचा सांस्कृतिक वारसा हा लहानपणी बालसाहित्यातून आपल्याला मिळतो, या अर्थाने बालसाहित्य हे विश्वसाहित्य आहे आणि म्हणूनच ते मुलांपर्यंत गेले पाहिजे असे मत विख्यात समीक्षक श्री शंकर सारडा यांनी विश्वास वसेकर यांच्या मोठ्यांच्या छोट्या गोष्टी या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय खरात होते.

सारडा पुढे म्हणाले की परीकथा हा जगातला अत्यंत प्रगत असा वाङ्मयीन आकृतीबंध आहे. कॉमिक्स आणि कार्टून्स यांनीही आजच्या मुलांचं भावविश्व समृद्ध बनविले आहे. आपल्या घरातल्या आणि निकटच्या मुलांना अत्यंत सकस आणि चित्रमय बालवाङ्मय दिले पाहिजे. किंबहुना मुलांच्या हाती पुस्तक देणे ही चळवळ बनली पाहिजे.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते विश्वास वसेकरांच्या 'अरण्यऋषी थोरो' आणि 'ओळखा फुलझाडे' या पुस्तकांचेही प्रकाशन झाले.

प्राचार्य डॉ. संजय खरात आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की फंडामेंटल सायन्सकडे विद्यार्थ्यांची आसक्ती वाढवायची असेल तर वैज्ञानिक बालसाहित्य उपयुक्त ठरेल. प्रा. स्वाती कंधारकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मृणालिनी भदाणे, प्रा. अश्विनी सातभाई, खासदार प्रदीप रावत, ॲड. अशोक धेंडे, संजय कांबळे, शंतनु पांडे, प्रकाशक दुष्यंतकुमार वसेकर आदी यावेळी उपस्थित होते. प्रा. प्राची रावळ यांनी आभार मानले. प्रा. श्रुती भातखंडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** 'मध्यमवर्गाचा उदय'चे प्रकाशन**

''एकोणिसाव्या शतकातील मध्यमवर्ग हा समाजातील सर्व घटकांचा विचार करणारा होता. सध्याच्या मध्यमवर्गाने मात्र स्वत:ला जात, धर्म, गाव, घराणे इ. कप्प्यांमध्ये बंद केलेले आहे,'' असे विचार पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. यशवंत सुमंत यांनी व्यक्त केले.

डॉ. राजा दीक्षित लिखित डायमंड प्रकाशनच्या 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र-मध्यमवर्गाचा उदय' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. ज. वि. नाईक यांच्या हस्ते झाले.

सुमंत म्हणाले, ''एकोणिसाव्या शतकातील मध्यमवर्ग व सध्याचा मध्यमवर्ग यांच्यात गुणात्मक फरक आहे. त्यावेळचा समाज सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रामध्ये काय करीत होता. हे दीक्षित यांच्या पुस्तकातून लक्षात येते. एकोणिसाव्या शतकातील मध्यमवर्ग हा जाणीव जपणारा होता. समाजातील सर्व घटकांचा तो विचार करीत होता. त्यामुळे तो खऱ्या अर्थाने विश्वात्मकतेची भाषा करीत होता. आजचा मध्यमवर्ग स्वत:ला 'ग्लोबल' म्हणत असला, तरी त्यात जाणिवेतून येणारी विश्वात्मकता नाही. वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये या मध्यमवर्गाने स्वत:ला बंद केले आहे.''

प्रा. नाईक म्हणाले, ''इतिहासाचे सातत्याने पुनर्लेखन होत असते. संशोधनाची नवी साधने मिळाल्यानंतर त्याचे स्वरूप बदलत राहते. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून त्या इतिहासाची चिकित्सा होत राहते. या सर्व गोष्टी प्रभावीपणे या पुस्तकात दिसून येतात.''

समाजातील वर्गव्यवस्थेची मांडणी करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला असल्याचे दीक्षित यांनी सांगितले.

### * 'मायक्रोसॉफ्ट' आणि मराठी

संगणकीय कार्यप्रणालीच्या विकास व व्यापारक्षेत्रात मराठी आवृत्त्यांचा दृश्यफलक, सूचनांची हेल्पलाईन, कार्यपुस्तिका आदींसाठी संगणकीय परिभाषेचे सुबोध प्रमाणीकरण मायक्रोसॉफ्ट करणार आहे. परंतु 'मायक्रोसॉफ्टच्या एक्सपीची मराठी आवृत्ती सदोष आहे. पारिभाषिक संज्ञा व तांत्रिक भाषा तांत्रिक निकषांवर उतरणारी नाही. त्यातच चुकीचे शब्द घुसविल्याने भाषेचा घोळ वाढतो आहे,' असे भाषाविज्ञानतज्ज्ञ सुशांत देवळेकर यांनी स्पष्ट केले.

संगणकप्रणालीच्या सुलभ वापरासाठी मराठीतून निर्दोष आज्ञावली कार्यान्वित करण्याचे आश्वासन मायक्रोसॉफ्टने दिलेले आहे. विशेष म्हणजे शालेय शिक्षणात संगणकाचा वापर करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या योजनेत मायक्रोसॉफ्ट सहभागी आहे. भारतीय भाषांमध्ये कार्यप्रणाली मायक्रोसॉफ्टने उपलब्ध करून द्यावी म्हणून अभ्यासकेंद्राचे पदाधिकारी वर्षभर धडपडत आहेत. ऑफिस प्रणालीतील मराठी भाषेच्या त्रुटी निवेदनाद्वारे मायक्रोसॉफ्टला सादर करण्यात आल्या आहेत. असेही ते म्हणाले.

### * संतांच्या विचारांची शिदोरी न संपणारी

मानवाला भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांचा वेध संतांनी घेतला असून, त्यांनी दिलेल्या विचारांची न संपणारी शिदोरी आपल्यासाठी उपलब्ध आहे, असे उद्‌गार पुणे विद्यापीठाचे तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. सदानंद मोरे यांनी साहित्यिक व कलावंत संमेलनात संत साहित्याचा अनुबंध या परिसंवादात व्यक्त केले.

डॉ. किसन पाटील, निशिकांत मिरजकर आणि डॉ. वीणा मनचंदा यांनी या परिसंवादात भाग घेतला.

दलित साहित्य आणि चळवळीने चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध केलेल्या बंडाची प्रेरणा संतसाहित्यात आहे, असे डॉ. पाटील म्हणाले, 'वैदिक' आणि 'लोकायत' या दोन परंपरा हजारो वर्षांपासून देशात असून, लोकायत परंपरेने समाजातील श्रमिकांचा विचार केला, संत हे या लोकायत परंपरेचे घटक आहेत, संतांनी आपल्या साहित्यातून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड केले असे ते म्हणाले.

संतांचे विचार विश्वव्यापक असून, त्याला देश-काल परिस्थितीचे बंधन नाही. गुरुनानकांनी आपल्या विचारांमध्ये नामस्मरणाचे महत्त्व सांगितले. सामूहिक शेती आणि सहभोजनाचे कार्य सुरू करणारे आणि स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणारे गुरुनानक हे पहिले संत होते, असे मनचंदा म्हणाल्या. मिरजकर यांनी नमूद केले की सर्व संतांनी मूलगामी आत्मशोध घेतला आणि साहित्यातून प्रेमभक्तीचा संदेश दिला. संतसाहित्याचे भाबडेपणाने अनुकरण करणे योग्य नसून, आजच्या समस्यांचा

विचार करून सुसंगत विश्लेषण करायला हवे.

### * 'रसास्वाद सिनेमाचा' कार्यशाळा

चित्रपटाचा रसास्वाद ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. प्रचंड चित्रपट पाहून केवळ चित्रपटांबद्दलच्या माहितीत भर पडेल, पण तो काही खरा रसास्वाद नव्हे. ज्या चित्रणामुळे स्वाभाविकपणे रसिकांच्या डोळ्यात पाणी वा ओठांवर हसू येते तो खरा चित्रपट, असे मत ज्येष्ठ चित्रपट विषयक पत्रकार बी. के. करंजिया यांनी मांडले. फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् (महाराष्ट्र चॅप्टर) व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रसास्वाद सिनेमाचा' या कार्यशाळेचे उद्‌घाटन त्यांनी केले.

डॉ. श्यामला वनारसे (कलामाध्यमे व आस्वाद चित्रपट माध्यमाचे स्वरूप), समर नखाते (चित्रपटातील दृश्यात्मकता), उज्ज्वल निरगूडकर (चित्रपटाच्या तांत्रिक बाजू) यांचा चर्चेत सहभाग होता.

करंजिया म्हणाले की आलमआरा व त्यानंतरच्या काही चित्रपटांद्वारे सांस्कृतिक क्रांती घडत असतानाच सरकारच्या विचित्र धोरणांमुळे मधल्या काळात चित्रपटसृष्टीला वाईट दिवस आले, मात्र मृणाल सेन, श्याम बेनेगल यासारख्या दिग्दर्शकांनी समांतर चित्रपट समोर आणून पुन्हा एक आशेचा किरण रसिकांना दाखवला.

करंजिया यांनी एकाच विषयावर आधारित परंतु फ्रेंच व इंग्लिश अशा दोन भाषांमधील निर्मिती असलेल्या दोन चित्रपटांतील एकसारख्या दृश्यांची तुलना करून दाखवली. त्यांनी अत्यंत मर्मग्राही शब्दात तो संपूर्ण प्रसंग रसिकांसमोर चितारला.

सुधीर नांदगावकर यांचे 'चित्रपट आस्वादाकडे' या विषयावर व्याख्यान झाले.

### * बायबलच्या मराठी आवृत्तीचे हस्तलिखित पूर्ण

स्वाती पेठकर या २२ वर्षीय शिक्षिकेने आपला सुलेखन (कॅलीग्राफी) छंद जोपासताना बायबलच्या नव्या कराराच्या मराठी आवृत्तीचे हस्तलिखित पूर्ण केले आहे.

स्वाती यांनी यापूर्वी ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा हाताने लिहून पूर्ण केली आहे. या उपक्रमाची दखल लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने घेतली आहे.

स्वाती पेठकर म्हणाल्या, की बायबलचे लिखाण मी २७ डिसेंबर २००७ रोजी सुरू केले. या लिखाणासाठी १५८५ पाने लागली. या लिखाणासाठी कुटुंबीय तसेच बिशप डावरे, फादर माल्कम सिक्वेरा यांचे सहकार्य लाभले.

### * बंगळुरूमध्ये 'अक्षरधारा'चे पुस्तक प्रदर्शन

'अक्षरधारा' संस्थेने बंगळुरूमध्ये नुकतेच मराठी पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केले होते.

किताबखाना वाचक मंचाच्या वतीने महाराष्ट्र मंडळ सभागृह, गांधीनगर येथे

'साहित्य मेळावा २००९'चे आयोजन करण्यात आले. यानिमित्त 'अक्षरधारा' ने मराठी पुस्तकाचे प्रदर्शन भरवले. या प्रदर्शनाला वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे यांच्या हस्ते झाले. यावेळी साहित्यिका मोनिका गजेंद्रगडकर व किताबखाना वाचक मंचाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

ह. मो. मराठे म्हणाले की, अक्षरधारा गेली पंधरा वर्षे सातत्याने संपूर्ण महाराष्ट्र तसेच गोवा व बेळगाव या ठिकाणीसुद्धा ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे हे कौतुकास्पद आहे, परंतु ज्या ठिकाणी मराठी पुस्तके पोहोचत नाहीत अशा ठिकाणीही पोहोचण्याचा अक्षरधाराचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लक्ष्मण राठिवडेकर यांनी अक्षरधाराच्या कार्याची माहिती दिली.

*** 'एक कप च्या'**

साध्या माणसाच्या आत्मसन्मानाची गोष्ट सांगणाऱ्या 'एक कप च्या' या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर चित्रपटाच्या कलावंत व दिग्दर्शकांसमवेत विशेष चर्चा आयोजित करण्यात आली होती. या वेळी दिग्दर्शक द्वयी सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर, कलाकार अश्विनी गिरी, देविका दप्तरदार, श्रीराम रानडे, मदन देवधर, निर्माते यशवंत ओक व कॅमेरा मन मिलिंद जोग यांच्याशी अरुण नूलकर यांनी संवाद साधला.

'झालेल्या चुकीची वा अन्यायाची दुरुस्ती झाली तरच न्याय मिळाला असं वाटतं, नाहीतर सुडाचं चक्र सुरूच राहतं. चित्रपटातील पात्रांच्या संवादातून पश्चात्ताप वा उपरती जरी दिसली नाही, तरी त्यांच्या कृतीतून ती दिसते आणि तेच महत्त्वाचे आहे,' असे मत 'एक कप च्या' या चित्रपटाच्या प्रदर्शनप्रसंगी दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी व्यक्त केले.

चित्रपटाच्या कथेबद्दल सुनील सुकथनकर म्हणाले, की माहितीचा अधिकार हा विषय घेऊन चित्रपट बनवण्याची कल्पना मूळची आमच्या निर्मात्यांची! त्यानंतर त्यावर वैयक्तिक पातळीवरील समस्या ते आंदोलने असा अभ्यास करताना वर्तमानपत्रांतून सतत वाचनात येणाऱ्या खटल्यांमुळे सगळ्यांच्याच छोट्यामोठ्या अडचणी आहेत व त्या माहितीच्या अधिकाराखाली सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येतोय हे लक्षात आले. त्यामुळे सर्वसामान्यांना इतक्या मोठ्या प्रमाणावर भेडसावणाऱ्या प्रश्नांना आपण हात घालावा असे वाटले व चित्रपटाची सुरुवात झाली.

दिग्दर्शकांकडून भूमिकाबाबत विचार व अभ्यास करण्यासाठी मिळणाऱ्या मोकळेपणामुळे 'रुक्मिणी' उभी करणं सोपं गेलं, अशी भावना अश्विनी गिरी हिने

व्यक्त केली, तर माहितीचा अधिकार समजावून देणारी ‘दुर्गा खानोलकर’ ही भूमिका छोटी असूनही मोजक्या दृश्यांमध्ये परिणामकारकतेने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायची असल्यामुळे आव्हानात्मक होती, अस मत देविका दप्तरदार यांनी मांडले.

प्रसिद्ध लघुकादंबरीकार कमल देसाई यांनी साकारलेल्या अप्रतिम ‘जीजी’बद्दल सुमित्राबाई म्हणाल्या, की या आजीला ‘अज्ञाताचं, सातासमिंदरापार असलेलं कोडं सुटलेलं आहे. त्यामुळे ती छोट्या-मोठ्या आनंदी क्षणांचाही आपल्या हसण्याने उत्सव साजरा करते.’

*** ‘स्त्रीमुक्तीच्या लढ्यासाठी साहित्य प्रेरणादायी ठरेल’**

भारती विद्यापीठ विश्वविद्यालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या वतीने ‘वुईमेन लिटरेचर इन इंडियन लँग्वेज (१८५०-२०००)’ या पुस्तकाचे प्रकाशन ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महाश्वेतादेवी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वनमंत्री डॉ. पतंगराव कदम होते. व्यासपीठावर लेखिका धीरूबेन पटेल, चित्रा मुद्‌गल, व्होल्गा, प्रतिभा रे, ज्योत्स्ना देवधर उपस्थित होत्या. साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या अध्यक्षा डॉ. मंदा खांडगे यांनी प्रास्ताविक, तर भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी दिवेकर आणि अस्मिता कोल्हे यांनी केले. पुस्तकाच्या संपादिका डॉ. शुभांगी रायकर आणि डॉ. निशिकांत मिरजकर यांनी मनोगत व्यक्त केले.

‘स्त्रीमुक्तीच्या लढ्यासाठी झटणाऱ्या सर्व स्त्रियांसाठी महिला साहित्यिकांच्या कामगिरीचा आढावा घेणारे हे पुस्तक प्रेरणादायी ठरेल’, असे प्रतिपादन डॉ. गणेश देवी यांनी व्यक्त केले.

या पुस्तकातून महिलांचा आवाज आणि साहित्यातून संघर्षाची कहाणी पुढे येते असे डॉ. गणेश देवी म्हणाले. ते म्हणाले, ‘‘ओरिसामध्ये शंभरपैकी ११ मुली तर ४० मुले, कर्नाटकमध्ये अकरा मुलीच शिक्षण घेत असल्या तरी मुलांचे प्रमाण अधिक आहे. आदिवासी भागांमध्ये मुलींच्या आरोग्याविषयीही अनास्था आहे. तेथे मुलांच्या आरोग्याकडे जेवढे लक्ष दिले जाते तेवढे मुलींकडे दिले जात नाही. उलट मृत्यू पावणाऱ्या मुली या औषधाविना मरत नाहीत तर त्यांना कुटुंबीयांकडून आरोग्य सेवाच उपलब्ध करून दिली जात नाही म्हणून मरतात. देशात स्त्री-पुरुषांचे उच्च शिक्षणातील प्रमाण पाहता त्यात मुलींची संख्याही कमी असल्याचे दिसून येते; मात्र पुण्यात ही स्थिती समाधानकारक दिसते. स्त्रियांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठीचे नवे केंद्र पुण्यात स्थापावे. भारतामध्ये लेखनासह चित्रपट दिग्दर्शिका, निर्माती, कलाकार, नर्तकी, गायिका यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये कामगिरी बजावणाऱ्या स्त्रिया आहेत. त्यामुळे हे पुस्तक स्त्रीमुक्तीसाठी लढणाऱ्या स्त्रियांना मार्गदर्शक, प्रेरणादायी ठरेल.’’

''ब्रिटिशांच्या आगमनानंतर स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांना लेखनाची प्रेरणा मिळाली. पूर्वीच्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले. मीराबाई यांची गीते ही देशभर नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहेत,'' असे सांगताना अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांच्या साहित्याविषयीच्या कामगिरीचा आढावा महाश्वेतादेवी यांनी घेतला.

### * शाहीर संभाजी भगत यांचा सत्कार

संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहिरांचे योगदान' या विषयावरील परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी भाई वैद्य होते.

कपिल मीडियाचे संचालक विशाल लोखंडे व शिक्षण मंडळाचे सदस्य मिलिंद कांबळे यांनी या परिसंवादाचे आयोजन केले.

'संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील जनमताची जडणघडण कलावंतांकडून होत होती व या जनमतावर स्वार होऊन नेते राज्य करीत होते. जी कला बुद्धीला झिणझिण्या आणत नाही, अंगात नवी ऊर्जा निर्माण करीत नाही, ती खरी कलाच नव्हे. मात्र अशी कला सध्या फक्त लोककलावंतांकडेच दिसून येते. उद्याचे खरे नेतृत्व साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत यांच्याकडेच असणार आहे. त्यांनी ती जबाबदारी स्वीकारावी,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी मांडले.

या वेळी शाहीर संभाजी भगत म्हणाले की, महामानवाची उंची प्रत्येकाने स्वत:च्या उंचीएवढी करून ठेवलेली आहे. जे त्यांचा उदोउदो करतात, त्यांनी बाबासाहेबांना डोक्यावर घेतले आहे; पण डोक्यात घेतलेलं नाही, कारण ते कठीण आहे.

अनेक गोष्टींचा त्यासाठी त्याग करावा लागतो. अनेक गोष्टी अंगी बाणवाव्या लागतात व ते या 'भक्तांना' परवडणारे नाही. तरीही मातंग, चर्मकार, दलित असा एकूण सर्व थरातील समाज हळूहळू शिक्षणाकडे वळतो आहे. या वेळी भगत यांनी 'जिवाची केली होळी' हे क्रांतिगीत सहकाऱ्यांच्या साथीने सादर केले.

शाहीर मंडळी चळवळींना ऊर्जा देण्याचे काम करतात. हजारो भाषणातून सर्वसामान्यांपर्यंत जो संदेश नीट पोहोचू शकत नाही, तो शाहिरांच्या गीतांतील दोन ओळींतून पोहोचत असल्याचे कांदळकर म्हणाले. पूर्वी कलावंत व सामान्य माणसात कोणताही पडदा नसल्यामुळे सगळं मुक्त होतं. नंतर मात्र कलेचं व्यावसायिकीकरण झाल्याची खंत कॉ. मोरे यांनी व्यक्त केली. शाहीर भगत हे खरं म्हणजे महाराष्ट्राचे 'गदर'च आहेत असे भाई वैद्य म्हणाले.

### * 'एक आंधळा आणि दहा हत्ती'चे प्रकाशन

''वाङ्मयीन जाणीव न ठेवता केलेलं हे लेखन असल्यामुळे हे सहज, सोपं व म्हणूनच हृदयाला भिडणारं झालेलं आहे. या पुस्तकाच्या व्यक्तिचित्रांमधील आपसातील

वैरातूनही माणुसकी दिसते. हे व्यक्तिचित्रणात्मक दीर्घलेख आहेत. ही एक बडा ख्यालाचे सादरीकरण करणारी मैफील आहे. यात स्वकथन आहे, पण स्वविलोपन नाही. हे एक अस्तंगत जगाचं चित्रण करणारं पुस्तक आहे,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी रवींद्र जोशी लिखित 'एक आंधळा आणि दहा हत्ती' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी व्यक्त केले.

अध्यक्ष म्हणून प्रा. द. मा. मिरासदार व प्रमुख पाहुणे म्हणून कवी फ. मुं. शिंदे उपस्थित होते. शिंदे म्हणाले की, बऱ्याचदा आत्मचरित्रात आत्मस्तुती अधिक व चरित्र कमी असते. त्यामुळे दुसऱ्याचं व्यक्तिचित्रण करणे हा आत्मचरित्र लेखनापूर्वीचा सरावच म्हटला पाहिजे. मा. कृष्णराव फुलंब्रीकर, भोपे बंधू, सुधीर फडके यांसारख्या दहा व्यक्तिचित्रांतील एकेका व्यक्तीत दहा हत्तीचं बळ आहे. हे लिखाण रिवाजाचं नाही, तर रियाजाचं आहे; तमातून तेजाकडे नेणारं आहे. वडिलांचे उत्कृष्ट व्यक्तिचित्र रेखाटणारा हा 'बापावर लिहिणारा बाप माणूस' आहे.

### * स्वा. सावरकर अभिवादन यात्रेचे आयोजन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी मार्सेलिस येथे जहाजातून मारलेल्या उडीला ८ जुलै रोजी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने आदित्य प्रतिष्ठान व राजाराणी ट्रॅव्हल्स यांच्या संयुक्त विद्यमाने वीर सावरकर अभिवादन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

लंडनहून २ जुलैला सुरू होणारी ही यात्रा पॅरिसमार्गे ७ व ८ जुलैला मार्सेलिसला पोहोचेल. ८ जुलैला मार्सेलिस येथे सावरकर स्मारकाला भेट, संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेली वीर सावरकरांची गीते, विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांचे प्रवचन व वीर सावरकर हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. लंडनमधील मुक्कामाच्या दरम्यान तेथील वीर सावरकर यांच्याशी संबंधित असलेले इंडिया हाऊस, कॅक्सटन हॉल, इंपिरियल कॉलेज, ग्रेजइन संस्था या स्थळांना भेटीचा कार्यक्रम होणार आहे. या यात्रेच्या शेवटच्या टप्प्यात स्वित्झर्लंड व इटलीमधील काही स्थळांना भेटी होणार आहेत, अशी माहिती शंकर अभ्यंकर यांनी दिली. या यात्रेत सहभागी होण्यासाठी आदित्य प्रतिष्ठान वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर अथवा राजाराणी ट्रॅव्हल्स कार्यालयाशी संपर्क साधावा.

### * आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संरक्षण ब्युरो - सुनीता अनंतकर

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संरक्षण ब्यूरो (भारत) या संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी पुण्याच्या सुनीता अनंतकर यांची, तर राष्ट्रीय अध्यक्षपदी विद्या साळुंके यांची निवड करण्यात आली.

अनंतकर यांनी एम. ए. सायकॉलॉजी व फिलॉसॉफी या विषयामध्ये प्रावीण्य

मिळविले असून, नुकतेच ब्यूटी थेरपिस्ट अँड कल्चरिस्ट या विषयात लंडन येथे पदविका शिक्षणही घेतले आहे. त्यांनी आजवर अनेक अन्यायग्रस्तांना कायदेशीर मदत केली आहे.

### * अत्रेंच्या लेखनामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

आचार्य अत्रे यांच्या पत्रकारितेमुळे, वक्तृत्वामुळे मरगळलेल्या समाजास चेतना मिळाली. त्यांच्या अष्टपैलू कर्तृत्वामुळे वर्षभर कार्यक्रम घेता येतील असे प्रतिपादन रामदास फुटाणे यांनी सासवड येथे साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करताना केले.

कऱ्हेच्या काठी, सासवड येथे नगरपरिषदेच्या वतीने बांधण्यात आलेल्या आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनामध्ये अत्रे यांच्या ४ फूट उंचीच्या ब्रांझच्या पुतळ्याचे अनावरण चंदुकाका जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

वरळी (मुंबई) येथे साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण शरद पवार यांच्या हस्ते नुकतेच झाले. त्यामुळे तेथील पुतळा सासवड येथील अत्रे सांस्कृतिक भवनात ठेवण्यासाठी देण्यात आला. या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तरुणपिढी राजकारणामध्ये जास्त वेळ घालवत असून, दिशाहीन होऊन पुढाऱ्यांच्या मागे पळत आहे. पुढारी, नेत्यांचे यात भले होते आहे. परंतु समूहाच्या समस्या सुटण्याऐवजी वाढत आहेत. ही राजकीय विसंगती हा माझ्या वात्रटिकेचा मूळ गाभा आहे; त्यातून आपण या ढोंगी राजकारणावर व दिशाहीन झालेल्या मरगळलेल्या समाजावर प्रकाश टाकत असल्याचे फुटाणे यांनी सांगितले. शासनाचे निर्णय बदलवण्याची ताकद अत्रे यांच्या पत्रकारितेमध्ये होती. त्यामुळे प्रशासनावरही पत्रकारितेचा अंकुश होता, असे पुरंदरे यांनी सांगितले.

### * 'मनातलं... मनापासून'चे प्रकाशन

'आयुष्याकडे फार गांभीर्याने पाहू नका, संवेदनशील मनाने पाहा. शरीरात आनंदाचं अधिष्ठान असू द्या. म्हणजे चांगलं तेच घडेल.' असा आशावाद बालरोगतज्ज्ञ डॉ. उल्हास कोल्हटकर यांनी डॉ. राजेंद्र बर्वे लिखित 'मनातलं... मनापासून' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात व्यक्त केला.

'मेंदूवर मनाचं नियंत्रण असतं. त्यानुसार त्याचे बरे-वाईट परिणाम जाणवत असतात. आपलं मन आरोग्यपूर्ण आहे का हे तपासून पाहा.' असेही डॉ. कोल्हटकरांनी सांगितले. तर हे पुस्तक म्हणजे आपल्याला आपल्याविषयी सावध करणारं आणि मनाचं मूल्यमापन करणारं वाचनीय पुस्तक आहे, अशी पावती नाटककार अशोक पाटोळे यांनी दिली.

* ‘विज्ञान विरुद्ध निसर्ग’ ही मांडणी चुकीची

जीवन पुरस्कार समितीच्या वतीने देण्यात येणारा ‘जगदीश गोडबोले स्मृती जीवन पुरस्कार’ नैसर्गिक शेतीचा यशस्वी प्रयोग करणारे यवतमाळ जिल्ह्यातील डोरली गावचे शेतकरी सुभाष शर्मा यांना देण्यात आला. स्वयंसेवी संस्थांचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. मुकुंद घारे, गोमुख संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजय परांजपे, जीवन पुरस्कार समितीचे प्रशांत कोठडिया, मंजू शर्मा आदी त्या वेळी उपस्थित होते.

‘‘विज्ञान हे निसर्ग व पर्यावरणाच्या विरोधात आहे, हा समज चुकीचा असून, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासातूनच निसर्गाच्या नियमांचा उलगडा होत गेला. पर्यावरणाचे ज्ञान व भान विज्ञानानेच आल्यामुळे ‘विज्ञान विरुद्ध निसर्ग’ असा विचार करून चालणार नाही,’’ असे मत ‘लोकसत्ता’चे संपादक कुमार केतकर यांनी व्यक्त केले.

निसर्ग व विज्ञान हे एकमेकांना पूरक असल्याचे स्पष्ट करून केतकर म्हणाले, ‘‘विज्ञान ही निसर्गावर आक्रमण करणारी शक्ती आहे, अशी मांडणी शास्त्रशुद्ध नाही. विज्ञान संकल्पनेचा अर्थच चुकीचा लावला गेला. विज्ञान हे निसर्गाचे नियम शोधणारे शास्त्र आहे. विज्ञानाच्या आधारे निसर्गाचा अर्थ कसा शोधायचा याचे उत्तम चित्रण सध्या युरोप व अमेरिकेतील दूरचित्रवाहिन्यांवरून केले जाते. मात्र, या निसर्गशक्तीबाबत आपल्याकडील एकही वाहिनी काहीही करीत नाही. निसर्गाचा प्रश्न पाश्चिमात्य विरुद्ध पौर्वात्य अशा पद्धतीने मांडून चालणार नाही. निसर्ग शब्द वापरला की राष्ट्रवाद दूर ठेवला पाहिजे. निसर्गाचा विचार वैश्विकच झाला पाहिजे.’’

‘‘निसर्गशक्तीबरोबरच निसर्गाचे नियोजनही झाले पाहिजे, या नियोजनाच्या सूत्राबाबत वैश्विक एकमत होत नाही. विकसनशील देश युरोप, अमेरिकेला कार्बनच्या उत्सर्जनाबाबत जबाबदार धरतात. या देशातील लोकांनी जीवनशैली बदलली नाही, तर कार्बनचे प्रमाण कमी होणार नाही, अशी भूमिका विकसनशील देश घेत आहेत. ‘ग्लोबल वॉर्मिंग’बाबत राष्ट्र ही संकल्पना काढणे गरजेचे असताना प्रत्यक्षात मात्र राष्ट्रांवरच चर्चा होते. अमेरिकेतील मध्यमवर्गापेक्षा भारतातील उच्चमध्यमवर्ग निसर्गाबाबत जास्त उद्धट आहे. त्यामुळे आपण आपल्या देशातील श्रीमंतांना त्यांची जीवनशैली बदलायला सांगणार आहोत का, याचा विचार झाला पाहिजे. इथेही अमेरिकेसारखेच सुरू आहे. मात्र, राष्ट्राभिमानासाठी वेगळी भूमिका घेतली जाते. पर्यावरणाच्या रक्षणासाठी निदान भारतीय उपखंडातील सुरुवात म्हणून नियोजन केले, तरी पुढे त्याचा चांगला परिणाम होईल. पण ते होत नसल्यानेच या विषयावरील चर्चा विकृत झाली आहे. ‘निसर्ग सर्व माणसांच्या गरजा पूर्ण करू शकतो, पण एकाचाही लोभ तो पूर्ण करू शकत नाही,’ असे महात्मा गांधी यांनी म्हटले होते. त्यानुसार निसर्गप्रेम व नियोजन यांच्याबरोबरच विकृत लोभाविरुद्ध चळवळ हवी आहे.

त्यातून किमान भारतात तरी वेगळी प्रकृती निर्माण करून कार्बनचे प्रमाण कमी करता येईल.''

डॉ. घारे म्हणाले, ''आपण स्वत:ला निसर्गाचा मालक नव्हे, तर भाग समजावे. निसर्ग व विज्ञान याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांमधून त्यातील भेदभाव निर्माण होत गेले. माणूस व निसर्ग एकरूप झाला, तर त्यातून मोठी कामे होऊ शकतात.''

परांजपे यांनी निसर्गशेतीबाबतची संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले, ''निसर्गशेती म्हणजे निसर्गावर प्रेम करून त्याला पुन्हा आपलेसे करणे. सध्या सामान्य शेतकरी खते, पाणी, बियाणे, कीटकनाशके याबाबत पूर्णपणे परावलंबी झाला आहे. त्याला स्वावलंबी करण्याचे काम निसर्ग करतो. जास्त पिके घेण्यासाठी नैसर्गिक स्वभावधर्म गायब होऊन हवे तसे विकृतीकरण झाले. पर्यावरणाच्या रक्षणासाठी निसर्गाच्या वागण्याकडे लक्ष ठेवून काम केले पाहिजे.''

नैसर्गिक शेतीच्या प्रयोगाबाबत शर्मा म्हणाले, ''शेतीशास्त्राने मला विनाश व निर्माणीचे विज्ञान शिकविले. निसर्गच माझा गुरू झाला व त्यानेच निर्माणीचे विज्ञान शिकविले. संपूर्ण नाश करणे ही राक्षसी शक्ती रासायनिकतेतून मिळाली होती. चुकीच्या व्यवस्थापनातून अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यातून १९९४ नंतर रासायनिक शेती पूर्णपणे बंद करून मी नैसर्गिक शेतीकडे वळलो. निसर्गावर प्रेम केले, त्याला पुन्हा आपलेसे केले. त्याने जमीन घडविणे शिकविले.''

*** सुलोचना दीदींचा सत्कार**

शनिवारवाडा कला महोत्सवात अखेरच्या दिवशी चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते सुलोचना दीदींचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन शनिवारवाडा कला महोत्सव ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.

त्या म्हणाल्या, ''मी दत्ता धर्माधिकारींच्या बाजीराव मस्तानी या चित्रपटात पेशव्यांच्या पत्नीची भूमिका करत होते. त्याचे शूटिंग शनिवारवाड्यात होणार होते, पण तो चित्रपट काही कारणाने पूर्ण झाला नाही. त्यावेळी शनिवारवाड्यावर येण्याचे माझे जे स्वप्न होते ते आज या कलामहोत्सवातील सत्कारामुळे पूर्ण झाले. माझा पहिला चित्रपट जिवाचा सखा पस्तीस आठवडे चालला. त्यानंतर याच पुण्यात माझे एकाच वेळी सात चित्रपट वेगवेगळ्या चित्रपटगृहांत चालले होते. तसे सोन्याचे दिवस पुन्हा मराठी चित्रपटांना येण्यासाठी तुम्ही रसिकांनी मराठी चित्रपट बघण्यास पुन्हा एकदा सुरुवात करा.''

*** डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'उदेक्कार'चे प्रकाशन**

डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'उदेक्कार' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन डॉ. विद्युत भागवत यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ संपादिका विद्या बाळ अध्यक्षस्थानी होत्या.

''स्त्रीवाद ही परिवर्तनवादी राजकीय जाणीव आहे. 'बाईपण' वाट्याला आल्यामुळे आपण मुख्य परिघाबाहेर कसे फेकले जातो, याची जाणीव असणारे स्त्रीवादी असतात. ही गुंतागुंत समजून घेतल्याशिवाय स्त्रियांना आत्मसन्मानाचे भान येणार नाही,'' असे मत पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका डॉ. विद्युत भागवत यांनी व्यक्त केले.

वैद्य म्हणाल्या, ''स्त्री जाणिवा असलेल्या कवितांचे विचारधन या काव्यसंग्रहामुळे मिळाले आहे. सर्व प्रकारच्या वाङ्मयप्रकारांना स्पर्शणारे काव्य, अभिव्यक्ती, वैदर्भीय भाषेची गोडी आणि भाषाशैली यांचा सुंदर समन्वय त्यात साधला गेला आहे.''

बाळ म्हणाल्या, ''लेखन हा लेखकांचा संवाद असतो आणि तो प्रत्यक्ष निरीक्षणे व अनुभवांवर आधारित असतो. या काव्यसंग्रहात स्त्रीजीवनातल्या महत्त्वाच्या टप्प्यांचे अनुभवात्मक निरीक्षण आहे.'' जीवनाच्या विविध टप्प्यांवर स्त्री जीवनाच्या वेदना आणि दुःख पाहात गेले, त्यातूनच या काव्यसंग्रहाची निर्मिती झाल्याचे इंगोले यांनी सांगितले.

*** 'इंटरनॅशनल' ८०**

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कला आदी क्षेत्रातील अनेक दिग्गजांपासून सर्वसामान्यांना जगभरातील ज्ञानाचे भांडार खुले करून देणाऱ्या तसेच देशी-परदेशी विचारवंत व अभ्यासकांना आकर्षणाचा विषय ठरलेल्या 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' या पुस्तकालयाने ८०व्या वर्षात पदार्पण केले.

विठ्ठल नारायण दीक्षित यांनी पुस्तकांवरील प्रेमातून १ जानेवारी १९३१ रोजी डेक्कन जिमखान्यावर हे पुस्तकालय सुरू केले. देशाच्या इतर भागातील तसेच पदेशातील विविध विषयांवरील पुस्तके आणून त्यांनी पुण्यात ज्ञानाचे एक भांडारच सुरू केले अन् अभ्यासक व विचारवंतांसाठी ती पर्वणीच ठरली.

विठ्ठलरावांनी वाढविलेला हा ज्ञानाचा ठेवा त्यांचे चिरंजीव उपेंद्र दीक्षित पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवित आहेत.

उपेंद्र दीक्षित म्हणाले, ''वडिलांना वाचनाची मोठी आवड होती, पुस्तकालय सुरू करण्यामागे व्यवसाय होता. पण, इतरांनाही वेगवेगळी पुस्तके वाचायला मिळावीत असा त्यांचा प्रमुख उद्देश होता. म्हणूनच बुक डेपो, स्टॉल आदी नाव न ठेवता 'सर्व्हिस' (सेवा) असा शब्द पुस्तकालयाच्या नावात वापरला. वाचकाला हवे असणारे व पुस्तक पाहिल्यानंतर ते घ्यावेसे वाटेल अशी वेगवेगळी पुस्तके या पुस्तकालयामुळे प्रथमच पुण्यात उपलब्ध झाली. त्यामुळे विचारवंत, संशोधक, परदेशी पर्यटकही आवर्जून येऊ लागले. पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राधाकृष्णन, यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर आदी दिग्गज या पुस्तकालयामध्ये येत.

पु. ल. देशपांडे हे वडिलांना 'इंटरनॅशनल दीक्षित' असेच संबोधत. पंडित नेहरू यांनी इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या एका पत्रामध्ये पुण्यात हवे ते पुस्तक या पुस्तकालयातून घे असे इंदिरा गांधी यांना सुचविले होते.''

''१९६१ मध्ये झालेल्या महाप्रलयात सर्व वाहून गेले होते. इमारतीचा बराचसा भाग मात्र तसाच होता. हे सर्व पुन्हा उभे करणे मोठे आव्हान होते. पण, अनेकांच्या सदिच्छा वडिलांच्या मागे होत्या. देशातील व परदेशातील प्रकाशकांनी तसेच बँका, वाचक, ग्राहकांनी मदत केली. त्यातून १५ ऑगस्ट १९६२ रोजी पुस्तकालयाचा पुनर्जन्म झाला.

मागील दहा वर्षांमध्ये या व्यवसायात प्रचंड बदल झाले आहेत. पुस्तकापासून लोकांचे लक्ष काहीसे उडाले आहे. संगणकाच्या माध्यमातून वेगवेगळे संदर्भ क्षणात उपलब्ध होत आहेत. त्याचबरोबरीने पुस्तकांची पायरसी मोठ्या प्रमाणावर होते आहे. अशा कठीण परिस्थितीत हा किल्ला टिकवून ठेवला, हेच मोठे साध्य आहे. पुस्तके वाचणारा एक वर्ग अजूनही आहे. त्याच्यामुळे हा व्यवसाय टिकून आहे. पण, तुरळक वाचकांच्या आधारे हा व्यवसाय वाढू शकणार नाही. ज्ञानाचा हा ठेवा पुढे सुरूच ठेवणार आहे, असे उपेंद्र दीक्षित म्हणाले.

पुस्तकांबद्दल निर्माण झालेली अनास्था दूर करण्यासाठी आणि चांगल्या पुस्तकांची माहिती वाचकाला करून देण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. वर्तमानपत्रांबरोबरच विशेषत: दूरचित्रवाहिन्यांकडून मोठी अपेक्षा आहे.

*** अकरावे साहित्य व संस्कृती संमेलन**

जगभरातील महिलांच्या वेदनांमधील तीव्रतेत फरक असला तरी महिलांची दु:खे समानच असतात. बांगला देशात डॉ. मोहम्मद युनूस यांनी केलेल्या बचतगटांसारख्या प्रयोगांनीच महिलांचे सबलीकरण होऊ शकेल, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका डॉ. मीना प्रभू यांनी सुवर्णज्योती महिला व युवती मंच आयोजित अकराव्या साहित्य व संस्कृती संमेलनात कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी केले.

डॉ. सत्यपाल सिंग म्हणाले की, समाज प्रगत तेव्हा होतो जेव्हा त्या समाजातील महिला सुसंस्कृत, सुशिक्षित आणि सुरक्षित असतात. ज्या ठिकाणी महिलांना सन्मान मिळतो तेथेच देवाचा अधिवास असतो. कालानुरूप होणारे बदल महिलाच सर्वप्रथम स्वीकारतात, देशाच्या संस्कृतीचे रक्षण केवळ महिलाच करू शकतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी महापौर ॲड. वंदना चव्हाण तर सूत्रसंचालन सुजाता शेणई यांनी केले. आभार वृषाली दाभोळकर यांनी मानले. स्माईल सहेली या संस्थेमार्फत पथनाट्य, संजीवनी बोकील व सहकाऱ्यांचा इंद्रधनु हा कवितांचा कार्यक्रम, मुलींची अंधशाळा कोथरूड यांचा नृत्याविष्कार, हाफ पॅन्ट ही एकांकिका

तसेच बदलत्या जगाचा सक्सेस पासवर्ड या विषयावरील परिसंवाद अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### * 'ड्रीम्स फ्रॉम माय फादर'चे प्रकाशन

''एखादा साहित्यिक आपले शब्द व साहित्यकृती यांच्याशी प्रामाणिक असतो, तेव्हाच ती साहित्यकृती वाचनीय ठरते. 'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' हे पुस्तक म्हणजे आधुनिक अमेरिकेचं बायबल आहे. चौफेर निरीक्षणाची वृत्ती, वकिलीतले ज्ञान, बुद्धिमत्ता व प्रचंड वाचन यातून तयार झालेल्या माणसाचं प्रांजळ आत्मकथन आहे.'' असे मत केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा लिखित 'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' या पुस्तकाच्या मराठी अनुवादाच्या प्रकाशन प्रसंगी व्यक्त केले. या आत्मचरित्राचे अनुवादक व पत्रकार यमाजी मालकर, नीता कुलकर्णी व 'अमेय प्रकाशन'चे प्रकाशक उल्हास लाटकर उपस्थित होते.

शिंदे म्हणाले की आपल्याकडे जातीभेद आहे तसा अमेरिकेत वर्णभेद आहे. तरीही ओबामा अध्यक्ष होण्याचे कारण शोधताना राजकारणाच्या दृष्टिकोनातून असे लक्षात आले की अनेक बाबतीत असमानता असूनही सर्वांना एकत्र घेऊन चालण्याचा मार्ग त्यांनी पत्करलेला दिसतो आणि तिथेच त्यांचे खरे यश आहे. 'ओडॅसिटी ऑफ होप' या ओबामांच्या राजकीय आत्मचरित्राच्या वाचनानंतर, एक उत्तम वक्ता, लेखक, अनेक संस्कृतीचा वारसा लाभलेले व्यक्तिमत्त्व व आत्मशोधाची अनिवार ओढ असणाऱ्या ओबामांना माणूस म्हणून अधिक जवळून जाणून घेण्याच्या इच्छेतून हा अनुवाद केला आहे, असे कुलकर्णी म्हणाल्या.

### * वृत्तपत्रांच्या विरोधामुळे 'गुगल'ने पवित्रा बदलला

वृत्तपत्रे आणि प्रकाशन संस्थांनी एकजुटीने विरोधात आघाडी उघडल्यामुळे ऑनलाईन क्षेत्रातील सर्वोच्च कंपनी गुगलने पवित्रा बदलण्यास सुरुवात केली आहे. 'गुगल'ने 'फास्ट फ्लिप' आणि 'लिव्हिंग स्टोरीज' ॲप्लिकेशन्स ऑनलाईन आणली आहे. 'गुगल न्यूज'च्या अमेरिका पेजवर (http://news.google.com/) दोन्ही ॲप्लिकेशन्स उपलब्ध करून दिली आहेत.

'गुगल' आपला आशय (कंटेन्ट) विनापरवाना आणि विनामूल्य वापरत असल्याचा आरोप अनेक प्रकाशन संस्था, वृत्तपत्रांनी केला होता. ता. ११ जानेवारी रोजी माध्यमसम्राट रुपर्ट मर्डोक यांच्या मालकीची वृत्तपत्रे, प्रकाशने आणि असोसिएटेड प्रेस (एपी) या वृत्तसंस्थेने आपला आशय वापरण्यास 'गुगल'ला बंदी केली. मर्डोक यांच्या मालकीच्या न्यूज इंटरनॅशनलने (टाइम्स) विनापरवाना आशय वापरणाऱ्या वेबसाइटला प्रतिबंध केला. वृत्तपत्रांच्या वेबसाइटवरील आशयाचे 'इंडेक्सिंग' गुगल आणि अन्य वेबसाईट विनापरवाना वापरत आहेत. डिसेंबर २००९ मध्ये भारतात

हैदराबादेत झालेल्या जागतिक वृत्तपत्र संघटनेच्या परिषदेत स्वामित्व हक्काच्या मुद्द्यावरून वृत्तपत्रे आणि प्रकाशन संस्थांनी गुगलविरोधात भूमिका तीव्र केली होती. आता या विरोधाचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर काही प्रकाशनांनी सुरू केले आहे.

दरम्यान, गुगलनेही या बदलांची दखल घेतली असल्याचे जाहीर झालेल्या दोन नव्या ॲप्लिकेशनवरून दिसते आहे. एकीकडे वृत्तपत्रे आणि प्रकाशनांचा विरोध वाढत असताना 'न्यूयॉर्क टाईम्स' आणि 'वॉशिंग्टन पोस्ट'सोबत गुगलने 'लिव्हिंग स्टोरीज' ॲप्लिकेशन सुरू केले आहे. 'गुगल न्यूज' वापरणाऱ्यांना ताज्या आणि सतत बदलणाऱ्या घडामोडींची माहिती या ॲप्लिकेशनद्वारे मिळणार आहे. 'इंडेक्सिंग' न करता प्रकाशनांच्या वेबसाईट्स जशाच्या तशा दाखविणारे 'फास्ट फ्लिप' ॲप्लिकेशनही गुगलने सुरू केले आहे. एकाच वेळी अनेक वेबसाईट्स पाने उलटावीत अशा पद्धतीने 'फास्ट फ्लिप' मध्ये पाहता येतात. वृत्तपत्रे आणि प्रकाशनांचा विरोध सौम्य व्हावा, या उद्देशाने गुगलने नवीन ॲप्लिकेशन्सची रचना केल्याचे मानले जात आहे.

### * बलशाही युवा हृदय संमेलन

''आपल्या जीवनाच्या वाटचालीत स्वत: आनंदी राहून इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करता आला पाहिजे. हाच खरा जगण्यातला आनंद आहे,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी केले.

घोरेवाडी (ता. कऱ्हाड) येथे कऱ्हाडच्या शिवम प्रतिष्ठानच्या वतीने बलशाही युवा हृदय संमेलन झाले. कणकवलीचे आरोग्यतज्ज्ञ व समाजसेवक डॉ. मिलिंद कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन संमेलनाचे उद्‍घाटन झाले. पुणे जलस्वराज्य उपायुक्त डॉ. इंद्रजित देशमुख, माजी खासदार श्रीनिवास पाटील व परिसरातील ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

डॉ. अवचट म्हणाले, ''एखाद्याच्या जीवनात आपला अनमोल क्षण देऊ शकतो हाच खरा जीवनाचा आनंद आहे. जे करायचे आहे ते आपल्या आनंदासाठी करायचे आहे. मात्र, आनंद वाटता आला पाहिजे. माणसांच्या वैयक्तिक स्वप्नांना काहीच किंमत नाही, तसेच तुम्ही जीवनात कसे जगता याला महत्त्व नाही. काय जगता याला महत्त्व आहे.''

आपल्या अवतीभोवती दीनदुबळ्यांच्या व्यथा, समाजात सामाजिक जाणिवेची गरज, वेश्यांच्या समस्या, जीवनात व समाजात किती व काय करायचे आहे याबाबत विवेचन केले. या वेळी त्यांनी 'वैयक्तिक जीवनात अनेक गरीब व दरिद्री लोकांशी संपर्क आला. साहित्य लिहीत असताना वेश्यांच्या जाणिवा या अभ्यासामुळे मी समाजिक क्षेत्रात आलो,' असे सांगून तरुणांशी, समाजाशी बोलणे गरजेचे असल्याचे सांगितले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''तरुणांनी मनाची एकाग्रता वाढविणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमांमुळे जग छोटे होत चालले आहे. त्यासाठी टीव्ही पाहण्यापेक्षा वाचन करणे आवश्यक आहे. वाचनाने मनाच्या शक्तीचा विकास होतो.''

*** संभाजी महाराजांचे वास्तव समाजासमोर येणे गरजेचे**

''छत्रपती संभाजी महाराजांना कौटुंबिक कलहातून निर्माण झालेल्या संघर्षातून बदनाम करण्यात आले. त्यास तत्कालीन साहित्यिकांनी वेगळेच रूप दिले. मात्र, संभाजीराजांचा लिखित इतिहास व वास्तव यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. ते वास्तव समाजासमोर आणण्यासाठी इतिहासाच्या अभ्यासकांनी प्रयत्न करावेत,'' असे आवाहन इतिहासाचे अभ्यासक के. एन. देसाई यांनी कराड येथे 'छत्रपती संभाजीराजे-इतिहास व वास्तव' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत केले.

श्री. देसाई म्हणाले, ''संभाजीराजांना केवळ ३२ वर्षांचे आयुष्य लाभले. मात्र, त्या कालावधीत त्यांनी केलेले काम अद्वितीय आहे. त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य मिळाले नाही. काही बखरकार व साहित्यिकांनी त्यांचे चुकीचे चित्र रंगविले.''

*** इस्लामपूर साहित्य संमेलन**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या इस्लामपूर शाखेच्या वतीने १२ जानेवारी रोजी अठरावे साहित्य संमेलन झाले. लोकनेते राजारामबापू पाटील स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या एकदिवसीय साहित्य संमेलनात उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कारांचे वितरणही झाले.

कृष्णात खोत यांच्या 'रोंदाळा' या कादंबरीला, ऋत्विज काळसेकर यांच्या 'काळोखाच्या तळाशी' या काव्यसंग्रहाला उत्कृष्ट निर्मितीचे पुरस्कार देण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप अनुक्रमे रोख सात व पाच हजार रुपये, गौरवचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. रामराव देशमुख यांच्या हस्ते साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले. स्वागताध्यक्ष श्रीमती वृषाली आफळे होत्या.

*** मरावे परि ग्रंथरूपी उरावे**

'भूतकाळातील अनेक दिग्गज व्यक्तींना काळ हळूहळू विसरतो. त्यामुळेच मरावे परी कीर्तीरूपी उरावे असे सांगण्यात आले आहे. मात्र कीर्ती किती दिवस मागे उरते यावरच आपले अस्तित्व टिकणार असते. इतिहासात अनेक कर्तृत्ववान व्यक्ती आहेत पण त्यातील जे लिहून गेले आहेत तेच आपल्या लक्षात आहेत. त्यामुळे आज मरावे परि ग्रंथरूपी उरावे ही गरज बनली आहे.' अशा शब्दांत वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया यांनी ग्रंथमहात्म्य व्यक्त केले.

उत्कर्ष प्रकाशनाच्या वतीने आयोजित उद्योगपती मदनभाई सुरांचे 'गवसले सूर

जीवनाचे' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ शरदच्चंद्र गोखले यांच्या हस्ते झाले या वेळी सिम्बॉयोसिसचे संस्थेचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, अखिल भारतीय नाट्यपरिषद पुणे शाखेचे डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

धारिया म्हणाले, आजची तरुणपिढी नैराश्याच्या अधीन होऊन आत्महत्यांसारख्या प्रकारांकडे वळत आहे त्यांच्यासाठी सुरांचे पुस्तक हे मार्गदर्शक ठरणार आहे. जीवनातील असंख्य संकटांवर त्यांनी जिगरबाजपणे मात करत जगण्याचा जो आदर्श प्रस्थापित केला ते सगळ्यांना प्रेरणादायी आहे.

मुजुमदार म्हणाले, 'सुरा एकाच आयुष्यात तीन आयुष्य जगले आहेत. सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक अशा तीनही पातळीवर त्यांनी उत्तम काम केले. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे हे स्वभावातून, आयुष्यातून दाखवून दिले. आशावाद ही नैराश्यवादावरील लस आहे.'

*** ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान झाले लेखक**

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान केव्हिन रूड हे सध्या लहान मुलांसाठी गोष्टीचे पुस्तक लिहित आहेत. 'जेस्पर, एब्बी ॲण्ड द ग्रेट ऑस्ट्रेलिया डे करफफले' असे या पुस्तकाचे नाव असून त्यांच्या सरकारी निवासस्थानातील दोन पाळीव प्राण्यांवर हे पुस्तक आधारलेले आहे. ऑस्ट्रेलियन अभिनेता रिस मुलदून यांच्यासोबत रुड हे पुस्तक लिहित असून जस्पर नावाची काळ्या रंगाची मांजर आणि एब्बी नावाच्या कुत्र्याची संपूर्ण कथा यात मांडण्यात आली आहे. या महिन्यातच हे पुस्तक प्रकाशित करण्याची योजना आहे.

*** भारत सर्वांत अग्रेसर देश व्हावा हेच स्वप्न - विजय भटकर**

२१ वे शतक भारताचे असेल. मानवी उत्क्रांतीतील सर्व प्रकाशित ज्ञान एका सुईच्या अग्रभागावर ठेवण्याची किमया या शतकात शक्य होणार आहे. आपला देश जगात सर्वात अग्रणी असेल, असे स्वप्न आपण पाहात होत, असे परम महासंगणकाचे निर्माते ज्येष्ठ शास्त्रज्ञ विजय भटकर यांनी सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवातील 'विज्ञानमहती' कार्यक्रमात सांगितले. डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी त्यांची मुलाखत घेतली. यावेळी शिक्षण उपसंचालक दिनकर पाटील, ग्रंथमहोत्सव समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, कार्यवाह शिरीष चिटणीस, प्राचार्य यशवंत पाटणे उपस्थित होते.

विजय भटकर म्हणाले की, भारताची आद्यसंस्कृती ज्ञानाधिष्ठित आहे. जी जी वस्तू वा ऊर्जा दिसते ते ज्ञानच आहे. मानवी मेंदूमध्ये साठवलेला स्मरणशक्तीचा साठा ही मोठी किमया आहे. देशातील माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामुळे गेल्या तीन वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नात १० पटीने वाढ झाली असून, ते ३०० कोटी वरून ३ लक्ष कोटीपर्यंत पोहोचले आहे. त्यामध्ये टेलिकॉमचे २ लक्ष कोटी असे मिळून एकूण

५ लक्ष कोटी एवढे ते झाले आहे. ही ज्ञानविज्ञानाची किमया आहे. समाजाची धारणा करण्यासाठी ब्रह्मसूत्रे व ज्ञानसूत्रे समजायला हवीत. माझे सर्व जीवन ग्रंथमय आहे. आय. आय. टी.चे शिक्षण घेण्याच्या कालावधीत आपण ७० हजार पुस्तके चाळली असे त्यांनी सांगितले. आपण मराठी माध्यमाच्या एकशिक्षकी शाळेतूनच शिकलो असल्याचे सांगून ते म्हणाले की, ज्ञानाचे अधिष्ठान मातृभाषेतच असते. मात्र उत्तम इंग्रजीचा व्यासंग करण्याची गरज आहे. सन २०२० मध्ये संपूर्ण जगात सर्वात चांगले इंग्रजी जाणणारे भारतीय लोकच असतील. दारिद्र्य हे वरदान नाही, पण त्यावर मात केली. ज्ञान संपादन केलेल्या लोकांनीच असल्याचे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत ८६ देशात अत्यंत गरीब देश होता. आता सन २०१० मध्ये तो चवथ्या क्रमांकावर आला आहे. आपण अपयशातूनच शिकत गेलो. राजीव गांधी यांनी सुपर कॉम्प्युटर बनवण्याची संधी दिली, असे त्यांनी सांगितले.

*** अंबाजोगाईत समरसता संमलेन**

महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात आद्यकवी मुकुंदराज, पासोडीकार दासोपंत यांचे मोठे योगदान राहिले आहे. ८ ते १० जानेवारी या कालावधीत अंबाजोगाई येथे साहित्याचा जागर घातला गेला. समरसता साहित्य परिषदेच्या वतीने अंबाजोगाई येथे बारावे समरसता साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनाचा विषय होता. 'प्रादेशिक साहित्य आणि समरसता'. भव्य ग्रंथदिंडी सर्वांचे चित्त वेधून घेत होती. ८ जानेवारीला सायंकाळी सहा वाजता या संमेलनाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे (नागपूर) हे होते. व्यासपीठावर माजी अध्यक्ष भानु काळे, संस्थेचे अध्यक्ष बाबुलाल कासट, कार्यवाह सतीश पत्की, स्वागताध्यक्ष अशोक सामत, समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष बाळकृष्ण कवठेकर, प्रांत संघचालक दादा पवार, भिकुजी इदाते आणि निमंत्रक प्रा. शंकर धडके हे उपस्थित होते. शाहीर विठ्ठल उमप यांनी अण्णा भाऊ साठे यांची मुंबईची प्रसिद्ध लावणी सादर केली.

उमप म्हणाले की, संतांनी, समाजसुधारकांनी, शाहिरांनी, साहित्यिकांनी समरसतेचा जागर घातला आहे. तो चालूच राहील. कारण समरसता ही माणसाला ऊर्जा देते. या संमेलनातून हा संदेश सर्व दूर पोचावा, असे आवाहनही त्यांनी केले. माजी अध्यक्ष भानु काळे यांनी मर्मग्राही निवेदन केले. स्वागताध्यक्ष अशोक सामत यांनी आपल्या भाषणातून अशा संमेलनाची गरज बोलून दाखवली. गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' या कादंबरीचे अभिवाचन रमेश वाकनीस व संजीवनी तोफखाने यांनी केले तर बी. रघुनाथ यांच्या 'आडगावचे चौधरी'चे अभिवाचन श्रीकांत उमरीकर आणि रंजन कंधारकर यांनी केले.

डॉ. रवींद्र शोभणे यांनी अध्यक्षीय भाषण करताना समाजातील सर्व आव्हाने पेलण्याची ताकद समरसतेत असल्याचे सांगून जाती-पातीच्या, भेदभावाच्या भिंती तोडून समाजाला विधायक दिशेने घेऊन जाणारा समरसतेचा विचार महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट केले.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात 'प्रादेशिक कादंबरी-काल, आज, उद्या' या परिसंवादात डॉ. सतीश बडवे (मराठवाड्यातील प्रादेशिक कादंबरी), प्रा. गोविंद देशपांडे (विदर्भातील प्रादेशिक कादंबरी), संदीप राऊत (कोकणातील प्रादेशिक कादंबरी) आणि सुहास पुजारी (पश्चिम महाराष्ट्रातील कादंबरी) यांनी आपले विचार मांडले. या परिसवांदाच्या अध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सांगितले की, परिवर्तनशीलतेमुळे प्रादेशिक कादंबरीला निरामय व उज्ज्वल भविष्य आहे.

'ललित साहित्यातील प्रादेशिकता' या विषयावर अश्विनी अयाचित (कथा), डॉ. कमलाकर कांबळे (कविता), प्रा. केशव देशपांडे (नाटक) आणि डॉ. दिनकर कुलकर्णी (लोकसाहित्य) यांनी आपली मते मांडली. बदलत्या शहरी जीवनामुळे ललित साहित्यात कसदार साहित्य निर्माण होत आहे.

*** विविध विषयांवरील रचनांनी काव्ययज्ञाची अनुभूती**

प्रदीप निफाडकर, भूषण कटककर यांच्या गजलांतून सरसर धावून येणाऱ्या अर्थपूर्ण शब्दरचनेबरोबरच उद्धव कानडे, प्रकाश पठारे आणि प्रा. चंद्रकांत वानखेडे या त्रिमूर्तींच्या पहाडी आवाजातील विविध विषयांवरील कवितांनी सातारा ग्रंथ महोत्सवाच्या सभामंडपात काव्य यज्ञाचीच अनुभूती दिली. निफाडकरांच्या 'माझी मुलगी'ने उपस्थितांचे डोळे पाणावले आणि काव्य मैफलीचा माहोलच बदलून गेला.

सातारा ग्रंथ महोत्सवात प्रारंभीच्या सत्रात प्रसिद्ध गजलकार प्रदीप निफाडकर आणि भूषण कटककर यांनी सादर केलेल्या उत्तमोत्तम रचनांना उपस्थितांनी दाद दिली.

*मी एक कवी छोटासा*
*बदलून टाकतो दुनिया*
*मी प्रेम म्हणालो आणिक*
*जग प्रेमळ बनले होते*

कवी आणि रसिक या दोघांचीच जीवन जगण्याची पात्रता असल्याचे सांगत काव्यातून जग प्रेमळ केल्याचा दाखला निफाडकरांनी दिला.

*एक रस्ता रुंद होतो*
*पाडूनी काही घरे*
*वेदना ती जात नाही*
*बांधुनी काही घरे*

अशी रचना सादर करून कटककरांनी काव्यरसिकांच्या मनात चांगलेच घर केले.

स्वत:च्या कष्टाळू, प्रेमळ आणि कणखर मुलीची गुणवैशिष्ट्ये सांगत काळजाचा ठाव घेणारी काव्यरचना सादर केली. बापाचा कर्जाचा डोंगर हटविण्यासाठी मुलाप्रमाणे स्वत: राबणाऱ्या कन्यारत्नाचे वर्णन ऐकून उपस्थित प्रत्येक जण भावविवश झाला आणि अनेकांच्या डोळ्यांतून पाझरणाऱ्या आसवांतूनच त्या रचनेस दाद मिळाली.

*भांडून यार गेला नाही रगेल पण तो*
*लक्षात चूक येता मागे वळेल पण तो*
*खांद्यावरून त्याच्या जाईन एकदा मी*
*घ्या सावरून त्याला जेव्हा रडेल तो*

या मित्राची खासियत सांगणाऱ्या रचनेलाही उपस्थितांनी दाद दिली.

काव्यमैफलीच्या दुसऱ्या सत्रात पठारे, वानखेडे व कानडे या त्रिमूर्तींनी 'बोल कविते बोल' हा आगळा वेगळा कार्यक्रम सादर करून विविधांगी रचनांनी उपस्थितांना जिंकले.

*इंग्रजीचे पंख घेऊन । आकाशात भरारी घेऊ*
*न चुकता कपाळावर । मराठीचा टिळा लावू*

या रचनेतून प्रकाश पठारे यांनी मराठीचा अभिमान सादर केला, तर प्रा. वानखेडे यांनी सादर केलेल्या

*अमृतासमान वाणी काळजाचं होई पाणी*
*शब्दकोशातून येती । वसंतांची लाखो गाणी*

या कवितेतून मराठी भाषेच्या थोरवीविषयी रसिकांना साद घातली

*तो चंद्रही भुकेला*
*ती चांदणी उपाशी*
*आकाश मूक सारे*
*मी बोलते कुणाशी*

असे सांगत प्रेमकवितेचा नमुनाही त्यांनी सादर केला.

मोबाईलवर प्रत्येक जण पहिला शब्द विचारतोस 'कुठंयस तू?' या स्वभाववैशिष्ट्यावर आधारित पठारे यांनी म्हटलेल्या काव्यासही चांगलाच प्रतिसाद मिळाला, तर वानखेडे यांनी सादर केलेला 'लोकशाहीचा गोंधळ' व 'क्रिकेटपटूंचा पाळणा' कणखर आवाजामुळे आणि विसंगतीपूर्ण वास्तवामुळे अनेकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे चांगलाच खुलला.

विविध गायक, संगीतकार व सेलिब्रिटींच्या पंगतीचे वर्णन सादर करताना जेवणातील पदार्थ मागताना गाणे सादर करण्याच्या अटींमुळे निर्माण झालेले विडंबन गाऊन पठारे यांनी 'मिमिक्री'ची झलक दाखवली.

*काळजाच्या पाखराला, पेटताना पाहिले*
*मीच माझ्या आसवांना, गोठताना पाहिले*

अशा शब्दरचनेतून प्रा. वानखेडेंनी कवितेचे मैदान जिंकले आणि नारायण सुर्वेंनी त्यांना दिलेल्या 'वानखेडे स्टेडियम' या संबोधनाचे सार्थक केले.


कवितांचा कार्यक्रम आणि 'आई' चा उल्लेख नाही, असे शक्यतो कधीच होत नाही. आजच्या कार्यक्रमात दोन्ही सत्रांतील कवींनी आईविषयक कविता सादर करून मातृप्रेमाची थोरवी गायली.

*दुःख आईला विचारा, दुःख भुईला विचारा*
*कसं फाटतं काळीज, दुःख आईला विचारा*

ही वानखेडेंची कविता अनेकांच्या मनाला स्पर्श करून गेली.

'का. प. वा.' या त्रिमूर्तींनी सादर केलेल्या 'बोल कविते बोल' या विविध रचनांच्या कार्यक्रमाने चांगलीच दाद मिळवली आणि

'केव्हा तरी कोठे थांबायचे आहे, सारे धागे पुन्हा उसवायचे आहे' अशी सामूहिक रचना करीत या रंगलेल्या भावस्पर्शी मैफलीची सांगता केली. ❐



**आगामी**

# कोल्ड स्टील

**टीम बुके । बायरॉन उसी**
अनु. सुभाष जोशी

''गी, मी लक्ष्मी मित्तल बोलतो आहे. मी केवळ औपचारिकपणे हा फोन करतो आहे आहे. उद्या मित्तल स्टील तुझ्या भागधारकांसमोर आर्सेलरच्या शेअर्ससाठी थेट प्रस्ताव मांडणार आहे हे सांगण्यासाठी.''
''ही तर एकप्रकारची लढाईच आहे,'' जॉन कास्टेगन्रो जाहीर करतो. ''आपण आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढलं पाहिजे.''
मित्तलचा प्रस्ताव आर्सेलरचे संचालकमंडळ एकमुखाने फेटाळून लावते.

# विशेष वार्ता



### * शुभदा गोगटे यांना बनहट्टी कथा पुरस्कार

अद्भुताचे आकर्षण ही एक वैश्विक भावना आहे. प्रत्येकाला त्याचे आकर्षण असतेच. अशा या अद्भुताला लेखणीच्या माध्यमातून साद घालणे, गूढतेला कवेत घेणे हे काम प्रतिभावंत लेखक करू शकतो. असे मत डॉ.माधवी वैद्य यांनी व्यक्त केले.

पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने 'राजेंद्र बनहट्टी कथा'पुरस्कार शुभदा गोगटे यांना 'घर' या कथासंग्रहासाठी देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप पाच हजार रोख व मानपत्र असे होते. यावेळी ग्रंथालयाचे अध्यक्ष मोहन दाते, कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ आदी उपस्थित होते.



**पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने 'राजेंद्र बनहट्टी कथा'पुरस्कार शुभदा गोगटे यांना डॉ.माधवी वैद्य यांच्या हस्ते देण्यात आला.**

त्या म्हणाल्या, ‘अनेकांनी समर्थपणे अद्भुत रम्य कथा लिहिल्या. लोकांना झपाटून टाकणाऱ्या या कथा असतात. या कथा असतात. या कथा प्रकारांना वाङ्मयप्रकाराचे मूल्य देण्याचे काम वि. सी. गुजर यांनी केले. प्रत्येकाला आपल्या आयुष्यात गूढ प्रसंग यावेत असं वाटतं. गूढत्व मनावर पकड निर्माण करत असतात. त्यामुळे गूढतेच्या पातळीवर कथा रंगवायला शब्द सामर्थ्य आणि निवेदनशैली विलक्षण असावी लागते. गोगटे यांच्या लिखाणात ही शैली सापडते. त्यांच्या कथेतील गूढत्व कुठेही सुटत नाही व मनाला अंतर्मुख करत जातात.’

*** उजळाईवाडी (कोल्हापूर) येथे लेखकांचा गौरव**

उजळाईवाडी या कोल्हापूर जिल्ह्यातील छोट्याशा गावातील प्रा. चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालयात दि. १२ जानेवारी रोजी ग्रंथपुरस्कार प्राप्त लेखक सुप्रिया वकील, मीनाक्षी सरदेसाई, रजनी हिरळीकर, श्याम कुरळे, सुनीलकुमार सरनाईक यांचा रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसचं याप्रसंगी उद्योजक अनिल लोहार, उदयोन्मुख क्रिकेटपटू चेतन मछले आदींचाही सत्कार करण्यात आला.

“कोणताही लेखक पुरस्कारासाठी लिहीत नसतो तर त्याच्या जाणिवेतून लेखन होत असतं मात्र अशा लेखकांचा सन्मान झाल्यास नवनिर्मितीची प्रेरणा मिळते.” असे मत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य रा.रं बोराडे यांनी व्यक्त केलं.

या कार्यक्रमाला गीतकार जगदीश खेबूडकर, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत कोले, चंद्रकुमार नलगे वगैरे उपस्थित होते.



**मा. जगदीश खेबूडकर यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना लेखिका सुप्रिया वकील**

# दखल

## * कविवर्य पाडगावकरांना 'विश्व' साहित्याची मानवंदना

दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सन्मानाने निवड झाल्यामुळे कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी त्याला मान्यता दिली आहे. अध्यक्षीय निवडणुकीला विरोधाची त्यांची आरंभापासूनची जी भूमिका होती तिचाही त्यामुळे मान राखला गेला आहे.

मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा एक सन्मान आहे आणि या सन्मानासाठी निवडणुकीच्या रणधुमाळीची गरज नाही अशी काहाशे मान्यवर साहित्यिकांची भावना आहे. अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रक्रियेत लोकशाहीचा अवलंब हा मर्यादित मतदार संख्येमुळे अनावश्यक आहे असे त्यांना वाटते. ही निवडणूक दोन तुल्यबळ दिग्गजात असेल तरी मतदारांपुढे पेच उभा राहतो आणि ती निखळ सर्जनशील साहित्यकार व त्याच्या तुलनेने दुय्यम वा तरुण पत्रकारितेच्या अंगाने लेखन करणारा लोकप्रिय लेखणी बहाद्दर अशा व्यक्तीत असली तर आपल्याच मस्तीत व कोशात मग्न असणाऱ्या सर्जनशील साहित्यकारावर पराभूत होण्याची नामुष्की येते अशीही उदाहरणे आहेत. अशा वेळी या निवडणुकीच्या मतदारांची वाङ्मयीन मूल्यनिष्ठाच संशयास्पद ठरते. त्यामुळे दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कविवर्य मंगेश पाडगावकरांची सन्मानाने झालेली निवड रसिकांना निश्चितच आनंद देणारी ठरते.

आजच्या अग्रगण्य मराठी कवींमध्ये मंगेश पाडगावकर यांच्याएवढा सातत्याने काव्यलेखन करणारा आणि लोकप्रियता टिकवून असलेला दुसरा कोणी कवी दाखवता येणार नाही. वयाच्या चौदाव्या वर्षापासून सुरू झालेले त्यांचे कवित्व आज ऐंशीच्या टप्प्यावरही टवटवीत आहे. मार्च (२००९) मध्ये त्यांचा 'शब्द' हा २६वा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. आश्चर्य म्हणजे त्यांच्या बहुतेक सर्व काव्यसंग्रहांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. 'बोलगाणी'च्या २० वर्षात सतरा आवृत्त्या निघाल्या. 'तुझे गीत गाण्यासाठी'च्या दहा आवृत्त्या निघाल्या. 'जिप्सी'च्या सोळा आवृत्त्या निघाल्या. 'सलाम'च्या आठ, उदासबोधच्या सात, गझल, वात्रटिका यांच्या प्रत्येकी सहा... असे भाग्य मराठीतील दुसऱ्या कोणीही समकालीन कवीला लाभलेले नाही. 'धारानृत्य'

हा त्यांचा पहिला संग्रह १९५० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यापाठोपाठ 'जिप्सी' १९५३मध्ये बाजारात आला आणि पाडगावकरांनी तरुण मनांना एक नवे स्वप्न, एक नवे जीवनाचे भान दिले. केशवसुतांच्या 'नवा शिपाई' प्रमाणेच पाडगावकरांचा हा जिप्सी कुठल्याही कुंपणात स्वत:ला बंदिस्त करून न घेता विश्वभर संचार करण्यास आणि या सृष्टीच्या विविध विभ्रमांचा निर्लेप निरामय मनाने आदर करण्यास सिद्ध आहे. कुठलीही बंधने त्याला मान्य नाहीत. कुठलीही क्षुद्रता, संकुचित कूपमंडूप वृत्ती त्याला आवाहन करू शकत नाही.. 'जिप्सी'पासून पाडगावकरांची जी प्रतिमा मराठी तरुणवर्गामध्ये रुजली, ती 'प्रेम म्हणजे प्रेम असते, तुमचे आमचे सेम असते'पर्यंत सतत रसिक मनाला आल्हाद देत राहिली. प्रेमकविता, निसर्गकविता यांच्यापासूनच पाडगावकरांच्या काव्यलेखनाचा आरंभ झाला पण त्यातही त्यांचा जीवनविषयक स्वागतशील उन्मुक्त वृत्तिविशेष अनंत रूपे प्रकट करीत राहिला. समकालीन समाजवास्तवाने अस्वस्थ झाल्यावर वात्रटिका, उदासबोध, सलाम, मोरू, मुखवटे अशा उपरोधपूर्ण आविष्काराचाही झपाटा चालू राहिला. पण त्यातही आक्रस्ताळेपणा किंवा शेरेबाजी यांचा लवलेश नव्हता. पाडगावकरांची कविता ही वाचकांपर्यंत सातत्याने जात राहिली. त्यांची भावगीतेही अरुण दाते, यशवंत देव वगैरे संगीतकारांकडून रसिकांपर्यंत पोचत राहिली.

विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर या तिघांनी मिळून 'काव्यदर्शन' हा कार्यक्रम १९६१ पासून सुरू केला. (मी पहिल्या प्रयोगाला उपस्थित होतो.) पुढे त्यांनी महाराष्ट्रभर दौरे केले. या कार्यक्रमांमुळे 'रविकिरण मंडळा'नंतर पुन्हा एकदा कविता वाचनाला प्रतिष्ठा लाभली. कविता श्रवणाचा आनंद अनुभवण्याची मानसिकता तयार झाली. 'काव्यदर्शन'चे कार्यक्रम कधी कधी तिकीट लावून होत. त्यामुळे कविताश्रवणासाठी काही पैसेही खर्च करायला हवेत अशीही तयारी रसिकांची होत गेली. हे तिघे कवी काव्याच्या प्रसिद्धीसाठी आणि कवितावाचनासाठी मानधनाची मागणी करू लागले आणि रविकिरण मंडळाचा कवींनी स्वत: पदरमोड करून कवितावाचनासाठी जाण्याचा प्रघात मोडीत निघाला. 'काव्यदर्शन'च्या लोकप्रियतेला बापट-करंदीकर-पाडगावकर यांच्या कविता सादरीकरणाच्या कौशल्याने फार मोठा हातभार लावला. कविता नखरेलपणे, नजाकतीने सादर करता येते तशीच पहाडी आवाजात आवेशाने आणि आक्रमकपणेही करता येते हे लक्षात घेऊन रंगमंचीय सादरीकरणाच्या दृष्टीने कवितांची निवड करण्याची दक्षता या तिघा कवींनी आंरभापासूनच घेतली. त्यामुळे रसिकांना या कार्यक्रमांची मोहिनी पडत राहिली. काव्यविषयक जाणीव प्रगल्भ होण्यासाठी या कार्यक्रमांचा हातभार लागला.

पाडगावकरांनी पुढे बालगीतेही लिहिली. संत मीरा, संत कबीर, सूरदास यांच्या

निवडक रचना मराठीत आणल्या. शेक्सपियरच्या द टेम्पेस्ट, ज्यूलिअस सीझर, रोमिओ अँड ज्यूलिएट या नाटकांचे मूळाबरहुकूम भाषांतर केले. त्यांच्या पत्नी यशोदा या ख्रिस्ती आहेत. त्यामुळेच की काय, बायबलच्या नव्या कराराचेही मराठी भाषांतर केले. दिसामाजी काहीतरी लिहावे हे व्रत निष्ठापूर्वक जोपासले. त्यामुळे त्यांची ग्रंथसंपदा चाळीसाच्या पुढची मजल गाठू शकली. ललित लेख आणि नाटिका यांचे त्यांनी अल्पस्वल्प लेखन केले; परंतु कवितालेखन हाच त्यांनी आपला धर्म मानला. आपली प्रतिभाशक्ती कवितेच्या चरणावरच त्यांनी एकवटली. काव्याचीच अखंड आराधना त्यांनी केली. अन्य आकृतिबंधांचा मोह धरला नाही.

पाडगावकरांच्या काव्यक्षेत्रातील वाटचालीत अनुभूतीची प्रगल्भता व परिपक्वता प्रकट होते. त्यांच्या जीवनविषयक भूमिकेत सातत्य असले तरी निरीक्षणात आणि आविष्कारात अंतर्भेदकपणा अधिक जाणवतो. 'शब्द' (२००९) या त्यांच्या ताज्या काव्यसंग्रहात सद्य:स्थितीवरचे मार्मिक भाष्य दिसते. आजच्या विसंवादाने, दांभिकतेने ते उद्विग्न होतात.

'नवं राज्यशास्त्र' या कवितेत विद्यापीठांना अजून नव्या राज्यशास्त्राचे महत्त्व का कळत नाही असा सवाल ते करतात. हे नवं राज्यशास्त्र म्हणजे काय हे ते स्पष्ट करतात.

*घरं जाळायची, दुकानं फोडून लुटायची,*
*रस्त्यावर टरकलेल्या माणसांची पाकिटं खेचायची,*
*जातींची, धर्मांची भोसकाभोसकी साधायची,*
*खिडक्या बंद, घरं बंद, शाळा बंद, हॉटेल बंद,*
*असा हा कडेकोट बंदबस्त सर्वत्र जरब पसरलेली,*
*गालगुंडांनी थोबाड सुजल राज्यशास्त्र रस्त्यावर आलेलं!*

'रस्त्यावर उभ्या असलेल्या' या नव्या राज्यशास्त्राची विद्याशाखा उघडून विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना लुटालूट, तोडफोड, गुंडगिरी, धाकदपटशा, दहशतवाद वगैरे विषयांचे धडे द्यायला हवेत... असे कवी सुचवतो. या विद्याशाखेला तरबेज प्राध्यापकांची उणीव भासणार नाही कारण ही जबाबदारी पेलणारे झुंजार राजकीय नेते आपल्याकडे विपुल आहेत. लोकशाहीच्या नावावर ते काहीही करायला मागेपुढे बघत नाहीत.

लोकशाहीत जनतेला मत देण्याचा, हात वर करण्याचा अधिकार आहे. पण हा हात वर करण्याचा आदेश देणारा कोणीतरी 'तुम्ही' असतो. त्याच्या इच्छेप्रमाणे हात वर करण्याची जनतेला, मतदाराला सवय झाली आहे.

*तुमच्या इच्छेप्रमाणे मी*
*करीत राहिलो कवायत माझ्या जगण्याची*
*ही सवय हेच माझे जगणे झाले...*

*ही सवय हेच माझे जगणे झाले.*

*माझा मी असण्याचे आता भय गेले.*

राज्यकर्ते एकीकडे देशात शांतता नांदावी असे म्हणतात, नागरिकांना तशी आश्वासने देतात. परंतु दुसरीकडे शस्त्रास्त्रांनी लष्कराला सुसज्ज करण्यावर भर देतात.

''आम्हाला युद्ध नको आहे'' असे म्हणत शस्त्रास्त्रांचे कारखानदार शस्त्रे विकतात.

''आम्हाला युद्ध नको आहे'' असे म्हणत राज्यकर्ते शस्त्रे विकत घेतात.

शस्त्रास्त्रे विकत घेणारे राज्यकर्ते स्वदेशात येऊन युद्धाची तयारी करतात.

शस्त्रास्त्रे विकणारे नव्या शस्त्रास्त्रांची मोठी ऑर्डर येणार म्हणून तयारी करतात.

नव्या नव्या आकर्षक घोषणांचे सगळेच कारखानदार असतात.

जुनेच शब्द नव्याने पॉलीश करून वापरण्यात येतात.

अशी दुटप्पी वृत्ती हा आपल्या जगण्याचा स्थायीभाव बनला आहे.

झोपडपट्ट्यांत माणसं कशीबशी जगत असतात. कष्टाचं सगळं त्राण उगारून जिवंतपणी मेल्यासारखी ती आपल्या आयुष्याला चिकटून असतात. त्या झोपडपट्टीच्या जागेवर चौदा मजली इमारत उभी राहू लागते तेव्हा जवळच्याच दुसऱ्या मोकळ्या जागेवर झोपडपट्टीतली माणसं आपला बाडबिस्तरा हलवतात. घासलेटच्या दिव्याच्या आजारी उजेडात दाराशी कुठल्याशा देवाची तसबीर लावून आता तरी काम मिळू दे, पोटाची खळगी भरू दे म्हणून करुणा भाकत असतात.

एका कवितेत एक गोष्ट आली आहे.

या बदलत्या पर्यावरणात टीव्ही न बघता अंगणातल्या तीन हिरव्या झाडांकडे बघणाऱ्या माणसाला त्याचे सर्व शेजारी वेडा मानतात. पोलिसांकडे तक्रार करतात. पोलीस त्याला वेड्यांच्या इस्पितळात नेतात. तेव्हा डॉक्टर पोलिसांना म्हणतात, ''याला घेऊन जा येथून. हा आम्हाला वेड लावील. मला स्वत:ला खिडकीतून तीन वेडे दिसतात तरीही हा म्हणतो, त्याला तेथे तीन झाडे दिसतात. असे झाले तर माझा चरितार्थ कसा चालेल?'' तेव्हा पोलीस रस्त्यावरची ती तीन झाडेच उपटून फेकून देण्याची योजना आखतात.

अशासारखी उपरोधिक कहाणी पाडगावकर सांगतात आणि आपल्या बधिरलेल्या संवेदनांना गदागदा हादरा देतात. पाडगावकरांची प्रतिभा थक्क करते.

विश्व मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणाऐवजी मुलाखतीचा अवलंब पाडगावकर करणार आहेत. हेही एक नावीन्य ठरेल.

ऐंशीचा टप्पा ओलांडूनही सृजनशील प्रतिभा चैतन्यमय राहिलेल्या कविवर्य पाडगावकरांच्या परिणतप्रज्ञ चिंतनाने दुबईची मरूभूमी बहरून येवो. 'हे विश्वचि माझे घर' असा प्रत्यय सर्वांना येवो. ❐

## * 'चित्रलिपीला' साहित्य अकादमी पुरस्कार

कवी वसंत आबाजी डहाके यांच्या चित्रलिपी या काव्यसंग्रहाला यंदाचा (२००९) साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे डहाके हे आता कवी अनिल (दशपदी १९७७), आरती प्रभू (नक्षत्रांचे देणे १९७८), मंगेश पाडगावकर (सलाम १९८०), इंदिरा संत (गर्भरेशीम १९८४), ना. घ. देशपांडे (खूणगाठी १९८६), दिलीप पुरुषोत्तम चित्रे (एकूण कविता भाग १, १९९४), ना. धों. महानोर (पानझड २०००), अरुण कोलटकर (भिजकी वही २००५), या अष्टकवींच्या पंक्तीत विराजमान झाले आहेत. आता मराठी कवींचा हा नवरत्न दरबार म्हणायला हरकत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील बेलोरा येथे ३० मार्च १९४२ रोजी जन्मलेले डहाके अमरावतीला शिक्षणासाठी स्थलांतरित झाले. ग्रामीण भागात बालपण गेल्याने कृषिसंस्कृतीचे सखोल संस्कार असलेले डहाके अमरावतीच्या नागर उच्चभ्रू समाजात वावरताना काहीसे विमनस्क, उद्विग्न झाले असावेत. आपल्या शेतातली माती, झाडेझुडपे, पीकपाणी, जनावरे, घराचा परिसर, जवळची माणसे, निसर्गाची बदलती रूपे यांचे स्मरण व्यक्त करण्याचे साधन म्हणून कवितेचे स्फुरण त्यांना होत राहिले आणि १९६० साली वयाच्या १८व्या वर्षी त्यांची पहिली कविता सत्यकथा मासिकात छापून आली. सत्यकथेत कविता येणे याचा अर्थ आधुनिक समकालीन उच्चकलाभ्रू प्रतिभावंत या जमातीचा टिळा लागणे. १९६६ साली योगभ्रष्ट या दीर्घकवितेलाही सत्यकथेत स्थान मिळाले आणि वसंत आबाजी डहाके हे नाव नावीन्याच्या शोधात असणाऱ्या चोखंदळ रसिकांच्या मनावर कोरले गेले. आपल्या काव्यलेखनाला पोषक ठरणाऱ्या प्राध्यापकी पेशात ते शिरले आणि समाजवास्तवाचे परखड, भेदक, वास्तव चित्रण करण्यात ते रमले. योगभ्रष्ट हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९७२ मध्ये म्हणजे वयाच्या तिसाव्या वर्षी प्रसिद्ध झाला. अधोलोक ही कादंबरी १९७५ मध्ये प्रकाशित झाली. प्रतिबद्ध आणि मर्त्य या कादंबऱ्या १९८१ मध्ये बाजारात आल्या. पण काव्याचीच ओढ अधिक बलवत्तर असल्याने १९८७ मध्ये 'शुभवर्तमान' हा संग्रह प्रसिद्ध झाला. तब्बल १३ वर्षांनी यात्रा-अंतर्यात्रा हा चिंतनपर लेखांचा संग्रह आला. मुंबईत अध्यापन करीत असताना त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले. कविता म्हणजे काय? (१९९१), समकालीन साहित्य (१९९२), कवितेविषयी (१९९९), यातून त्यांच्यातील साक्षेपी समीक्षकाचे दर्शन घडले. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोशाला त्यांनी लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनांनी त्यांच्या चौफेर व्यासंगाची प्रचीती आली. राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्याची धुराही त्यांच्यावर येऊन पडली. २००६ मध्ये चित्रलिपी हा शंभर कवितांचा संग्रह लोकवाङ्मयने

प्रकाशित केला. याला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याने गेल्या ५० वर्षातील त्यांच्या साहित्य सेवेवर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाले. समीक्षक आणि कवी या दोन्ही नात्यांनी ते आता परिपक्व, प्रगल्भ ठरले आहेत.

योगभ्रष्ट आणि शुभवर्तमान या दोन्ही काव्यसंग्रहात आधुनिक नागर जीवन व्यवहारात जाणवणाऱ्या उपरेपणाचा, परात्मभावाचा, औदासीन्याचा प्रत्यय येत राहतो. समाजातील भ्रष्टाचार आणि त्यापुढे आपणास जाणवणारी अगतिकता, अस्वस्थता त्यांच्या कवितेमध्ये पुन: पुन्हा येत राहिली.

शहरी जीवनातील अनिश्चितता, गुंडगिरी, दहशत त्यांना मनोमन सतावत राहते. हा आजच्या काळाचा युगधर्म बनून राहिला आहे असे त्यांना वाटते. पणजीला साधना साहित्य संमेलनात कवितेवर बीजभाषण करताना ते म्हणाले, कवितेचा रस्ता हा व्यावहारिक जगाच्या राजधानीकडे जाणारा नाही. तो शब्दांच्या पलीकडच्या मोकळ्या प्रदेशाकडे घेऊन जाणारा रस्ता आहे. तेथे कवीने आपल्या कवितेसह जात रहायला हवे. कवीजवळ स्वत:ची निश्चित दृष्टी असेल तर उत्तम कविता लिहिली जाईल.

डहाके यांच्या योगभ्रष्ट पासूनच्या सर्वच काव्यलेखनात ही निश्चित दृष्टी जाणवत राहते असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या मूलभूत दृष्टिकोनात बदल घडावा असे परिवर्तन समाजवास्तवात घडलेले नाही.

या वेळी त्यांनी कवितेबाबत पाच सूत्रे सांगितली.

१. कवीपेक्षा कविता महत्त्वाची असते.

२. कवीकडे निश्चित दृष्टिकोन असला तर कवितालेखन होत राहते.

३. स्वत:चे भाव व्यक्त करण्याला प्रतिबंध करणाऱ्या वातावरणात कविता ही एक विसरून जाण्याची वस्तू बनू शकते.

४. अर्थ हे कवितेचे प्राणतत्त्व आहे.

५. काव्य हेच कवीचे सर्वस्व आहे.

'चित्रलिपी' या संग्रहातील काही कवितांमधून डहाके यांची काव्यविषयक व निर्मितीविषयक भूमिका प्रकट होते. (उदा. लिहिणं, कवितेचा अर्थ, उच्चार, वाक्य)

काही कवितांमधून ग्रामीण कौटुंबिक दृश्यांची पृथगात्मकता प्रकट होते.

*आता आम्ही जवळजवळ टाकूनच दिलेल्या घराच्या अंगणात*
*ताई आत्या अभी असायची एकटीच*
*कुठंच लक्ष नसल्यासारखी*
*डोळ्याभोवतालची काळी वर्तुळं घेऊन*
*आणि पलीकडे छपरीतल्या झोपाळ्यावर तानबाकाका*
*स्वत:तली स्तब्धता झोपाळ्याच्या गतीत गोठवून*
*त्याचं एकटेपण घर व्यापून बाहेर अंगणात पसरलेलं.*

आपल्या खेड्यातल्या घराचे, घरातील माणसांचे आणि घराभोवतालच्या परिसराच्या वेगवेगळ्या निसर्ग विभ्रमांचे स्मरणरंजनात्मक चित्रण करताना एक प्रकारची उदासीनता, अस्वस्थता प्रकट होते. चक्कीवाला ही कविता एकीकडे पाठीच्या गिरणीतले वर्णन करता करता सद्य जीवनावर भाष्य करते. ''चक्की पिसत असते ज्वारी गहू बाजरी आणि माणसाचं कष्ट करणं,'' घराच्या मालकिणीवरची कविताही अशीच चटका लावणारी आहे.

महानगरी दंगलीनंतरच्या वातावरणाने सामान्यांच्या डोळ्यात ज्वाळा पेटेल का असा प्रश्न ते विचारतात. पुस्तके छापण्यासाठी कागद तयार करावा लागतो. त्यासाठी झाडे तोडावी लागतात. त्याऐवजी सरळ झाडेच वाचावीत असा सल्ला कवी देतो. ''माझ्या भावा, दादा ऊठ. दिगंबर आहेसच आता नागवा हो.'' असा इशाराही ते देतात. भ्रष्ट इच्छांचं अमूप पीक उगवलेलं आहे, वर्तमानाच्या अंधारलेल्या गल्लीबोळातून जड पावलांनी चालत जाण्याशिवाय गत्यंतर नाही, सगळीच मेंढरं सुरीखाली आहेत अशी भयकंपित करणारी जाणीव 'चित्रलिपी'मध्ये पुन:पुन्हा प्रकट होते. वसंत आबाजी डहाके यांच्या काव्याकडे आणि विचारांकडे साहित्य अकादमीच्या पुरस्कारामुळे अधिकाधिक वाचकांचे लक्ष जायला हरकत नाही.

## * एनिड ब्लायटन

बालसाहित्यात गेल्या शतकात सर्वाधिक खपाच्या सातशे त्रेपन्न पुस्तकांची घसघशीत भर घालणाऱ्या एनिड ब्लायटनच्या कथाकादंबऱ्यांनी जगभराच्या बालवाचकांच्या तीनचार पिढ्यांचे भावजीवन आणि कल्पनावैभव समृद्ध केले आहे.

११ ऑगस्ट १८९७ रोजी जन्मलेल्या एनिडला बालवयातच चित्रकार कवी असणाऱ्या वडिलांच्या प्रभावाने वाचनाची गोडी लागली आणि ॲलिस इन वंडरलँड, लिटल वुमेन, दि प्रिन्सेस अँड द गोबलिन, दि कोरल आयलँड यासारख्या पुस्तकांनी तिला झपाटून टाकले. वडिलांबरोबर लंडनमधील क्लॉकहाऊस रोडवरच्या प्रशस्त घराभोवतालच्या बागेत ती हिंडत असे. रंगीबेरंगी फुले, झाडे, पक्षी, कीटक, फुलपाखरे न्याहाळत असे. त्यांच्या हालचालींचे, बदलणाऱ्या रूपसौंदर्याचे निरीक्षण करीत असे. निसर्गातील प्रत्येक घटक तिला मित्रासारखा वाटत असे. वडील टॉमस ब्लायटन तिच्या शंकाकुशंकांनी, प्रश्नांनी स्तिमित होत. तिला गोष्टी सांगत. तिच्या कल्पनाशक्तीचा आवाका त्यांना चक्रावून सोडत असे. दहाव्या वर्षी एनिडला त्यांनी सेंट ख्रिस्तोफर्स स्कूल फॉर गर्ल्स या बेकेनहॅममधील शाळेत घातले. एक हुशार आणि सर्वांत मिसळणारी गोड मुलगी म्हणून ती प्रसिद्ध होती. संगीताचाही ती अभ्यास करीत होती. आपल्या दोन मैत्रिणींच्या मदतीने तिने एक हस्तलिखित मासिकही काढले. एनिडच्या कथा, मेरीची चित्रे आणि मिराबोलच्या कविता यांनी तो

अंक सजला होता. कधी कधी एनिड खोडकरपणाही करीत असे. मुलींच्या खोड्या काढत असे. त्या खोड्यांबद्दलच्या गोष्टीही लिहीत असे. चौदाव्या वर्षी काव्यरचनेबद्दल तिला एक पुरस्कार मिळाला. आर्थर मी या बालसाहित्यकाराने व संपादकाने तिला उत्तेजन दिले. तिच्या कविता छापल्या. 'हॅव यू' ही तिची कविता नॅश मॅगेझिनमध्ये १९१७ साली छापून आली.



१९१६ मध्ये इडा हंट या शिक्षिकेची आणि तिची गाठ पडली. इडा हंटबरोबर संडे स्कूलमध्ये मुलांचे वर्ग घेण्यात तिला आनंद वाटू लागला. मुलांशी संवाद साधण्याची हातोटी आपल्यात आहे हे तिच्या लक्षात आले. इप्सविच हायस्कूलमध्ये किडंर गार्टन टीचर म्हणून ती प्रशिक्षण घेऊ लागली. पाच वर्षात तिने अध्यापन कौशल्य तर संपादन केलेच, कथाकवितांचे लेखनही झपाट्याने सुरू केले.

काव्यरचनांचे तिचे पहिले 'चाइल्ड व्हिसपर्स' हे संकलन १९२२ मध्ये निघाले. त्यानंतरच्या दोनतीन वर्षात रिअल फेअरीज, रिस्पॉन्सिव्ह, सिंगिंग गेम्स, साँग्ज ऑफ ग्लॅडनेस, दि झू बुक, बुक ऑफ फेअरीज वगैरे पुस्तके प्रसिद्ध झाली. पुढे तिने आपल्याच घरी पूर्व प्राथमिक शाळाही सुरू केली. १९२४ मध्ये ब्लायटनने ह्युज पोलोक यांच्याशी लग्न केले. ह्युज पोलोक हा लंडनमधील स्टिफन अँड पोलोक या ग्रंथविक्री व प्रकाशन संस्थेच्या भागीदाराचा मोठा मुलगा. तो न्यूनेस प्रकाशन संस्थेत संपादक म्हणून काम करीत असे. एनिडच्या पुस्तकांचे संपादन करताना एनिडच्या प्रेमात तो पडला. त्याची परिणती दोघांच्या विवाहात झाली. एनिडला दोन मुली झाल्या. एनिडची पुस्तकेही लोकप्रिय होऊ लागली.

१९३५ मध्ये चर्चिलचे दि वर्ल्ड क्रायसिस हे पुस्तक पोलोकने काढले. पहिल्या महायुद्धाबद्दल चर्चिलशी त्याची सतत चर्चा चाले. त्या चर्चेमुळे की काय पोलोकचे मानसिक संतुलन ढळले, तो अधिकाधिक आत्ममग्न होत गेला.

एनिड ब्लायटनच्या आयुष्यातही हा काळ कसोटीचा ठरला. तिने रोमन कॅथॅलिक पंथाचा स्वीकार करण्याचा मोह तिला होऊ लागला, पण तो तिने टाळला. आपल्या मुलींचा बाप्तिस्मा तिने आंग्लिकन पंथात केला. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाला

तोंड फुटले. पोलोकने होमगार्डमध्ये नाव नोंदवले. १९४० मध्ये होमगार्डच्या युद्ध कार्यालय प्रशिक्षण केंद्राचा कमांडंट म्हणून त्याची नेमणूक झाली. घरापासून त्याला दूर राहावे लागले. १९४२ मध्ये पोलोकला नागरी संरक्षणाबाबतचा सल्लागार म्हणून अमेरिकेला पाठवण्यात आले. त्यामुळे एनिड आणि पोलोक यांच्यातले संबंध ताणले गेले. त्यांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय जाहीर केला.

घटस्फोटानंतर एनिडने शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. केनेथ वॉटर्स याच्याशी विवाह केला. पोलोकनेही कादंबरीकार इडा क्रोवे हिच्याशी लग्न केले. एनिडला दुसऱ्या विवाहापासूनही स्वास्थ्य लाभले नाही. डॉ. केनेथ वॉटर्स याला एनिडच्या सार्वत्रिक प्रसिद्धीमुळे आपण झाकोळून जात आहोत असे वाटत राहिले. तो मद्यपान करू लागला. घराबाहेर सुखाचा शोध घेऊ लागला.

आपले सर्वस्व म्हणजे लेखन अशी एनिडची आरंभापासून अखेरपर्यंत दृढ भावना होती. १९३४ मध्ये दि सिक्रेट आयलँड ही तिची साहसकथा प्रसिद्ध झाली. कुमारनायकाच्या भोवती वेगवान कथावस्तूची उभारणी केली तर वाचक त्या कथावस्तूत रंगून जातात हे तिच्या लक्षात आले. या साहसकथेच्या स्वागतामुळे एनिडचा आत्मविश्वास वाढला. तिला आपला सूर सापडला. पुढच्या सहा वर्षांत तिच्या दि फेमस फाइव्ह, दि सिक्रेट सेव्हन, दि अ‍ॅडव्हेंचर सेरीज्, दि बार्नीज् मिस्टरी बुक्स या तिच्या गाजलेल्या मालिकांचे लेखन झपाट्याने होत राहिले. बालसाहित्यातील सर्वाधिक लोकप्रिय लेखिका म्हणून तिची नोंद होऊ लागली. तिने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा मुलामुलींच्या भावजीवनाचा अविभाज्य घटक होत गेल्या. दि फेमस फाइव्ह, दि सिक्रेट सेव्हन यांचे आदर्श समोर ठेवून कुमार-कुमारी आपले छोटेखानी गट करून साहसाच्या शोधात रमू लागल्या.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कागदाची टंचाई निर्माण झाली. प्रकाशनव्यवसायाला खीळ बसली. परंतु एनिडच्या पुस्तकांच्या प्रकाशनात खंड पडला नाही. १९४० साली तिची ११ पुस्तके प्रसिद्ध झाली. जॉर्ज न्यूनेस या प्रकाशन संस्थेमार्फतच तिची सर्वाधिक पुस्तके निघत राहिली. १९४५ मध्ये 'टीचर्स वर्ल्ड'मधील सदर लेखन तिने थांबवले. १९५२ मध्ये स्वत:चे बालमासिक सुरू करण्याचे निश्चित केले. 'एनिड ब्लायटन मॅगेझिन'मधून कुमारांच्या क्लब्जचे वृत्तान्त प्रसिद्ध होऊ लागले. 'द फेमस फाइव्ह' मधील चार मुले व साथीदार कुत्रा यांच्याप्रमाणे पाच पाचजणांचे गट अनेक ठिकाणी निघत राहिले. १९४२ साली सुरू झालेल्या दि फेमस फाइव्हच्या मालिकेत दरवर्षी भर पडत राहिली.

१९४९ मध्ये 'नॉडी' मालिका सुरू झाली. ही मालिका वादग्रस्त ठरली. 'लिट्ल नॉडी गोज् टू टॉयलंड'ने खेळण्यांच्या जगाला एक वेगळी झळाळी आणि अस्मिता मिळवून दिली. छोटुकले खेळाडू खेळणे दरवेळी काहीतरी अडचणीत येते

आणि त्या अडचणींतून बाहेर पडण्यासाठी त्याला टॉयलँडमधील खेळणी मदत करतात हे कथासूत्र वेगवेगळ्या पातळ्यांवरून या मालिकेत हाताळले गेले आहे. ही नॉडीची पुस्तके वेगवेगळ्या आकारात आणि टायपात निघाली. ती बालवाचकांना आवडली. टीव्हीवर त्याची मालिका आली. नॉडी हे पात्र इंग्लंडमध्ये घरोघर पोचले. मिकी माऊस, टेडी बेअरप्रमाणे लोकांच्या मानसविश्वात स्थिर झाले. त्यामुळे नॉडीची पुस्तके बेस्टसेलर्स म्हणून गणली जाऊ लागली.

या अफाट लोकप्रियतेने काहींना एनिड ब्लायटनचा दुस्वास वाटू लागला.

एनिड ब्लायटनच्या कथांमध्ये शब्दांचा वापर हा प्राथमिक पातळीवरचा आहे. त्यामुळे मुलांच्या शब्दसंपत्तीत भर पडत नाही... एनिडच्या गोष्टीत बोधाचा अतिरेक होतो. धाडस, साहस, धैर्य, नेतृत्व वगैरे गुणांचा ती पुरस्कार करते पण तिची पात्रे दांभिक, सेक्सिस्ट आणि कालविसंगत आहेत. काही बाहुल्या या कृष्णवर्णीय दाखवल्याने ती वंशविद्वेष वाढवणारी आहेत अशी टीका तिच्यावर होऊ लागली. तिची पुस्तके वाचण्याच्या नादात इतर क्लासिक्सकडे मुलांचे लक्ष जात नाही, त्यामुळे मुलांची बौद्धिक पातळी बहुश्रुत होत नाही असे काही शिक्षकांनी आणि ग्रंथपालांनी आक्षेप घेतले. तिची पुस्तके ग्रंथालयात ठेवण्यावर बहिष्कार टाकला. परंतु ही बहिष्काराची लाट फार काळ टिकली नाही.

१९६८ मध्ये एनिड ब्लायटनचे निधन झाले. तरीही तिच्या पुस्तकांच्या आवृत्त्या निघत राहिल्या. तिची पुस्तके सातशेवर असल्याने ग्रंथदालनात तिचा कोपरा सदैव भरलेलाच दिसे.

१९९५ च्या सुमाराला तिच्या उत्तराधिकाऱ्यांनी साठ-सत्तर वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या कथा-कादंबऱ्यांतील काही तपशील कालबाह्य झाल्याचे लक्षात घेऊन नव्या आवृत्त्यात काही बदल करण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे दि फेमस फाइव्ह, दि सिक्रेट सेव्हन, मॅलोरीज् मिस्टरी वगैरेंच्या नव्या आवृत्त्या नव्या सुधारित स्वरूपात प्रकाशित होऊ लागल्या. जागतिकीकरणाच्या लाटेत एकूणच पुस्तकांची मागणी वाढली आणि वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवादासाठीही विचारणा होऊ लागली. तेव्हा त्या त्या देशातील वातावरणानुसार मूळ संहितेत बदल करण्यासही मुभा देण्यात आली. पुन्हा एकदा ग्रंथदालनामधला एनिड ब्लायटनचा भाग भरगच्च दिसू लागला. पूर्वी एनिड ब्लायटनच्या काही कथांची वा पुस्तकांची रूपांतरे (ॲडाप्टेशन्स) मराठीत आलेली असली तरी आता अधिकृतपणे तिच्या पुस्तकांचे अनुवाद प्रसिद्ध होऊ लागले आहेत ही गोष्ट स्वागतार्ह आहे यात शंकाच नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसने एनिड ब्लायटनच्या 'दि सिक्रेट सेव्हन' मालिकेतील सर्वच्या सर्व म्हणजे १५ पुस्तकांचा संच नुकताच बाजारात आणला आहे. पीटर, जेनेट, पॅम, जॅक, बार्बरा कोलिन आणि जॉर्ज या सात शाळकरी मुलामुलींनी दि

सिक्रेट सेव्हन, सात गुप्तहेर क्लब स्थापन करून, गुप्तहेर म्हणून किंवा डिटेक्टिव्ह म्हणून अवतीभवती घडलेल्या काही घटनांचा शोध घेतला. मुलामुलीमधील चौकस शोधबुद्धीला चालना देणाऱ्या धाडसाला व निरीक्षणशक्तीला धारदार बनवणाऱ्या या कथा वाचकांना नकळत नेतृत्वाचे धडेही देतील अशा आहेत.

साठ वर्षांपूर्वी लिहिलेल्या या कथांमधील घटना प्रसंगांमागची मानसिकता आजही समकालीन, सुसंवादी वाटते हे एनिडच्या लेखनचातुर्याचे यश म्हणावे लागेल.


**शंकर सारडा,**
**९८२३२६१०२३**

---

**आगामी**

## सोमाली माम
### द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स

**सोमाली माम**
अनु. भारती पांडे





स्वत:वर झालेल्या अन्यायामुळे, अत्याचारामुळे पेटून उठलेली निर्भर, निराधार सोमाली. फक्त स्वत:ची सुटका करून ती थांबली नाही तर भ्रष्टाचारी समाजाच्या विरोधात उभं राहून स्वत:सारख्या अनेक जणींची सुटका तिने केली.
तिचं आयुष्य चटका लावणारं,
त्याहून अधिक थक्क करणारं
आणि मनात आशेचा स्फुल्लिंग जागृत करणारं आहे.

## आगामी

# रुसी मोदी

### द मॅन हू ऑल्सो मेड स्टील




मूळ इंग्रजी लेखक

**पार्थ मुखर्जी । ज्योती सबरवाल**


अनु. **अंजनी नरवणे**

- एक अत्यंत संपन्न, अत्यंत सुसंस्कृत कुटुंब.
- मुलांचे लाड खूप व्हायचे, पण शिस्तही तितकीच कडक असायची, कपडे साधे असायचे, गरीब मुलांबरोबर खेळायला, खायलाप्यायला सूट असायची.
- असं ठासून मनावर बिंबवलं जायचं, की गरिबी, मळके कपडे यात लाजिरवाणं काहीही नाही; खोटं बोलणं, वाईट वागणं हे लाजिरवाणं आहे.
- शिक्षण इंग्लंडमध्ये हॅरो आणि ऑक्सफर्डला. बुद्धी तल्लख, पण अभ्यासाची आवड नाही. लक्ष पार्ट्या, डान्सेस, मौजमजा यांमधे इतिहास विषयात स्नातक.
- इतिहास राहिला बाजूला, नोकरीला लागले एका मोठ्या कारखान्यात रोजावर मजूर म्हणून! कष्ट करण्याची तयारी, माणसांना समजून घेणं, माणसं जोडता येणं, सर्वांशी मिळतं घेणं हे खास विशेष गुण. शिस्तीचे आग्रही. वेळ पडली तर वज्रादपि कठोराणि– एरवी मृदूनि कुसुमादपि!
- उत्तम कलांची आवड, उत्तम खाण्याची, पिण्याची, संगीताची, पाश्चिमात्त्य नृत्याची जाण व आवड. उत्तम वक्ते, भरपूर वाचन, कारकिर्दीत प्रचंड प्रगती.

........सगळंच छान? दु:ख कशाचंच नाही? आहे ना! पण त्याचं प्रदर्शन नाही.

- सुंदर, गुणी मुलीशी प्रेमविवाह केला, पण चौदा वर्षांनंतर घटस्फोट झाला– तरीही तिच्याशी संबंध अजून छान!
- मुलांची खूप आवड, पण मूलबाळ नाही! '...सगळ्यांनाच सगळं कसं मिळेल?'
- नोकरीत अन्याय झाला– दुसरी कंपनी काढली!
- इतकी बहुरंगी, बहुढंगी अशी आहे तरी कोण ही विलक्षण व्यक्ती?
- ज्यांनी जमशेटपूरच्या टिस्कोमध्ये एकूण त्रेपन्न वर्षं सलग काम केलं, कंपनीची विक्री व नफा प्रचंड प्रमाणात वाढवला, ते आता नव्वदी पार केलेले, तरीही कामात व्यग्र असलेले, — **रुसी मोदी!**

# पुस्तक परिचय



**अमेरिकनांना भयभीत करून टाकणाऱ्या आणि कॉल सेंटरवरचे संकट दूर करणाऱ्या नाट्यपूर्ण घटना**

# वन नाइट ॲट द कॉल सेंटर




**चेतन भगत** अनु. सुप्रिया वकील

'फाइव्ह पॉइंट समवन' या चेतन भगत यांच्या इ. स. २००४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पहिल्या कादंबरीवर आधारलेला 'थ्री इडियट्स' हा चित्रपट सध्या गाजत आहे. पहिल्या २ आठवड्यातच या चित्रपटाने ३२० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून 'शोले'सारख्या चित्रपटांचा विक्रम मागे टाकला आहे.

इ. स. २००५ मध्ये निघालेल्या त्याच्याच 'वन नाइट ॲट द कॉल सेंटर' या दुसऱ्या कादंबरीवरील हॅलो हा चित्रपट फारसा गाजला नाही, परंतु या कादंबरीत आलेले कॉलसेंटरमध्ये काम करणाऱ्या तरुणांच्या जीवनाचे चित्रण भारतीय वाचकांना आकृष्ट करणारे ठरले. चेतन भगत हा समकालीन युवा वर्गाचा प्रवक्ता म्हणून ओळखला जाऊ लागला.

'थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाइफ' (२००८) या त्याच्या तिसऱ्या कादंबरीनेही बेस्ट सेलर्सच्या यादीत प्रारंभापासूनच स्थान पटकावले. या तीनही कादंबऱ्यांच्या मिळून दहा लाखावर प्रती विकल्या गेल्या आणि अवघ्या पाच वर्षांच्या कालावधीत चेतन भगतने 'भारतातील सर्वोच्च बेस्टसेलर इंग्रजी कादंबरीकार' म्हणून लौकिक मिळवला. पाच लाख रुपये खर्चून त्याने आपल्या पुस्तकांच्या व लेखक म्हणून स्वत:च्या प्रतिमेच्या प्रसिद्धीसाठी आणि मार्केटिंगसाठी जनसंपर्क संस्थेला कामाला लावले. या जनसंपर्क मोहिमेचाही फायदा त्याला मिळाला असणारच. नुकतीच त्याची 'टू स्टेट्स' ही चौथी कादंबरीही बाजारात आली आहे. सोसायटी ऑफ यंग ॲचिव्हर्स ॲवार्ड (२००४) आणि पब्लिशर्स रेकग्नायझेशन ॲवार्ड (२००५) यांनी त्याच्या एकूण तरुणाईच्या प्रतिमेला सुदृढ केले आहे.

त्याच्या पहिल्या तीनही कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केले आहेत.

'वन नाइट ॲट द कॉल सेंटर' या त्याच्या दुसऱ्या कादंबरीचा मराठी अनुवाद सुप्रिया वकील यांनी केला आहे. पुस्तकाच्या शीर्षकात सूचित केल्याप्रमाणे एका कॉलसेंटरमध्ये एका रात्रीत घडलेल्या घटनांचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

कानपूर ते दिल्ली या रात्रीच्या रेल्वे प्रवासात चेतन भगत यांना या कादंबरीची कल्पना सुचली. रेल्वेच्या कंपार्टमेंटमध्ये सहप्रवासी असणाऱ्या समोर बसलेल्या एका तरुणीने चेतन भगत यांना ओळखून म्हटले, ''मी तुमचे पहिले पुस्तक वाचले आहे. अभ्यासात सुमार असणारी तीन मुले आणि प्रोफेसरची मुलगी आयआयटी कानपूरमध्ये शिक्षण घेतात. त्यांनी केलेल्या धमाल चुका दाखवणारे हे पुस्तक काही आजच्या तरुणांचे प्रातिनिधिक म्हणता येणार नाही. आयआयटीमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असते... आधुनिक भारतात तरुणाईचा प्रचंड मोठा समूह कुठल्या आव्हानांना आणि समस्यांना तोंड देतोय याची तुम्हाला कल्पना तरी आहे का? त्याबद्दल तुम्ही लिहायला हवे.''

नंतर तीच तरुणी लेखकाला म्हणते, ''माझ्याकडे तुमच्या उपयोगाची कथा कल्पना आहे. एका कॉल सेंटरबद्दलची ती कथा आहे. मी ती तुम्हाला सांगायला तयार आहे, पण माझी एक अट आहे. त्या कथेवर तुम्ही पुस्तक लिहायला हवे. तसे वचन मला हवे आहे.''

''तसे वचन कसे देता येईल? कल्पना पसंत पडली तर पुस्तक लिहीन, पण कथा न ऐकताच असे वचन कसे देता येईल?''

पण शेवटी लेखक तिची अट कबूल करतो.

''ही कथा आहे एका रात्री कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या सहा जणांची... ती रात्र नेहमीसारखी सामान्य नव्हती. त्या रात्री एक फोन आला होता... तो सामान्य फोन नव्हता. देवाचा म्हणजे साक्षात परमेश्वराचा फोन होता तो.''

आणि ती सहप्रवासी तरुणी कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या तीन पुरुष आणि तीन मुली अशा सहा जणांची कथा लेखकाला सांगते. तीच कथा त्या सहा जणांपैकी श्याम या तरुणाच्या निवेदनाद्वारे लेखक या कादंबरीत उभी करतो.

गुरगावच्या कनेक्शन्स या कॉलसेंटरमध्ये त्या रात्री सहाजण कामावर असतात. त्यांचा 'वेस्टर्न ॲप्लायन्सेस स्ट्रॅटेजिक ग्रुप' असतो.

श्याम मेहरा या कहाणीचा निवेदक. कॉल सेंटरचा एजंट. वय २६. अमेरिकन क्लाएंटच्या सोयीसाठी सॅम मर्सी हे नाव तो वापरतो. बढतीची स्वप्ने बघणारा श्याम. वेब मॅन्युअल व्रूमच्या मदतीने तयार करतो.

ख्रिसमसच्या रात्री ८ वाजून ५५ मिनिटांनी त्याला कॉलसेंटरवर नेणारी क्वालिस येते. याच क्वालिसमधून सहाजण ऑफिसला जातात.

मिलिटरी अंकल - लष्करातून निवृत्त झालेले पन्नाशीतले बुजुर्ग. शिस्तप्रिय, एकटे एकटे राहणारे, कमी बोलणारे.

प्रियांका - श्याम मेहराची मैत्रीण, पण तूर्त त्यांच्यात बेबनाव. श्यामचा तिच्यावर जीव. ईशाशी स्पर्धा करणारी. प्रियांकाशी फाटल्यावर श्यामची शेफालीशी दोस्ती, पण प्रियांकाची ओढ कायम.

राधिका - राधिका झा. एजन्ट. रेशिया जोन्स. सुंदर, गोरीपान, काळेशार डोळे विवाहित.

व्रूम - वरुण मलहोत्रा. एजंट व्हिक्टर मेल. सहा फूट दोन इंच. चारचाकी वाहनांचे व वस्तूंचे वेड. स्वेटशर्टवर फेरारीचा लोगो. वडील बिझनेसमन. व्रूमच्या आईशी घटस्फोट घेऊन एकटे राहणारे. व्रूम आईबरोबर राहणारा. वेबसाइट मॅन्युअल तयार करण्यात व्रूम आणि श्याम हे सहकारी.

ईशा - फॅशनेबल ड्रेस सेन्स असणारी. आकर्षक मॉडेल बनण्याची स्वप्ने पाहणारी. 'लॅक्मे फशन वीक'मध्ये काम मिळवू पाहणारी. कॉल सेंटरमधील सर्वात

हॉट आयटेम. हॉटेस्ट चिक अॅट कनेक्शन्स. चंदीगडहून दिल्लीला आलेली उंची कमी. पाच पाच वय. बेंबीवर रिंग.

शेफाली ही टीम लीडर होण्याची आकांक्षा धरणारी.

क्वालिसमध्ये बसून हे सर्वजण कॉलसेंटरमध्ये जाता जाता वाटेत हॉटेलमध्ये चहापानासाठी थांबतात.

पुढे वेगवेगळ्या ऑनलाइन अमेरिकी क्लाएंटशी होणारी संभाषणे, त्यांच्या तक्रारी, डोके शांत ठेवून त्यांची उत्तरे देण्याची कसरत.

त्यांचा बॉस बक्षी.

वेस्टर्न कॉम्प्युटर्सचा कॉल व्हॉल्यूम कमी झाल्यामुळे या टीममधील सर्वांना कामावरून काढायचे असे कंपनी ठरवते. बॉस बक्षी मीटिंग घेऊन ही बातमी सांगायचे ठरवतो. पण त्या बातमीची कुणकुण व्रूमला आधीच लागते. तशात व्रूम आणि श्याम यांनी तयार केलेले वेब मॅन्युअल आपणच तयार केले असे बक्षी बॉस्टनमधील मुख्य कार्यालयाला कळवतो. ही बातमी ही व्रूम आणि श्याम यांना धक्का देते. त्या मॅन्युअलमुळे बक्षीला बॉस्टन भेटीचे निमंत्रण येते. आपल्या श्रमावर डल्ला मारणारा उपटसुंभ म्हणून बक्षीबद्दल सर्वच गट सदस्यांना राग येतो. तशात नोकरी जाण्याची टांगती तलवार डोक्यावर. त्यामुळे सगळे अस्वस्थ.

या कादंबरीचा निम्माअधिक भाग कॉलसेंटरमधील परदेशी क्लाएंटसच्या तक्रारी आणि श्याम, ईशा, प्रियांका, राधिका, व्रूम व मिलिटरी अंकल यांच्या परस्परसंबंधांतील ताणतणावांची चर्चा, प्रत्येकाच्या आशाअपेक्षा, प्रत्येकाची घुसमट यांच्याशी संबंधित आहे. प्रत्येकजण आपल्या अस्तित्वाचे मूलस्त्रोत शोधतो आहे. आपल्या आजवरच्या आयुष्याचा ताळेबंद मांडतो आहे. जमेची आणि अपेक्षांची समीकरणे मांडता आहे. अंतर्मुख होऊन पुढे काय याचा शोध घेतो आहे.

बक्षी हा त्यांचा बॉस. त्याने स्वत:ला बॉस्टनला जायला मिळावे म्हणून व्रूम आणि श्याम यांनी तयार केलेल्या वेब मॅन्युअलवर डल्ला मारल्याने आणि त्याचे श्रेय स्वत:कडे घेतल्याने व्रूम-श्याम चिडलेले आहेत. अकार्यक्षम अशा बॉसच्या हाताखाली काम करण्याचे शल्य त्यांना बेचैन, उद्विग्न करीत आहे.

प्रियांकाला पुन्हा आपल्या जीवनात स्थान मिळावे, तिचे लग्न मोडावे म्हणून काय करावे याचा अंदाज श्याम घेत आहे. कॉलेजमधल्या त्यांच्या भेटीगाठींचे स्मरण त्या दोघांनाही व्याकुळ करीत आहे.

ईशाला मॉडेलिंगमध्ये यश मिळवण्याची आकांक्षा आहे.

व्रूमला स्वत:ची आयटी कंपनी काढायची आहे. या नोकरीवर, बॉस बक्षी याच्या संधिसाधू खडूसपणावर तो संतप्त आहे.

तशात रात्री सिस्टिम डाऊन होते. दुरुस्तीला वेळ लागणार असतो म्हणून ते

सर्वजण पबमध्ये जायचे ठरवतात. पबमध्ये मनसोक्त रमतात.

कच्च्या शॉर्टकटने परतताना त्यांची कार बांधकामासाठी केलेल्या एका खड्ड्याच्या टोकाशी थडकते. त्या खड्ड्यावरील लोखंडी सळ्यांमुळे ती कार खड्ड्यात पडण्यापासून बचावते. ती मागे घेणे, पुढे घेणे धोक्याचे ठरते.

सगळे हवालदिल होतात. क्वालिसचे दार उघडता येत नाही. त्यांना बाहेर पडता येत नाही.

कार खड्ड्यावर लटकत राहते. ते मदतीसाठी मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात. पण नेटवर्क मिळत नाही. बाहेर कोणाशी बोलता येत नाही.

**''सहा बेजबाबदार कॉलसेंटर एजंट्स मृतावस्थेत आढळले. त्यांच्या शरीरात मद्याचा अंश आढळला''** अशा पेपरमधील हेडलाइन त्यांना दिसू लागतात.

''प्रत्येकजण एक दिवस मरणारच आहे. कदाचित मरणाचा हा मार्ग सोपा असेल. आयुष्याला भिडण्यापेक्षा त्याचा शेवट करून टाकायचा...'' असे व्रूम म्हणतो तेव्हा सारेच हबकतात.

तितक्यात श्यामचा सेलफोन व्हायब्रेट होऊ लागतो. नेटवर्क नसताना रिंग कशी वाजते याचे सर्वांनाच आश्चर्य वाटते.

''देव कॉलिंग.''

हा कोण देव आहे असा प्रश्न श्यामला पडतो.

''मी देव... गॉड... इथं तुम्ही फारच अडचणीत दिसला म्हणून फोन केला.''

''आम्हाला इथून बाहेर पडण्यासाठी मदत करा. आणखी काही सळ्या तुटल्या तर आमचं रामनामसत्य होईल.''

''काळजी करू नका. पण मला सांगा, तुमचं आयुष्य कसं चाललंय? तुम्ही प्रत्येकजण उत्तर द्या.''

''तुम्ही देव. तुम्हाला सर्व ठाऊक आहे. आयुष्य खूपच दु:खीकष्टी आहे माझं.'' राधिका म्हणते.

''आमच्याच आयुष्यात इतके खाचखळगे का? हे आयुष्य भयंकर आहे. जणूकाही आम्ही चुकीचं काहीतरी केलंय.'' व्रूम म्हणतो. इतरही सगळे त्याला दुजोरा देतात.

देव विचारतो, ''तुम्हाला माझा आवाज, तुमच्या आतला आवाज ऐकू येतो आहे का?''

व्रूम म्हणतो, ''येतो... तो मला सांगतोय की मी केवळ पैशासाठी नोकरी धरायला नको होती. कॉलसेंटरमध्ये पगार जास्त मिळतो. तो अमेरिकन विनिमय दरामुळे. पण या नोकरीत माझ्या क्षमता प्रकट होत नाहीत. देशाला माझी मदत होत

नाही. पैसा म्हणजे प्रगती हा समज खरा नाही.''

देव म्हणतो, ''तुम्ही सगळे कार्यक्षम आहात. तुम्ही यापेक्षा खूप काही चांगले करू शकता... आपण एक सौदा करू या. मी तुमचा जीव वाचवीन. पण त्या बदल्यात तुम्ही मला एक गोष्ट द्यायला हवी. तीन मिनिटे डोळे बंद करा. तुम्हाला काय हवे ते ठरवा. ते ठरवल्यावर ते मिळवण्यासाठी आपल्या आयुष्यात काय बदल करायला हवेत ते ठरवा. मी तुमची मुक्तता केल्यावर त्या बदलानुसार वागायला सुरुवात करा. आहे कबूल?''

सर्वजण हो म्हणतात.

देव म्हणतो, ''आता तुम्हाला काय हवे ते सांगा.''

''मला अर्थपूर्ण आयुष्य जगायचंय. हे कॉलसेंटर सोडायचे आहे.'' व्रूम.

''मला माझ्या आईनं खूष राहावं असं वाटतंय, पण आईमुळं मला माझं चित्त आपल्या आयुष्यावर आणि मला हव्या असलेल्या गोष्टीवर केंद्रित करता येत नाही. आईनं स्वत:ची जबाबदारी घ्यायला हवी.'' प्रियांका.

''मला माझ्या मुला-नातवासोबत राहायचं आहे. माझी सून मला न आवडणाऱ्या गोष्टी करते. नोकरी करते. म्हणून मी भांडून घराबाहेर पडलो. मी माझी कालबाह्य मूल्यं त्यांच्यावर लादत होतो. ही माझी चूक आहे. अमेरिकेला जाऊन त्यांची समजूत काढायची इच्छा आहे.'' मिलिटरी अंकल.

''मला पूर्वीसारखी, लग्नाआधी होते तशी व्हायचंय. अनुजला घटस्फोट द्यायचाय. त्याच्याशी लग्न ही माझी चूक होती.'' राधिका.

''मला मठ्ठ मॉडेल बनायचं नाहीय. माझ्या सौंदर्याचा अधिक चांगला उपयोग होऊ शकेल. जे करियर नीतिमत्तेला धुडकावून देण्यास भाग पाडते किंवा एखादा इंच उंची कमी म्हणून नाकारतं ते काही कामाचं नाही.'' ईशा.

''मला स्वत:चा बिझनेस सुरू करायचा. व्रूमच्या मदतीनं छोटीशी वेब डिझाईन कंपनी काढायची इच्छा आहे. आणि एक दिवस मला प्रियांकासारख्या मुलीच्या लायकीचं बनायचं आहे. आज मी तिच्या लायकीचा नाही हे मला ठाऊक आहे. ते मी कबूल करतो. प्रेम आणि मैत्री यांचा सुरेख संगम असेल अशा मुलीच्या लायक व्हायचं आहे. यशस्वीही व्हायचंय.''

देव त्यावर प्रतिक्रिया देतो, ''मी खूष झालोय. आपल्याला काय हवंय हे तुम्हाला ठाऊक आहे. हे ठाऊक असणं हाच जबरदस्त प्रारंभ आहे... माणसाला यशस्वी होण्यासाठी चार गोष्टी लागतात. मध्यम प्रमाणात बुद्धिमत्ता, थोडीफार कल्पकता, आत्मविश्वास आणि अपयश...''

बक्षीसारख्या वाईट बॉस म्हणजे आत्म्याचा रोगच. असला बॉस लाभला म्हणजे आपल्या स्वत:मध्ये काही कमी आहे असे वाटू लागते आणि आपला आत्मविश्वास

संपतो. अपयशाची चव चाखली म्हणजे कशाचीही भीती उरत नाही. धोका पत्करण्याची मनाची तयारी होते. आरामदायी कोशातच गुरगुटून पडण्याचं टाळलं पाहिजे. अपयश येणं याचा अर्थ नंतर यशस्वी होण्याकडे वाटचाल करणे.''

देव आणखी एक हिन्ट देतो.

''अमेरिकेतील लोकांजवळ बऱ्याच गोष्टी असतात, म्हणून ते जगातील सर्वात सुखी लोक आहेत असे नाही. कोणताही युद्धगर्क देश सुखी असू शकत नाही. अमेरिकी लोकांच्या डोक्यात गोंधळ माजला तर तुमचं कॉल सेंटर वाचू शकेल. त्यांच्या कमकुवत गोष्टी आठवून बघा. पृथ्वीवरील सर्वात भयभीत आणि अहंगंड असणारे लोक म्हणजे अमेरिकन्स हे लक्षात घ्या. त्यांना भयभीत केलेत तर तुमच्या कॉल सेंटरला पूर्ववत कॉल-व्हॉल्यूम मिळेल... तुमच्या बॉसलाही तुम्ही धडा शिकवू शकाल. खरे तर अंतिम बॉस मी आहे. मी तुमच्या सोबत आहे. मग तुम्हाला कशाची भीती का वाटावी?''

...देव आणखीही एक खुलासा करतो.

''माझी यंत्रणा विशिष्ट प्रकारे चालते ते समजून घ्या. माझा सर्व मनुष्यप्राण्यांशी करार झालेला आहे. तुम्ही तुमच्या शक्तीने सर्वतोपरी काम करा. तुम्हाला प्रोत्साहनपर यश देण्यासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी असेन. पण सुरुवात तुम्ही स्वत: करायला हवी. त्याशिवाय माझी सर्वाधिक गरज कुणाला आहे हे मला समजणार नाही.''

नंतर या सहा एजंटांची कार खड्ड्यातून व्यवस्थित बाहेर पडते. फक्त सहा सेकंदात.

आणि बॉस बक्षीलाही बरोबर पेचात पकडून निष्प्रभ केले जाते.

कॉलसेंटरची कॉल-व्हॉल्युम वाढण्याची युक्ती सफल होते आणि कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या सुरक्षित राहतात...

...आणखीही खूप काही घडते. खूप वेगाने इच्छापूर्तीच्या दिशेने.

ते सारे मूळ पुस्तकातूनच वाचण्यात गंमत आहे.

**किंमत : २२० रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : ३० रु.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

आगामी




# जॅपनीज ऑर्किड

**रेई किमुर** अनु. **स्नेहल जोशी**

२००रु. पोस्टेज २५रु.


जागतिक कीर्तीच्या अमेरिकास्थित जपानी व्यावसायिकाला जगाच्या दुसऱ्या टोकाकडून धमक्यांच्या ई-मेल्स येत आहेत.

लाजिरवाणा भूतकाळ जगासमोर आणण्याच्या या धमक्यांमुळे मानी स्वभावाच्या तेत्सुयो आकिनिकोवर जणू आभाळच कोसळलं आहे.

तेत्सुयोचा वकील, त्याचा गुप्तहेर-मित्र आणि एक इतिहासतज्ज्ञ मिळून या रहस्याचे धागेदोरे उलगडत नेऊ शकतील?


जपानी ऑर्किडचं रहस्य जगासमोर येईल?

# पुस्तक परिचय



**रोज फक्त दहा मिनिटे गरम पाण्याचा वापर करा आणि पाठदुखी, मानदुखी व खांदेदुखी या तक्रारीपासून मुक्त व्हा.**

# उष्ण जलोपचार




**डॉ. पॅट्रिक होरे/डेव्हिड हार्प** अनु. सुभाष जोशी

सध्याच्या जीवनशैलीमुळे आणि वाढत्या वयोमानामुळे आपल्या शारीरिक तक्रारींमध्ये खूपच वृद्धी होत आहे. हृदयविकार, उच्च रक्तदाब, पक्षाघात, कर्करोग, मधुमेह यांच्या संदर्भातील खर्चिक उपचार आणि शस्त्रक्रिया अटळ असेच मनावर बिंबवले जाते. पाठीचा कणा दुखणे, गुडघे दुखणे, टाचा दुखणे यांचे प्रमाणही जास्त दिसते. रुग्णालयात जाऊन उपचार करून घेणे हा राजमार्ग आहेच. परंतु काही कमी खर्चाचे, कमी त्रासाचे घरगुती उपचारही परंपरेने पिढ्यानुपिढ्या वापरात आहेत. ॲलोपथीच्या प्रभावामुळे त्याकडे आपले दुर्लक्ष होत आहे किंवा त्याबद्दलची विश्वासाची भावना आपल्यात तेवढीशी तीव्र असत नाही. तरीही काही अभ्यासकांना आपल्या पारंपरिक औषधोपचारांचे, निसर्गोपचारांचे महत्त्व व मोल नव्याने प्रतिपादित करण्याची गरज वाटत आहे. केवळ भारतातीलच परंपरापूजक हा उद्योग करीत आहेत असे नाही. परदेशातील अभ्यासकही त्याविषयी प्रयोगशील आहेत. 'उष्ण जलोपचार' (हॉट वॉटर थेरपी) हे डॉ. पॅट्रिक होरे आणि डेव्हिड हार्प यांचे पुस्तक या दृष्टीने भारतीयांना जवळचे वाटेल.

गरम पाण्याच्या वापराने अनेक दुखणी दूर होऊ शकतात. गरम पाण्याने मानवी शरीरात रक्तप्रवाह वाढतो. त्वचेखालच्या पेशींना आणि स्नायूंना अधिक प्राणवायू मिळतो. शारीरिक वेदनांना कारणीभूत असणारे रोगट, तणावग्रस्त स्नायू गरम पाण्याच्या वापराने शिथिल होतात, मज्जारज्जूंना आराम पडतो, सांधे मोकळे होतात. साहजिकच वेदनांची तीव्रता कमी होते. गरम पाण्याचा वापर शॉवर, बाथटब किंवा गरम पाण्याचा टब याद्वारे घरच्या घरी करणे सध्या सोपे झालेले आहे.

संधिवात, मानदुखी, पाठदुखी, मानसिक तणाव व चिंता, डोकेदुखी, सांधे आखडणे, स्नायूमध्ये गोळा येणे, पेटका येणे, खरचटणे, मुका मार लागणे यासारख्या तक्रारींचा गरम पाण्याच्या वापराने बराचसा निरास करता येतो, असे परंपरागत ज्ञानाच्या आधारे आपणास ज्ञात असते. डॉ. पॅट्रिक होरे आणि डेव्हिड हार्प यांनी त्याबाबत तपशीलवार विवेचन करून उपचार पद्धतीत बारकावे आणले आहेत. त्यामुळे उष्ण जलोपचार हे पुस्तक वाचून आपण पाठदुखी, संधिवात वगैरे वेदनांच्या त्रासापासून मुक्त होऊ शकतो हे मनावर ठसू शकेल. गरम पाण्याचा वापर रोज फक्त दहा मिनिटे केला तर आपली मान, आपले खांदे, आपली पाठ यांची दुखणी दूर होतील असे त्यांचे प्रतिपादन आहे.

डॉ. अल्बर्ट श्वाइत्झर यांचे एक वचन या पुस्तकाच्या प्रारंभीच उद्‌धृत करण्यात आले आहे. तेही फार अर्थपूर्ण आहे.

**''प्रत्येक रोग्याच्या अंतर्यामी एक डॉक्टर अंतर्भूत असतो. पण हे बहुतेक लोकांना ठाऊक नसते. त्यामुळे ते डॉक्टरांकडे येतात. रूग्णामध्ये वास्तव्य करणाऱ्या डॉक्टरला उपचार करण्याची संधी आम्ही डॉक्टर मंडळी देतो तेव्हाच आमचे कार्य सुरू होते असे समाधान वाटते.''**

गरम पाण्याची किमया अद्भुत आहे, गरम पाण्याच्या टबात प्रवेश केल्याबरोबर आपल्याला आत खोलवर कुठेतर उबदार आणि पोषक वातावरणाची जाणीव होते. सर्व शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होतात. त्या उबेच्या आवरणात सर्व संघर्ष विराम पावतात असे डॉ. पॅट्रिक होरे म्हणतात. गरम पाण्यापासून होणारे हे प्रचंड फायदे मानवाने आदिम काळापासून अंत:प्रेरणेने आणि अनुभवाने जाणून घेतले आहेत. गरम पाण्याचे झरे हे उपचार केंद्र म्हणून वापरले जातात. आधुनिक पद्धतीच्या फ्लॅटमध्ये बाथरूममध्ये टब आणि गरम पाण्याची सोय असतेच. या गरम पाण्याचे औषधीयुक्त गुणधर्म लक्षात घेतले तर गरम पाणी ही एक सुविधाच नव्हे तर उपचाराचे प्रभावी साधन आहे असे आढळून येते.

गरम पाण्याच्या टबात शिरल्यावर शरीरातील रक्ताभिसरण जलद होऊ लागते. काही क्षण रक्तदाब वाढल्यासारखे वाटते. त्वचेचे तपमान वाढते. रक्तपुरवठा जलद गतीने होऊ लागतो. त्यामुळे रक्तवाहिन्या फुगतात आणि रक्तदाब परत कमी होतो. सामान्य स्थितीपेक्षा जास्त तापमान असलेले हे रक्त त्वचेखालील पेशींमध्ये शिरते, त्यामुळे त्या पेशींना प्राणवायूचा अधिक पुरवठा होतो. शरीराला हलकेपणा येतो. आराम वाटतो. पाठीच्या दुखण्याला कारणीभूत असणारे सतत आदळलेले स्नायू मोकळे होतात. शरीर वेगवेगळे व्यायाम आणि हालचाली सुलभतेने करू शकते. स्नायू मोकळे झाल्याने मज्जारज्जूंनाही आराम पडतो. वेदना ओसरत जातात. प्राणवायूमुळे शरीरातील अपायकारक दूषित तत्त्वे जलदगतीने बाहेर फेकली जातात, श्वसनाचा वेग वाढतो. हृदयाची स्पंदने जलद होऊ लागतात. घाम येतो. तरतरीतपणा वाढतो. रोगप्रतिबंधक शक्ती उद्दीपित होते. यकृताची रासायनिक प्रक्रिया वाढून लॅक्टोजप्रणित आम्लाचे परिवर्तन होते. शिरांना आराम पडून वेदनांचे प्रमाण कमी होते.

पाठदुखी, संधिवात, शिरांमधील दाढ, स्नायूंमधील ताण, दुखरे व मुरगळलेले अवयव, स्नायूंचे आखडणे, खरचटणे, मुका मार या तक्रारींवर गरम पाण्याची उपचार पद्धती लाभदायक ठरते. मात्र काही विशिष्ट अवस्थांमध्ये ही उपचार पद्धती टाळावी लागते. उदाहरणार्थ अंगात ताप असणे, फिट येणे, रक्तस्राव होणे, मूत्राशय व आतड्यांवर ताबा नसणे वगैरे.

गरम पाण्याच्या उपचारपद्धतीत काही कृतींचे आवर्तन करावे लागते. त्याची माहितीही विस्ताराने देण्यात आली आहे.

खोलवर मसाज करणे, व्यायामाच्या पद्धती दैनंदिन सराव, शरीराला आराम देणाऱ्या आधुनिक पद्धती या विषयीही विवेचन करण्यात आले आहे.

गरम पाण्याच्या उपचार पद्धतीमध्ये आवर्तनाला म्हणजे विशिष्ट व्यायाम पुन: पुन्हा करण्याला महत्त्व असते. मालिश, हलका व्यायाम, गरम पाण्यात करावयाचे व्यायाम यांची आवर्तने सुविहितपणे केल्याने जास्त लवकर व दीर्घकाळ आराम मिळतो. आठवड्यातून एखादाच दिवस व्यायाम करून चालत नाही. रोजच्या रोज

व्यायाम करणे आवश्यक असते. स्नायूंवर जास्त ताण पडल्याने ते तुटले तर पुनश्च पूर्ववत होत नाहीत. त्या जागी व्रण असलेले स्नायू विकसित होतात आणि त्यांची आकुंचन-प्रसरण क्षमताही कार्यक्षम राहत नाही, दुखापत बरी झाली तरी हे व्रण असलेले स्नायू मज्जारज्जू आणि रक्तवाहिन्या यांना चेपत राहतात. अपघातात ज्या व्यक्तींचे स्नायू तुटलेले असतात, त्या व्यक्तींना त्याच जागी पुन्हा इजा होण्याची शक्यता असते. एकदा स्नायू ताठरला की तो पुन्हा सैल पडत नाही. घट्टच राहतो. स्प्लिटिंग रिफ्लेक्स असे याला म्हणतात. पाठीच्या स्नायूंवर आलेल्या तणावामुळे स्नायू आखडून दुखण्याचा जास्त संभव असतो. गरम पाण्याच्या उपचार पद्धतीमुळे हा धोका टळू शकतो.

स्नायूंमध्ये कधी कधी टाचणीच्या डोक्यापासून ते अंगठ्याच्या नखाएवढ्या आकाराचा केंद्रबिंदू तयार होतो आणि त्या ठिकाणी अधूनमधून तीव्र वेदना जाणवते. गाठीसारखे हे मर्मबिंदू दुखत राहतात. मालिश करून, व्यायाम करून किंवा नियंत्रित ताण देऊन हे दुखणे कमी होऊ शकते. दुसऱ्या जागी मालिश करून दाब दिला किंवा तेथील दूषित रक्त बाहेर काढले तर त्या जागी आराम पडतो असे आढळते. हे कसे घडते याची कल्पना कोणालाही नाही असे लेखक म्हणतात. ॲक्युपंक्चर, रोल्फिंग, मर्मबिंदूवर इंजेक्शन अशा पर्यायी उपचारपद्धती असल्या तरी मालिशचा उपाय हमखास उपयुक्त ठरतो आणि खोलवर मसाज करणे हा उष्ण पाण्याच्या उपचारपद्धतीचा महत्त्वपूर्ण भाग आहे हे पाचव्या प्रकरणात विशद करण्यात आले आहे.

गरम पाण्याच्या उपचार पद्धतीला आरंभ करण्यापूर्वी अस्थिरोग तज्ज्ञाकडून पाठीची व दुखऱ्या भागाची आणि डॉक्टरांनी सांगितलेले उपचार करून जखम पूर्ण बरी झाल्यावर पाठीच्या व मानेच्या स्नायूंना बळकटी देणारे व्यायाम सुरू करणे या दोन गोष्टींकडे लक्ष देणे जरूर आहे.

पाठीच्या स्नायूंचे ट्रॅपेझिअस, लॅव्हिटर स्कॅपुली आणि होम बॉइड्स हे तीन महत्त्वाचे गट पडतात. खांदे, पाठीचा वरचा भाग, पाठीचा मधला भाग, पाठीचा खालचा भाग, अवघडलेले खांदे, ट्रॅपेझिअस स्नायू या जागा जास्त त्रासदायक असतात.

शॉवर, टब यांचा उपयोग करून व्यायामाचे वेगवेगळे प्रकार करता येतात. गरम पाण्यात हे व्यायाम प्रकार अधिक प्रभावी व गुणदायक ठरतात.

खांदे उचलणे, खांदे चक्राकार फिरवणे, डोके हलवणे, मान वळवलेल्या स्थितीत हनुवटी वर उचलणे आणि खाली करणे, छातीवर कोपर धरणे वगैरे प्रकार विशिष्ट क्रमाने सहा सहा वेळा करणे म्हणजे प्रत्येक व्यायामप्रकाराची सहा आवर्तने करणे अपेक्षित  असते.

एकूणच हे पुस्तक वाचून मान, पाठ, खांदे यांच्या दुखण्यातून आपण मुक्त होऊ शकतो असा दिलासा मिळेल.

**किंमत : १२०रु.      सभासदांना : सवलतीत      पोस्टेज : २५रु.**

## नवे कोरे




# प्रस्थान

**रेखा बैजल**

१५०रु. पोस्टेज २५रु.


निश्चल उभा हिमालयही असतो. हे सुख दु:ख अंगावर चालून येतं. वादळासारखं! व्यक्तिमत्त्वाच्या चिंध्या करत, पण एक लक्षात ठेव प्रणव, समुद्री वादळात जेव्हा जहाज अडकतं आणि कॅप्टन गोंधळतो तेव्हा त्याला 'आय ऑफ स्टॉर्म' दाखवला जातो. त्या वादळाचा मध्यबिंदू म्हण. त्या मध्यबिंदूत निरव शांतता असते. अगदी आश्चर्यकारक. जहाजाला त्या 'आय ऑफ स्टॉर्म'मध्ये नेलं की जहाज सुरक्षित राहातं.

तसंच अंतर्मनात एक कोपरा एवढा निश्चल, निवांत निर्माण करावा लागतो की आयुष्यात कितीही वादळं आली तरी त्या क्षणी मनाला त्या कोपऱ्याचा आसरा घेता यायला हवा. असा कोपरा प्रयत्नानंच निर्माण करता येतो. स्वत:ला विसरून, विखरून, ध्यानात किंवा एखाद्या कामात. हे जीवनाचं रूप आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

नवे कोरे

# कॅच मी इफ यू कॅन




**फ्रँक अबॅग्नेल / स्टॅन रेडिंग**
अनु. ज्योत्स्ना लेले


**२००रु. पोस्टेज २५रु.**

फ्रँक अबॅग्नेल...
ऊर्फ फ्रँक विल्यम्स, रॉबर्ट कॉन्रॅड, फ्रँक ॲडॅम्स, रॉबर्ट मोन्जो.

बनावट सह्या, कागदपत्रे बनवणाऱ्या, दुसऱ्या नावाने वावरणाऱ्या, कुठल्याही परिस्थितीतून सहीसलामत सुटणाऱ्या त्या काळातल्या अनेक धाडसी गुन्हेगारांपैकी एक.
त्याच्या गुन्हेगारीच्या काळात त्याने वैमानिकाचा गणवेश घालून पॅन ॲमचे जेट विमान सहवैमानिकाच्या जागेवर बसून बेधडक चालवले. एका रुग्णालयात बनावट रेसिडेण्ट डॉक्टर म्हणून काम केले. जवळ परवाना नसताना वकिली केली, कॉलेजातून समाजशास्त्राचा प्राध्यापक बनला आणि चेक्समध्ये बदल करून पंचवीस लाख डॉलर्स मिळवले.
आणि हे सगळं तो एकवीस वर्षांचा होण्याच्या आत!


कल्पितापेक्षा अद्‌भुत असलेली सत्यकथा!
फसवणुकीतला बादशहा, तोतयेगिरीमधला तज्ज्ञ, बनावट कागदपत्रे, चेक्स बनविण्यात हातखंडा असलेल्या या माणसाचे अद्‌भुत चरित्र!

# पुस्तक परिचय



**भन्नाट चमत्कृतिपूर्ण कल्पना**
**रंगवणाऱ्या गोष्टी**


# तीन छोटे मासे
## आणि जंमत गोष्टी




**अरुंधती महाम्बरे**

'तीन छोटे मासे' या चित्ररम्य बहुरंगी पुस्तकात अरुंधती महांबरे यांनी मजेदार कल्पनांवर आधारलेल्या तीन गोष्टी सांगितल्या आहेत.

चित्रकार खलील खान यांनी या गोष्टीतील मासे, कोल्हा, सिंह, गाढव, हत्ती वगैरे प्राण्यांना आपल्या कुंचल्याने आकर्षक रूप दिले आहे. त्यामुळे गोष्टीतील ही सर्व पात्रे आपल्यापुढे स्पष्टपणे, ठसठशीतपणे उभी राहतात. ती आपली वाटतात. गोष्टीतील चमत्कृतिपूर्ण कल्पना देखील या देखण्या चित्रांमुळे आपल्याला विश्वासार्ह वाटतात. गोष्टीतील घटना खऱ्याखुऱ्या घडल्या असतील असा आपला ग्रह होतो.



लेखिकेने या कथा लिहिताना अनेक अशक्यप्राय शक्यता गृहीत धरल्या आहेत. प्राणीकथांमधील प्राणी काहीही करू शकतात, माणसांप्रमाणे सहजपणे वागू शकतात. एकमेकांशी खोटेपणाने वा धूर्तपणाने वागू शकतात, एकमेकांना फसवू शकतात. लेखिकेच्या या कल्पनांची झेप बघून बालवाचकही थक्क होतील. तशातच, पद्यात्मक यमक साधणारी वाक्यरचना वापरण्याच्या धाटणीमुळे या गोष्टी वाचताना नकळत एक ठेका धरला जातो.

*तीन छोटे मासे.*
*राहत होते कस?*
*झुळझुळणाऱ्या झऱ्यात.*
*राहात होते तोऱ्यात.*
*एक होता गब्बू*
*गोलमटोल ढब्बू...*

अशा यमक साधणाऱ्या व अनुप्रासयुक्त वाक्यांमुळे गोष्ट वाचताना मजा येते.

अरुंधती महांबरे यांच्या या निवेदनशैलीमुळे या गोष्टी वाचताना आपोआप आपण ताल धरू लागतो. त्यांच्या गोष्टीतील कल्पनाही भन्नाट असतात असेच म्हणायला हवे.

भन्नाट म्हणजे काय?

तर 'तीन छोटे मासे' या गोष्टीतील 'छोटे मासे'ही चांगले मोठे असतात हं!

एक मासा गोलमटोल ढब्बू असतो. तो मुलखाचा आळशी असतो. सुस्त आणि झोपाळू असतो. जवळ जर किडा आला तरच तो गट्ट करणार. पोट भरले की झोपून घोरायला लागणार. आता झऱ्यातल्या पाण्यात घोरणारा मासा - मग झरा झुळझुळ आवाज करणार यात नवल ते काय?

गोष्टीतला दुसरा मासा हा स्त्रीलिंगी आहे. काळजीबाई हे नाव त्यांना दिले आहे. त्या सदानकदा काळजी करणाऱ्या, कुठल्याही कामाची घाई करणाऱ्या.

गोष्टीतला तिसरा मासा आहे चतुरराव. हा मासा मास्तर आहे. तो माशांना गणित आणि विज्ञान शिकवतो. एवढेच नव्हे तर त्यांना वाचनाची आवड असल्याने सदानकदा पुस्तकात डोके घालून बसलेले. मनगटाचे घड्याळ विसरून जाणारे म्हणजे विसराळू देखील. असे मासे तुमच्या पाहण्यात कधी आले आहेत का?

नाही ना? पण या गोष्टीत मात्र ते आपल्याला भेटतात.

आता या तीन माशांवर एखादे संकट आले तर ते त्यातून कसे बाहेर पडतील?

तर एकदा कोळी मासे पकडायला येतात. जाळी टाकतात. गळाला लावलेले आमिष - त्याला बळी पडायचे नाही असे तिघेही ठरवतात. पण प्रत्यक्षात झोपेच्या तंद्रीत गळाला अडकवलेली रंगीत माशी बघून मास्तर चतुरराव ती गट्ट करू बघतात आणि गळाला अडकतात. आता सुटायचे कसे?... कोळी गळ उचलतो तेव्हा तो मोठा मासा बघून खूष होतो. पण चतुरराव अगदी मेल्याचा आव आणून हालचाल न करता तसेच राहतात. गिऱ्हाईक म्हणते, ''हा मासा तर मेलेला दिसतो. मला हा नको.'' तेव्हा कोळी त्याला पाण्यात फेकून देतो. चतुरराव बचावतात.

''पुस्तक वाचा, विचार करा, वाचनानं शहाणे व्हाल. संकटातून तरून जाल'' असे स्वत:शीच म्हणत आपली पाठ थोपटून घेतात.

गब्बूरावही गळाला लावलेला माशीला गट्ट करण्याच्या नादात फसतो. त्याला चतुररावाप्रमाणे नाटक करून सुटका करून घेणे जमत नाही. तो बिचारा गिऱ्हाइकाच्या घरी जाऊन, शिजवला जातो आणि माणसांच्या पोटात जातो.

काळजीबाई गळापासून चार हात लांब लांबच पोहत राहते. पण एक सुसर तिला बघून आपले लांब टोकदार दात दाखवते. तेव्हा काळजीबाई आणखी लांब पळते. जीव वाचवते.

या गोष्टीवरून काय बोध होतो?

लेखिका गोष्टीच्या शेवटी सांगते, ''आळशी संकटात अडकतो, विचार करणारा संकटातून सहीसलामत वाचतो. काळजी घेणारा सुखरूप राहतो.''

या पुस्तकातली दुसरी गोष्ट आहे 'राजपुत्र नील' या नावाची!

या गोष्टीतला राजपुत्र नील म्हणजे कोणी माणूस नव्हे. तो आहे कोल्हा. पण

तो निळीच्या हौदात पडून निळा होतो; आणि 'मी राजपुत्र नील' असे सांगून सिंहाकडे जातो.

'मी चंद्रावरून आलोय. तो चंद्र म्हणजे माझा देश. चंद्र माझा देश. निळा माझा वेष' चंद्रदेवानं मला आज्ञा केली. तुमची काळजी घेण्यासाठी सांगितलं. पृथ्वीवर पाठवलं.'

सिंह खूष झाला. चंद्राचा मोठेपणा बघून त्याला धन्य धन्य वाटले. तो कोल्ह्याची बडदास्त ठेवू लागला.

पण एके दिवशी कोल्हा पाण्याच्या टबात पडतो. त्याचा निळा रंग जातो. मूळचा रंग दिसू लागतो. तो ओरडतो. त्याच्या आवाजानं परटाकडे चोरी करणाऱ्या चोराचा पत्ता लागतो. परटीण कोल्ह्याला म्हणते, ''आज मोठं काम केलंस. कपडे चोराला पकडून दिलंस. तू आता माझ्याकडे राहा. माझा राखणदार म्हणून काम कर.''




आणि नील राजपुत्र असलेला कोल्हा रखवालदार झाला.

धूर्त कोल्हा या तिसऱ्या गोष्टीतला कोल्हा सिंहाने केलेल्या शिकारीवर आरामात जगू पाहतो. एका गाढवाला तो सिंहाच्या गुहेकडे आणतो. सिंह गाढवाला ठार मारतो. कोल्हा त्याचे लुसलुशीत कान खाऊन टाकतो आणि सिंहाला सांगतो, ''कान नसलेले गाढव शोधून आणायला मला किती त्रास पडला.'' पोट भरल्यावर कोल्हा जाऊ पाहतो तर सिंह त्याच्या मानेवर पंजा ठेवतो. कोल्हा गयावया करून सुटका करून घेतो व पळ काढतो...

अशा चमत्कृतिपूर्ण कल्पनांमुळे या गोष्टी वाचताना बालवाचकांना खूपच गंमत वाटेल. बुद्धीला ताण द्यावा लागेल.


**किंमत : ५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २०रु.**

# पुस्तक परिचय



**सात कुमार गुप्तहेरांच्या चातुर्याची कमाल दाखविणाऱ्या उत्कंठावर्धक कादंबरिका**

# द सीक्रेट सेव्हन




**एनिड ब्लायटन** अनु. प्रियंका कुलकर्णी

'द सीक्रेट सेव्हन' ही कादंबरिकांची मालिका एनिड ब्लायटनने १९४३ पासून लिहायला आरंभ केला. पुढील पंधरा वर्षात तिने या मालिकेत १४ कादंबरिकांची भर घातली.

प्राथमिक शाळेत शिकणारी पाच मुले आणि दोन मुली सिक्रेट सेव्हन क्लब स्थापन करतात, आणि गुप्तहेर म्हणून, डिटेक्टिव्ह म्हणून काम करण्याचे ठरवून अवतीभवती घडणाऱ्या रहस्यमय घटनांचा छडा लावतात. या क्लबसाठी एका टपरीत कार्यालय उभारतात. या टपरीत शिरण्यासाठी पासवर्ड लागतो. हा पासवर्ड दर आठवड्याला बदलण्यात येतो. एस एस क्लबच्या सदस्यत्वाचा बिल्ला प्रत्येकाला जवळ बाळगावा लागतो. या सातजणांच्या मदतीला स्कँपर हा गोल्डन स्पॅनियल कुत्रा असतो. तो गुन्हेगाराला पकडण्यासाठी सदैव तत्पर असतो आणि सांगितलेले काम चोख करतो.

या सात सदस्यांच्या क्लबचा पीटर हा नेता आहे. तो शिस्तीचा भयंकर भोक्ता आहे. क्लबचे नियम पाळणे, पासवर्ड लक्षात ठेवणे, बिल्ला कायम सांभाळणे याबाबत तो आग्रही असतो. बिल्ला हरवला तर सदस्यत्व रद्द करतो. त्यामुळे सगळेजण त्याला टरकून असतात.



पीटर हा सिक्रेट सेव्हन क्लबचा संस्थापक. ऑल बॉइज प्रिपरेटरी स्कूलमध्ये तो शिकत असतो. त्याची बहीण जेनेट ही देखील या क्लबची संस्थापक सदस्य आहे. जेनेटची मैत्रीण पॅम हिलाही या क्लबचे सदस्यत्व लाभलेले आहे. या दोघींची मैत्रीण बार्बरा ही देखील एस एसचा बिल्ला धारण करते. मुलींच्या एकाच शाळेत या तिघी शिकत असतात. बार्बरा ही बोलभांड आहे. सारखी तिची टकळी चालू असते. तिची बडबड ऐकून मैत्रिणीही कंटाळतात. कान मिटून घेतात. मात्र पार्टीच्या वेळी तिच्या संभाषण कौशल्याला सगळ्याचजणी

दाद देतात. ती सारखी खिदळत असते. विनोद सांगत असते. ती बुद्धीने तल्लख आहे. छान छान कल्पना लढवते. पीटरशी तिचे अधूनमधून खटके उडतात.

जेनेट चित्रकार आहे. हिमाच्छादित रस्त्यावर उमटलेल्या मोटारच्या चाकांच्या ठशाचे चित्र ती काढते. मोटारीचा माग काढला जातो.

पॅम ही बार्बराची मैत्रीण. ती बार्बरापेक्षा काकणभर जास्त बुद्धिमान आहे. ती सारखी हसत खिदळत असते. टिंगलटवाळी करण्यातही ती पुढे असते. ती बार्बराबरोबर शाळेत नृत्याचे धडेही घेते. गुप्तहेर सप्तकाला तिची चांगली मदत होत असते.

सिक्रेट सेव्हनचा दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख जॅक हा पीटरची पाठराखण करतो. परंतु त्याची बहीण सुसी ही मात्र सिक्रेट सेव्हन क्लबशी फटकून वागते. एवढेच नव्हे तर ती पीटर आणि जॅक यांच्यात बेबनाव व्हावा असा जाणूनबुजून खोडसाळ प्रयत्न करते. सिक्रेट सेव्हनचा पाणउतारा करण्याची संधी बरोबर हेरून, त्यांना ती कैचीत पकडू पाहते. बिंकी वगैरे तिच्या मैत्रिणींच्या मदतीने सिक्रेट सेव्हनला ती गोत्यात आणू पाहते. जॅकचा बिल्ला सुसी लपवून ठेवते. त्यामुळे जॅकला पीटरचा रोष पत्करावा लागतो. त्या तिरीमिरीत जॅक सिक्रेट सेव्हन क्लबचा राजीनामाही देतो. पुढे तो पुन्हा सिक्रेट सेव्हनमध्ये सामील होतो. सुसीमुळे जॅक आणि सिक्रेट सेव्हन यांच्यात अकारण गैरसमज निर्माण होत राहतात हे मात्र खरे!

कॉलिन हा सिक्रेट सेव्हन क्लबला अनेक केसेस मिळवून देतो. रेड इंडियन्सचा खेळ खेळताना मोत्यांचा कंठा चोरताना तो एका चोराला बघतो आणि सिक्रेट सेव्हन क्लबमधील आपल्या सहकाऱ्यांना त्याची कल्पना देतो. सिक्रेट सेव्हनचे सदस्य त्या चोराला मग पकडून पोलिसांच्या हवाली करतात.

आपल्या आजीच्या घरी गेल्यावर त्याच्या घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसते. काही सामान चोरीलाही गेलेले आहे हे त्याच्या लक्षात येते. साहजिकच या चोरीचा तपास लावणे त्याच्या सहकाऱ्यांना भाग पडते. सात गुप्तहेर आपले कौशल्य दाखवतात. कॉलिनला कविता रचण्याचाही छंद आहे. बिंकीने सिक्रेट सेव्हनची फिरकी घेणारी एक कविता तयार केली तेव्हा तिला सणसणीत उत्तर देणारी कविता कॉलिनने लिहिली. त्याचे सर्वांनाच कौतुक वाटले.

आरोपीचा वा सावजाचा पाठलाग करण्याचा सराव सर्वच गुप्तहेरांना असावा लागतो. सिक्रेट सेव्हनच्या सदस्यांनाही त्यासाठी काही वेळ द्यावा लागतो. जॉर्ज अशाच एका सरावाच्या निमित्ताने एका गुंड तरुणाचा पाठलाग करत असताना पकडला जातो. त्याच्या वडिलांना त्यामुळे फार राग येतो. सिक्रेट सेव्हनमधून जॉर्जला बाहेर पडण्याचा सल्ला ते देतात. नव्हे, तशी जबरदस्ती ते करतात. पण जॉर्ज मात्र स्वत:ला सिक्रेट सेव्हनपासून अलग करू शकत नाही. एखाद्याच्या घराचा

पत्ता शोधून काढायचा असेल तर जॉर्जला सांगण्यात येते. संबंधितांचा तो नेमका शोध घेतो.

स्कँपर हा सोनेरी रंगाचा स्पॅनियल कुत्रा या सात गुप्तहेरांचा इमानी साथीदार आहे. तो खरे तर आठवा सदस्यच; पण त्याला सदस्य म्हणून अधिकृत मान्यतेची काही गरज वाटत नाही. पीटर-जेनेट यांच्याबरोबर तो सारखा असतो, आणि ते सांगतील त्या सूचना नेमक्या पाळतो. तो कुठल्याही गोष्टीचा छडा लावण्यात पटाईत आहे. कुठल्याही आडदांड माणसावर तो धावून जातो आणि या शाळकरी गुप्तहेरांना सुरक्षित ठेवतो. त्याचे भुंकणे भल्याभल्यांना जेरीला आणते. सुटकेसाठी पळ काढायला भाग पाडतो.

सिक्रेट सेव्हनच्या हेरगिरीच्या कौशल्याला अवसर मिळेल अशा घटना अवतीभोवती सतत घडत असतात.

हिमवर्षावानंतर झऱ्याजवळच्या जुन्या घरालगतच्या मोकळ्याजागी बर्फाचे पुतळे बनवण्यासाठी गेलेल्या पीटर-जेनेटला त्या बंद घरातून काहीतरी आवाज येतो. स्कँपर त्यात फाटकाखालून शिरतो तेव्हा तेथील तिरसट म्हातारा नोकर त्याला मारण्यासाठी काठी घेऊन येतो. जॅकचा बिल्ला तेथे बर्फात पडतो. तो शोधण्यासाठी



जॅक येतो तर त्या बंद घरातून विचित्र आवाज आल्यासारखे वाटते. उग्र दर्पही येतो. एका गाडीतून दोन माणसे उतरून घरात जातात. काही वेळाने परत येतात. हे बघून जॅकला काहीतरी भानगड आहे असे वाटते. तो आपल्या मित्रांसाठी निरोप ठेवतो... त्या घराच्या मालकाचा पत्ता पोस्टमन आणि इस्टेट एजंटकडून मिळवण्यात येतो. नंतर त्या घरामध्ये खिडकीतून प्रवेश केल्यावर तळघरात कोणीतरी बंदिवान आहे हे त्यांच्या लक्षात येते. तळघरात प्रवेश केल्यावर तेथे एक घोडा दिसतो. त्याचा रंग बदलण्याचे काम अर्धवट झालेले असते. तो घोडा पळवून आणलेला असावा आणि चोर त्याचा रंग बदलून विकणार असावेत असा संशय पीटर वगैरेंना येतो. ते आपल्या वडिलांना ही गोष्ट सांगतात. वडील पोलिस इन्स्पेक्टरला याची कल्पना देतात. चोरांना पोलिस रंगे हाथ पकडतात. केरी ब्लू नावाचा तो घोडा रेसमध्ये धावणारा असतो. इन्स्पेक्टर मुलांचे कौतुक करतात. ''आमचं बरंचसं काम मुलांनीच करून टाकलंय. ह्या मुलांनी घराच्या मालकाचा पत्ता मिळवला. घोडागाडीच्या टायरचा ठसा मिळवला. मुले हुशार आहेत.''

घोड्याचे मालक या सात गुप्तहेरांचे कौतुक भेटवस्तू देऊन करतात. सर्कसची तिकिटेही पाठवतात. बक्षीसासाठी आपण काही केले नाही, साहस हेच मोठे बक्षीस अशी भावना ते व्यक्त करतात. अख्ख्या दुनियेतील नंबर वन बाल गुप्तहेर संस्था म्हणून सिक्रेट सेव्हनची प्रतिमा निर्माण व्हावी अशी या बालचमूची भावना असते.

एक मोटार कारची चोरी होते, पीटर आणि जेनेट त्यावेळी जवळच असतात. ते चोरांना बघतात. चोरांचा पाठलाग करताना एक खतरनाक टोळीचे ते सदस्य आहेत असे त्यांना आढळून येते. हे प्रकरण आपल्या आवाक्याबाहेरचे आहे असे त्यांना वाटते. पण शेवटी ते संबंधितांना नेमके पकडून देतातच. (सिक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी भाग ६)

एक मौल्यवान रत्नहाराची चोरी होते, आपले सात गुप्तहेर तो रत्नहार परत मिळवतात. (भाग २)

एक मुलगी घरातून रहस्यमय रीतीने गायब होते. पालक काळजीने हैराण होतात. (भाग ९)

पीटर आणि जॅक यांचे खेळण्यातले विमान उड्डाण करते खरे, पण ते नंतर एका ओसाड पडक्या घरात जाऊन पडते. त्याच्या शोधासाठी गेल्यावर त्या घरातल्या एका खोलीत काहीतरी जळत असल्याचे त्यांना दिसते... त्या घरात कोण राहतेय असे कुतूहल त्यांना वाटते... त्यातून एक सराईत दरोडेखोराचा पत्ता त्यांना लागतो. पण त्यामध्ये सुसीही जेनेटच्या वर्गातली मुलगी गडबड करू पाहते. तेव्हा सुसीलाही त्यांना गप्प बसवावे लागते. (भाग ७) सुसीची कारस्थाने या गुप्तहेरांना अडचणीत आणण्यासाठी चालूच असतात.



सिक्रेट सेव्हनच्या बैठकी टपरीऐवजी ज्या मचाणावर होतात, त्याचा वापर अन्य कोणीतरी करतो आहे असा त्यांना संशय येतो. त्या घुसखोराला पकडण्यासाठी काय काय करावे लागते याची कहाणीही रंगतदार आहे.

टिग्गरच्या कोठारावर एक कट शिजतोय अशी बातमी जॅकला कळते. पीटरचा त्या बातमीवर विश्वास बसत नाही. ''लॉरी अजून आलेला नाही. त्याला इशारा दे झेब... सहा दोन सात दहा, सांधे, चंद्र असता कामा नये. अंधार, धुके, दव...'' असे बोलणे जॅक ऐकतो... त्यावरून पुढे एका मालगाडीवर दरोडा घालण्याचा प्रयत्न हाणून पडण्यात गुप्तहेर यशस्वी होतात. (भाग ४)

एकूणच मुलांची चौकसबुद्धी, साहसीवृत्ती, बहुश्रुतपणा, हुशारी यांना चालना देणारी ही सिक्रेट सेव्हनची पराक्रम मालिका वाचनीय आहे.

सत्तर वर्षापूर्वीच्या या मुलांच्या करामती आजच्या मुलांनाही समकालीन वाटतील, आदर्श वाटतील अशा आहेत.

**किंमत प्रत्येकी : ८०रु. संपूर्ण संचाची किंमत सभासदांना : ९९९रु. पोस्टेज : ५०रु.**

# साधंसुधं



## कॅलिपर्स

**प्रमोदिनी वडके-कवळे**

आमच्या ‘वैशिष्ट्यपूर्ण’ साहित्यसंमेलनात आम्ही कथाकथन स्पर्धा आयोजित केली आहे. आपण त्यासाठी परीक्षक म्हणून आलात तर आमच्या संमेलनाचा आनंद वाढेल.

कृपया आपली संमती लौकर कळविल्यास आम्हाला आपल्या येण्याजाण्याची व रहाण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल ’’

कार्यवाह ‘सबल’

मी उत्सुकतेने पाकीट उलटसुलट करून पाहिलं पण त्यावरून ‘सबल’ म्हणजे कोण आणि ‘वैशिष्ट्यपूर्ण’ म्हणजे नेमकं कसलं साहित्यसंमेलन ते काहीच कळलं नाही. केवळ एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकाराला वाहिलेलं? की विशिष्ट प्रकारचंच लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी आयोजलेलं?

मला कथाकथनाचा कार्यक्रम प्रेक्षक किंवा परीक्षक कोणत्याही प्रकारे ऐकायला आवडतोच. तरीही या आमंत्रणाचं काय करावं असा प्रश्न पडला होता. होकार द्यायला मन कचरत होतं. ‘सबल’ म्हणजे नेमकं कोण? त्यांचं साहित्य कसं असेल? कारण राजकीय पक्षाची भलावण करणारं किंवा कसलातरी आव आणून अन्यायाची तरफदारी म्हणवत इतरांच्या वर्तनावर ताशेरे ओढणारं साहित्य कितीही चांगलं असलं तरी त्यातून निखळ आनंद मिळत नाही. साहित्य आणि संमेलन दोन्ही शब्द एकेकटे किंवा मिळूनही आले तरी ते निखळ आनंद देणारे असावेत असं मला वाटतं. जिथं तसं होणार नसल्याची शंका येते तिथं जायचं मी शक्यतोवर टाळतेच. आपण रस्त्याचं स्वरूप बदलू शकत नाही पण दुसरी वाट शोधू तर शकतो ना!

शेवटी न राहवून मी संयोजकांना फोन केला आणि माझी शंका विचारली. ते हसले. ‘‘नाही मॅडम. तसं काही नाही. आमच्या संस्थेतल्याच सभासदांनी लिहिलेल्या साहित्याचं संमेलन म्हणून त्याला आम्ही वैशिष्ट्यपूर्ण म्हटलंय. त्यात कोणताही इझम वगैरे नाही. तुम्ही नि:शंकपणे या.’’

''पण तुमचे सभासद म्हणजे?''

ते पुन्हा हसले. ''म्हणजे 'सबल'. तुम्हाला इकडे आल्यावर कळेलच.''

शेवटी ठरवलं, जाऊन बघू यात तर खरं. आला एखादा कडवट नकोसा अनुभव तर मुकाट गिळून टाकायचा आणि पुन्हा असल्या गोलमाल आमंत्रणांना बळी पडायचं नाही.

गाव सोलापूरच्या जवळ पण जरा आतल्या बाजूला होतं. गाडी थोडी उशिरा पोचली. रात्रीचे आठ वाजले होते.

एस. टी. स्टँडवर कॉलेजच्या दोघी मुली माझीच वाट पहात उभ्या होत्या.

''मॅडम, नाशिकहून गीतांजली धारवाडकर आल्या आहेत आपल्या संमेलनाला. तुमची दोघींची सोय एकाच खोलीत केलीय. चालेल ना?

''हो चालेल की.'' मी त्या नावातच अडकले . गीतांजली धारवाडकर! मला नाव कुठेतरी ऐकल्यासारखं वाटलं.

एका वळणावर गाडीने जोरदार हिसका दिला आणि मला एकदम आठवलं गीतांजली धारवाडकर म्हणजे गीतामावशीच.

''वय काय आहे या धारवाडकर बाईंचं?''

''बहात्तर म्हणाल्या त्या. पण वाटत नाहीत.''

''उंच आहेत? आणि गोऱ्या?''

''हो. तुम्ही ओळखता त्यांना?''

''बहुतेक.''.. माझ्या आठवणींचे हिशोब जुळत चालले होते.'' त्या तुमच्या संस्थेच्या कार्यकर्त्या वगैरे आहेत?'' मी उत्सुकतेने विचारलं. कारण गीतामावशी साहित्यसंमेलनाला यावं एवढी नामवंत समाजकार्यकर्ती किंवा लेखिका असल्याचं मला आठवत नव्हतं.

''नाही. आमच्या अध्यक्षांच्या ओळखीच्या आहेत त्या.''

एवढ्या चौकशीनंतर मी पुन्हा आठवणींचे तुकडे जुळवायला लागले.

गीतामावशी माझ्या आईची मैत्रीण. अण्णांची बदली महाडला होती तेव्हाची या दोघींची मैत्री. तिचं आणि आईचं मैत्र कसं जुळलं हे एक कोडंच होतं. आईला कध्धी माणसं नीट कळायची नाहीत तर गीतामावशी पाालेभाजीच्या जुडीसारखी माणसं उलटीपालटी पारखून घेणारी. आई गुळमुळीत तर गीतामावशी धारदार व्यक्तिमत्त्वाची. 'सोडून द्यायचं ग.' हे आईचं पालुपद तर 'का म्हणून?' हे गीतामावशीचं जगण्याचं तत्त्वज्ञान. आई सगळ्यांशी जमवून घेणारी तर गीतामावशी कुणावरही अवलंबून रहायचं नाही म्हणून मोलकरणीलाही धाकात ठेवणारी.

पण तरीही गीतामावशी आम्हाला सगळ्यांना मनापासून आवडायची. कारण तडकफडक असला तरी तिचा स्वभाव फार मायाळू होता. तिच्या राघव रश्मीइतकीच

माया आमच्यावर करायची ती.

तिच्या धारदार स्वभावाचा आणखी एक न शोभणारा पैलू म्हणजे तिची समाजसेवा. कुणी संकटात असलं की हिचं पाऊल मदतीला आधी पुढे. दर वर्षी सक्रांतीला सौभाग्यवाण लुटण्याऐवजी पाच गरीब मुलांना वह्यापुस्तकं देण्याची प्रथा तिनेच सुरू केली होती कॉलनीत. जवानांसाठी गरम कपडे, दिवाळीचा फराळ पाठवण्यात तिचाच पुढाकार असायचा. आम्ही खूपच लहान होतो तेव्हा तरीही मावशीचं हे परोपकारी वागणं चांगलं लक्षात राहिलं होतं.

अण्णांची महाडहून बदली झाल्यानंतर पुढे खूप दिवस गीतामावशीचा आणि आईचा पत्रव्यवहार चालू होता. गीतामावशीला प्रवासाची भारी हौस पण कुठं गेली की तिथली प्रेक्षणीय स्थळांबरोबरच ही अनाथाश्रम बघून यायची. कधी भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी दौरा काढायची. वाटेवर आमचं गाव असलं की आमच्या घरी मुक्काम ठरलेला.

आम्ही संमेलनाच्या ठिकाणी पोचलो आणि माझा अंदाज खरा ठरला. ती गीतामावशीच होती. तिनेही मला चटकन ओळखलं.

''बरं झालं तुमच्या खोलीतच त्यांची व्यवस्था केली ते. आता आम्हाला काळजी नाही त्यांची.''

''तिची काळजी घ्यायला लागतच नाही कुणाला. माझीच व्यवस्थित काळजी घेईल ती.'' माझ्या या वाक्यावर त्या दोघी एकमेकींकडे बघून अर्थपूर्ण हसल्या.

मला त्या दोघींचा रागच आला जरासा. पण 'लहान आहेत. या वयात माणसं ओळखता येत नाहीत चटकन.' म्हणून मी मनाआड केलं त्यांचं वागणं. गीतामावशी अशी अचानक भेटल्याचा आनंद मनात भरून राहिला होता. तिथे अशा क्षुल्लक रागालोभाला जागा होतीच कुठे?

वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे खरंच ते संमेलन आगळंवेगळं होतं. कारण ती संस्था शारीरिक व्यंग असलेल्या युवकांसाठी काम करत होती आणि नुसतं त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचं हे संमेलन नव्हतं तर सहकार्याचंही होतं. आपल्या खड्या अवाजात अंध मुलांनी केलेल्या कविता वाचणाऱ्या मुलाचा एक हात पोलिओमुळे निकामी झालेला होता. कथाकथन करणारी मुलगी एका पायाने अधू होती. स्वागतगीताच्या वेळी हातात दिवे घेऊन नृत्याच्या हालचाली करणाऱ्या मुलीला नीट बोलता येत नव्हतं.

माणूस हे एक गहन कोडं आहे असं कुणीतरी म्हटलंय ते मला अगदी मनापासून पटतं. पण तसं म्हणणाऱ्याला कोड्याचा नेमका कोणता प्रकार अभिप्रेत असावा ते मात्र मला अजून कळलेलं नाही. कारण कोड्याच्या कोणत्याही प्रकारात माणूस अगदी चपखल कसा बसतो हे मला पडलेलं उपकोडं आहे.

माणूस हे शब्दकोडं म्हणावं तर उभेआडवे शब्द जमत नाहीत. रंगांचं कोडं म्हणावं तर त्याच्या स्वभावाच्या बदलत्या छटांचं रहस्य उलगडत नाही. आकड्यांचं कोडं म्हणावं तर त्याच्या बाबतीतली मांडलेली गणितं हमखास चुकतात. जिग सॉ पझल म्हणावं तर नेमका महत्त्वाचा तुकडा गायब असतो

काही असो, पण माणूस हे एक छान कोडं आहे. ते सोडवायला मजा येते हेही खरंय. कारण या कोड्याचं एकच ठराविक उत्तर नसतं. इतकंच काय एकाच कोड्याचं उत्तर दरवेळी बदलत असतं आणि तरीही आपण ते कोडं सुटल्याच्या बढाया मारत रहातो.

गीतामावशीबद्दल नेमकं हेच झालं माझं.

मी तिला ओळखते असं वाटलं होतं. पण दोनच दिवसात वाटायला लागलं इथे भेटलेल्या गीतामावशीची ओळख कधीच झाली नव्हती आपल्याला.

इथल्या संचालकांशी परिचय असला तरी गीतामावशीने इथल्या संमेलनाचं आमंत्रण अक्षरश: लावून घेतलं होतं. त्यांनी तिला नुसतं संस्थेच्या या कार्यक्रमाबद्दल सांगितलं; मात्र ती म्हणाली ''मला यायला आवडेल आणि मला नुसतं यायचं नाही तर सक्रिय सहभाग घ्यायचाय तुमच्या या आनंदात.'' तिच्या अशा बोलण्याने संचालक भारावून गेले. गीतामावशीने संमेलनाला यावं आणि आपण आजवर केलेल्या समाजकार्यातले अनुभव सांगावेत असं ठरलं.

खरं सांगायचं तर गीतामावशीच्या वयाने आता सत्तरी ओलांडली होती. गुडघ्यांनी असहकार पुकारला होता. पोट जिभेशी फटकून वागत होतं. पण वाचा मात्र जास्त धारदार झाली होती. सतत स्वत:च्या समाजसेवेबद्दल बोलणं आणि आपल्या शारीरिक असमर्थतेचा बाऊ करून दुसऱ्याला नाचवणं, आजवर ज्या गीतामावशीने मोलकरणीचीही मदत घेतली नव्हती ती इथे सगळया स्वयंसेवकांना नाचवत होती. खोलीतही ती सारखी बेल वाजवायची. कधी गरम पाणी आलं नाही म्हणून. कधी पंखा लागत नाही म्हणून.. तिचं वागणं बघताना माझ्या लक्षात आलं. लहान मुलासारखं सर्वांचं लक्ष स्वत:कडे वेधून घेण्याचाच तो प्रकार होता.

कार्यक्रमातही गीतामावशी दिलेल्या वेळापेक्षा तेवीस मिनिटं जास्त बोलली. बोलण्याचा सूर.एकच आजवर मी केलेलं काम कसं महत्त्वाचं होतं.

हळूहळू मला तिच्या बोलण्याची, वागण्याची चीड यायला लागली.

इथले कलाकार सक्षम नसल्याने त्यांना स्टेजवर चढ, उतरायला माईकशी जुळवून घ्यायला वेळ लागायचा. म्हणून कार्यक्रमांची आखणी विशिष्ट पद्धतीने केली होती. त्याचा पार बोजवारा उडाला. दोन कवींना आपलं काव्यवाचन रद्द करावं लागलं. हे सगळं गीतामावशीच्या गावीही नव्हतं. आजवर अनेक पीडितांसाठी धावूनधावून कार्य करणारी गीतामावशी इथे येऊन मात्र या लोकांचं व्यंग समजूनही

घेत नव्हती.

मला फार कानकोंडं वाटायला लागलं.

मी संचालकांजवळ बोलले तर ते मोठ्या मनाने म्हणाले ''जाऊ दे हो चालायचंच. वय झालं की असंच होतं. आम्हाला आजवर बरेचजणांचा अनुभव आहे.''

संमेलनाच्या सांगता समारंभात मुलांची मुख्य प्रतिनिधी बोलायला उभी राहिली. तिच्या दोन्ही पायांना कॅलिपर्स होते. हाताने बाजूच्या टेबलाचा आधार घेत ती बोलत होती ''आपण स्वत:ला कुठेही कमी समजायचं नाही. आपल्यात मनोबल जास्त आहे त्याची वजाबाकी म्हणून देवाने आपल्याला शारीरिक क्षमता देताना थोडा हात आखडता घेतलाय. बस्स. पण तेवढ्यासाठी आपण स्वाभिमान विकायचा नाही. आपण कुणाचा आधार घ्यायचा नाही. आपणच दुसऱ्याचा आधार व्हायचा. ''

किरकोळ शरीरयष्टीची जेमतेम विशीतली ती मुलगी. बोलताना तिच्या आवाजाला वेगळीच धार चढली होती. डोळे मिटून ऐकलं तर एखाद्या वीरश्रीचा खणखणीत स्वर वाटत होता तो.

बघताबघता तिचे कॅलिपर्स अदृश्य झाले आणि तिच्या जागी मला गीतामावशी दिसायला लागली. इतरांची सहानुभूती मिळवण्यासाठी वयाच, आजाराचे कॅलिपर्स वापरणारी. पूर्वी केलेल्या समाजसेवेचं चलनी नाणं बनवून ते आता चालवू पहाणारी.

तसं पाहिलं तर माझ्याही पायात कॅलिपर्स होतेच. हे संमेलन कसलं असेल अशी शंका घेणारी माझी नजर म्हणजे माझ्या मनाचं व्यंगच होतं..

आम्ही अपंगांना आधार देतो. त्यांना उभं करतो, असा दावा करणाऱ्या या संस्थाही पांगळ्याच म्हणायच्या की!

मग खरं 'सबल' कोण? निसर्गाने केलेल्या वजाबाकीत स्वत:च्या जिद्दीची बेरीज करून हवं ते उत्तर मिळवणारे हे इथले विद्यार्थी की आपण परिपूर्ण आहोत म्हणून छोट्याछोट्या गोष्टींचाही अहंकार बाळगणारे आम्ही?

**प्रमोदिनी वडके-कवळे**

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०, सुखसागरनगर क्र. २,
गल्ली क्र. १०, कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

# पुरस्कार

*** मंगेश पाडगावकर यांना वाग्यज्ञे पुरस्कार**

''मी १४ व्या वर्षी पहिली कविता लिहिली. आज ८० वर्षांचा आहे, इतक्या वर्षानंतरही कविता कराविशी वाटते आणि मुख्य म्हणजे सुचतेही. आजही कविता मला वश आहे, लिखाण अजूनही अपूर्व समाधान देते,'' असे मत ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी व्यक्त केले.

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'वाग्यज्ञे पुरस्कार' साहित्याच्या प्रदीर्घ सेवेकरता पाडगावकर यांना तर कलेच्या सेवेकरता ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांना प्रदान करण्यात आला. खळे यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांच्या वतीने शैलजा चौबळ यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, दिलीप बराटे आदी उपस्थित होते.

पहिली कविता लिहिली आणि ती धाडसाने कवी बा. भ. बोरकर यांना दाखवली. वास्तविक ती, त्यांच्याच एका कवितेच्या प्रेरणेने लिहिली होती. तरीही, त्यांनी तेव्हा लिहीत रहा असे सांगितले होते. माझी आईदेखील कविता करत असे, तिच्या कविता वाचून दाखवत असे, त्याचेही संस्कार लहानपणी झाल्याचे पाडगावकर यांनी नमूद केले. जीवनात जे जे सुंदर आहे, चांगले आहे त्याचे स्वागत करायला शिकले पाहिजे असे सांगत, 'यांचे का असे होते कळत नाही' ही कविता त्यांनी वाचून दाखवली. आजच्या वास्तव परिस्थितीवर भाष्य करणारी 'सलाम' कविता त्यांनी सादर केली.

साठ वर्षांपूर्वी आपल्या देशात साहित्यप्रधान सांस्कृतिक मांडणी नावाची गोष्ट अस्तित्वात आली. मधल्या काळात ती बदलत जाऊन आज क्रिकेट आणि बॉलीवूडप्रधान मांडणी उदयाला येते आहे. सध्या देशात एकूण सांस्कृतिक क्षेत्राचे वजन वाढवणे आवश्यक आहे, असे परांजपे म्हणाले.

*** साने गुरुजी स्मृती पुरस्कार**

गेल्या २७ वर्षांपासून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील 'मानवलोक' संस्थेच्या माध्यमातून लोकसेवा करीत असलेले डॉ. द्वारकादास लोहिया यांची यंदाच्या साने

गुरुजी स्मृती पुरस्कारासाठी आणि त्यांच्या पत्नी डॉ. शैला लोहिया यांची 'अनंत-सुमती साठे सेवा' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. लोकसेवेला समर्पित असलेल्या डॉ. लोहिया यांनी मराठवाड्याच्या मागासलेपणाची कारणे शोधण्यास १९७० पासून सुरुवात केली. केवळ सरकारची मदत मागून मागासलेपणा दूर करता येणार नाही हे लक्षात आल्यामुळे त्यांनी जमीन आणि पाण्याच्या व्यवस्थापनापासून ग्रामीण जनतेच्या आरोग्य व शिक्षणापर्यंतच्या गरजा भागविण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. त्यांनी अंबाजोगाई, केज, माजलगाव, परळी आणि धारूर तालुक्यातील दीडशे खेड्यांमध्ये अल्पभूधारक, भूमिहीन शेतकरी आणि स्त्रिया हे कार्यक्षेत्र ठरवून काम केले. १९९३ साली आलेल्या भूकंपामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या लातूर, धाराशिव जिल्ह्यातही काम केले. स्वयंसेवी संस्था केवळ निधी संकलनाचेच काम करतात हा सर्वसाधारण समज 'मानवलोक'ने खोटा ठरवला.

*** माजी कुलगुरू राम ताकवले यांना जीवनगौरव पुरस्कार**

''नव्या सहस्रकात आल्यावर शिक्षणाचे स्रोत बदलले. पूर्वी विद्यार्थी पुस्तकातून शिकायचे. आज इंटरनेटवरून शिकतात. मात्र, शिक्षणाची परिस्थिती बदलली नाही. विद्यार्थी घाण्याला जुंपला आहे,' अशी खंत पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांनी व्यक्त केली.

'चतुरंग प्रतिष्ठान'चा 'जीवनगौरव पुरस्कार' डॉ. ताकवले यांना डॉ. विकास आमटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अर्थ, राजसत्ता आणि ज्ञानसत्ता स्वत:च्या स्वार्थासाठी एकत्र येत आहे. आणि सामान्यांवर अन्याय करीत आहेत. शिक्षण व्यवस्थेचे फॅक्टरी मॉडेल झाले आहे. प्रत्येकजण चाकोरीबद्ध काम करतो. चाकोरीच्या बाहेर येण्याचा कोणी प्रयत्न करीत नाही, अशी खंत ताकवले यांनी व्यक्त केली. परिस्थितीशरण विद्यार्थ्यांबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. विद्यार्थी पाठांतर करून पास होतोय. विचार करीत नाही. विद्यार्थ्यांना पदव्यांचे शिक्के मारून बाहेर पाठविले जाते. समाज कोठे आहे याचा विचार व्हायला हवा. बहुसंख्य लोकांच्या हिताची शिक्षण पद्धती रूढ व्हायला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

महाभारतातील एकलव्याने रानावनात राहून स्वयंसिद्धीने विद्या मिळविली म्हणूनच त्याला आंगठा कापून द्यावा लागला. आनंदवनमधील विद्यार्थी रानावनात राहत आहेत. या सर्वांना पुन्हा समाजात स्थान मिळवून देऊन हे एकलव्याचे विद्यापीठ बंद करण्याचे आमचे मिशन आहे. समाजाने बाहेर काढलेल्या या लोकांनी संस्कृती जपली आहे. येथे बलात्कार नाही, विनयभंग नाही, ना पोलीस, ना तुरुंग असे डॉ. विकास आमटे म्हणाले. या पुरस्काराच्या रूपाने डॉ. राम ताकवले यांना एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्त करण्यात आला. हा धनादेश 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन'च्या

पुरस्कार' प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष प्रतापराव गोडसे, प्यारेलाल, त्यांच्या पत्नी सुनीला, पोलीस उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरे, फाउंडेशनचे अध्यक्ष इक्बाल दरबार, उपाध्यक्ष माधव जोशी, डॉ. मिलिंद भोई आदी या प्रसंगी उपस्थित होते. रफी यांच्या अनेक आठवणींना प्यारेलाल यांनी या वेळी उजाळा दिला. तसेच, आपल्या कामगिरीत सहकारी लक्ष्मीकांत यांचे मोठे योगदान असल्याने या पुरस्कारावर त्यांचाही हक्क आहे, असे ते म्हणाले.

गोडसे म्हणाले, ''लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी अनेक दशके रसिकांची सेवा केली. राज कपूर हे कानसेन होते. शंकर जयकिशन यांच्यानंतर राजकपूर यांनी 'सत्यम् शिवम् सुंदरम'साठी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांची निवड केली, त्यातच त्यांचे मोठेपण दिसून येते.''

या वेळी इक्बाल दरबार आणि सहकाऱ्यांनी 'अंदाज ए रफी' हा रफी यांच्या गीतांचा कार्यक्रम सादर केला. मधुबन मे राधिका नाचे रे (कोहिनूर), वो जब याद आए (पारसमणी), आज मौसम बडा बेइमान (लोफर), दर्द ए दिल (कर्ज) या गीतांना रसिकांनी मनापासून दाद दिली.

## * वसंत जोशी यांना राजा राजवाडे पुरस्कार

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारा कै. राजा राजवाडे पुरस्कार यंदा कर्जतचे ज्येष्ठ साहित्यिक वसंत जोशी यांना 'आठवणींची फुलपाखरे' या पुस्तकासाठी देण्यात आला. यंदा या पुरस्काराचे १५ वे वर्ष आहे.

कोल्हापूरच्या अजब प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकात लेखकाच्या जीवनात आलेल्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. एस. एम. जोशी, स्वामी रामानंद तीर्थ, विनोबा भावे, प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे आदींच्या आठवणी या पुस्तकात आल्या आहेत.

पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## * मुंबई पत्रकार संघाचे पुरस्कार

'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीचे निवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर यांना मुंबई मराठी पत्रकार संघाचा 'विद्याधर गोखले स्मृती पुरस्कार' देण्यात आला. उत्कृष्ट ललित लेखनासाठी हा पुरस्कार आहे. एकूण १२ पत्रकारांना ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ पत्रकार शरद कारखानीस यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

गौरव पुरस्काराचे हे मान्यवर मानकरी ठरले. कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य

जयेंद्र सरस्वती यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

चटर्जी यांना 'उत्कृष्ट सामाजिक नेतृत्त्व' या प्रवर्गातील पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या कार्याबद्दल बोलताना चिदम्बरम म्हणाले की, देशाच्या लोकशाहीसाठी जे योग्य आहे त्याला पाठिंबा देण्याकरिता राजकीय मर्यादा ओलांडण्याचेही धाडस चटर्जी यांनी अणुकरारावरून संसदेत निर्माण झालेल्या वादग्रस्त परिस्थितीत दाखविले. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून घेतलेल्या निर्णयामुळे त्यांनी आपल्या पक्षाकडून नाराजी ओढवून घेतल्याचे ते म्हणाले.

कोकण रेल्वे आणि दिल्लीच्या मेट्रो रेल्वेचे मुख्य अभियंता म्हणून ई. श्रीधरन यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'एक्सलन्स इन कम्युनिटी लीडरशिप' या प्रवर्गातील पुरस्काराने गौरविण्यात आले. ७५० किती लांबीचा कोकण रेल्वे प्रकल्प आणि ६५ किमी लांबीचा दिल्ली मेट्रो रेल्वे प्रकल्प आम्ही मुदत संपण्यापूर्वी आणि तरतूद केलेल्या निधीपेक्षा कमी खर्चात पूर्ण करून दाखविल्याचे श्रीधरन यांनी पुरस्काराला उत्तर देताना सांगितले. माझे सर्व सहकारी, अभियंते आणि कामगार यांचा या पुरस्कारामध्ये महत्त्वाचा वाटा असल्याचे ते म्हणाले.

'विज्ञान आणि तंत्रज्ञान' या क्षेत्रासाठी दिला जाणारा पुरस्कार अन्नादुराई यांना प्रदान करण्यात आला. चांद्रयान ही भारतातील केवळ वैज्ञानिक मोहीम नाही, तर भविष्यात आपला देश अंतराळ मोहिमांमध्ये काय करू शकतो, याचे हे प्रतीक असल्याचे अण्णादुराई यावेळी म्हणाले.

'भाषा व संस्कृती' या क्षेत्रासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचा मान नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख सत्यव्रत स्वामी यांना मिळाला. जगभरातील बहुतेक भाषांची निर्मिती संस्कृतपासून झाली असून त्यामुळे भारताकडे आदराने पाहिले जाते, असे ते म्हणाले.

### * किसनमहाराज साखरे यांना 'ऋग्वेद पुरस्कार'

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने 'ऋग्वेद भूषण' पुरस्कार डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते ज्ञानेश्वरीच्या नवरसाचे अभ्यासक ह. भ. प. किसनमहाराज साखरे यांना प्रदान करण्यात आला.

मानपत्र, स्मृतिचिन्ह, रोख रक्कम दहा हजार एक रुपये, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

वेद म्हणजे खरे ब्रह्मज्ञान असून, चार वेदातच शाश्वत मूळ अधिष्ठान आहे, ते ज्ञान संगणकात आणताना परमोच्च आनंदाची अनुभूती आली, असे भटकर म्हणाले.

राहण्यापेक्षा महात्मा फुले-राजर्षि शाहू आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना अभिप्रेत समाज घडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे,'' असे मत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले बहुजन महासंघातर्फे त्रिरत्न पुरस्कार, सावित्रीबाई फुले व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. पुणे विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी गंगाधर जंगमवाड यांच्यासह रामदास गुरमे, चंद्रकांत बर्गे, एम. जी. पिंगळे, रामाशंकर यादव, किशोर निकम, राहुल बाराथे, बापूसाहेब गायकवाड, बापूसाहेब धावरे, सुभाष आखाडे यांना त्रिरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. किरण जंगमवाड यांच्यासमवेत मोहिनी आखाडे व सीमासिंग झोकारकर यांना सावित्री फुले पुरस्काराने गौरविण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्याबाई पुरस्कार देऊन नेहा कोकरे, प्रतिमा चंद्रन व स्वाती महाळंक यांचा सन्मान करण्यात आला.

*** महाबँक पुरस्कार**

मराठी अभ्यास परिषद आणि महाराष्ट्र बँकेतर्फे सर्वोत्कृष्ट भाषाविषयक लेखनासाठीचा महाबँक पुरस्कार यावर्षी प्रा. माधव ना. आचार्य यांना डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या हस्ते रविवार १३ डिसेंबर रोजी देण्यात आला. आचार्य यांनी 'ध्वनितांचे केणे' या पुस्तकाचे लेखन केले आहे. ५००० रु. रोख आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी अरुण जाखडे, दिलीप मेहरा, नीलिमा गुंडी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे रंजना फडके यांनी प्रास्ताविक तर आनंद काटीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

*** पत्रकार संघाचे पुरस्कार**

'लोकसत्ता'चे मुख्य उपसंपादक श्रीकांत कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार दिनकर रायकर, अरुण खोरे, मुलाखतकार सुधीर गाडगीळ, पोलीस अधिकारी अनिल कुंभारे, चित्रपट दिग्दर्शिका रेणुका शहाणे यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पुरस्कार मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनी अर्थात पत्रकारदिनी देण्यात आले.

विशेष पत्रकारितेचे पुरस्कार रणधीर कांबळे, विवेक भुसे, शकीला सय्यद यांना जाहीर झाले. छायाचित्रकार विजय जगताप यांचाही यात समावेश आहे. मुलाखतकार-निवेदक म्हणून सुधीर गाडगीळ यांना पुरस्कार देण्यात आला.

पोलीस दलातील अधिकारी व गुन्हे अन्वेषण विभागाचे उपायुक्त अनिल कुंभार यांना 'उत्कृष्ट कामगिरी'चा पुरस्कार मिळाला. राज्याचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, गृहमंत्री आर. आर. पाटील, सिनेअभिनेते आशुतोष राणा या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

येऊन मला गौरवून जे प्रेम दिले ते फार महत्त्वाचे आहे.

*** पर्यावरण अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांना 'नातू पुरस्कार'**

''पर्यावरणाच्या समस्यांनी आज जे उग्र रूप धारण केले आहे, त्याचे मूळ बाह्य पर्यावरणात नसून ते आपल्या आंतरिक पर्यावरणात, विचारांच्या प्रदूषणात आहे. म्हणूनच जोवर आपण चंगळवादी, उपभोगवादी जीवनशैलीचा त्याग करून संयमित जीवनशैली अंगीकारत नाही तोपर्यंत या समस्याही अनुत्तरित राहतील,'' असे मत ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

कुलकर्णी यांना नातू फाउंडेशनतर्फे 'महादेव बळवंत नातू पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह, शाल-श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

कुलकर्णी म्हणाले, ''विज्ञान-तंत्रज्ञानाकडे पर्यावरणाच्या सर्व समस्यांचे, प्रश्नांचे उत्तर आहे असा एक भ्रामक समज पसरविण्यात येत आहे. मनुष्याच्या अतिरिक्त उपभोगवादामुळे निसर्गाच्या संतुलनाची मर्यादा ओलांडली गेली असून त्यातून हे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणूनच वैयक्तिक पातळीवरील गरजा कमी करत स्वत:पुरता तरी मी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार केला आहे. आम्ही चालत आहोत, प्रबोधन करत आहोत आणि हळूहळू समाजही याला सकारात्मक प्रतिसाद देत आहे याचे समाधान आहे.''

यमगरवाडी आणि नेर्ले प्रकल्पांतर्गत भटक्या विमुक्तांसाठी कार्य करणाऱ्या अशोक तांबे यांचा 'सुलोचना नातू स्मृती सेवाव्रती कार्यकर्ता पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल-श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्ञानप्रबोधिनीचे संचालक गिरीश बापट यांच्या हस्ते पुरस्कार वितरण पार पडले.

सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या १३ संस्थांनाही या वेळी आर्थिक देणग्या देण्यात आल्या. नातू फाउंडेशनचे दत्ता टोळ, पौर्णिमा कुलकर्णी या वेळी उपस्थित होत्या.

तांबे म्हणाले, ''एकीकडे जात संपविण्याचे आवाहन करण्यात येत असताना राज्यातील १७५ जमातींमधील तब्बल दीड कोटी जनतेला माणूस म्हणून कोणतीही ओळख मिळालेली नाही. केवळ जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दहा-दहा वर्षे संघर्ष करणाऱ्या या माणसांकडे व्यवस्थेचे लक्ष जाण्याची गरज आहे. शिक्षण सुरू असताना एकदा यमगरवाडी प्रकल्पात जाण्याचा योग आला तेव्हा उपेक्षित समाजासाठी काम करण्याचा निश्चय केला. गेल्या दहा वर्षांत यमगरवाडी, नेर्ले यांसह अनेक प्रकल्पांचे काम केले आहे; पण समस्येच्या प्रमाणात काम कमी पडत असल्याची चित्रपटातील दृश्याबद्दल आक्षेप असले तर ते बदलायला सांगण्यासाठी कुणी

ढवळाढवळ करू नये. त्यातील लोकांना जे आवडेल, ते त्यांनी घ्यावे. दिग्दर्शकांने तयार केलेला चित्रपट हा त्याच्यासाठी कलाकृती असतो. त्याने अन्य सेन्सॉरशिप किंवा दबाव मानूच नये, असे आवाहन डॉ. श्रीराम लागू यांनी केले. 'झेंडा' चित्रपटावरून सध्या वाद सुरू आहे. त्याविषयी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सेन्सॉरशिबद्दल बोलताना 'गिधाडे' या नाटकाचे उदाहरण देत त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

## * डॉ. अरुण कुमार यांना भास्कर कर्वे पुरस्कार

''देशात आर्थिक दारिद्र्याचा प्रश्न मोठा आहे तो संपविण्यासाठी पहिल्यांदा समाजात असलेले बौद्धिक दारिद्र्य दूर करणे आवश्यक आहे. समाजातील वंचित घटकाची जाण बुद्धिवंत वर्गाला राहिलेली नाही. हे बौद्धिक दारिद्र्य दूर केल्यास आर्थिक दारिद्र्याचा प्रश्न सुटण्यास वेळ लागणार नाही'' असे मत सामाजिक कार्यकर्ते नारायण हेगडे यांनी व्यक्त केले.

कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिसच्या वतीने देण्यात येणारा भास्कर कर्वे पुरस्कार व्यवस्थापन तज्ज्ञ प्रा. डॉ. अरुण कुमार यांना देण्यात आला. या वेळी ज्येष्ठ व्यवस्थापन तज्ज्ञ पी. एस. शेजवलकर, अजय भावे, विजय लिमये, डॉ. डी. एम. वाकोलकर उपस्थित होते.

हेगडे म्हणाले, ''ग्रामीण भागातील ४२ टक्के लोक दारिद्र्य रेषेखालचे जीवन जगत आहेत. ते दोन वेळचे अन्न, आरोग्य सुविधा, शिक्षण यापासून वंचित आहेत. यामध्ये भूमिहीन, अनुसूचित जाती-जमातींमधील लोक यांची संख्या जास्त आहे. आपण अण्विक क्षमता विकसित केली आहे तसेच चंद्रावर यान पाठविण्यातही यशस्वी झालो आहोत. मात्र दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्यात यश आलेले नाही. देशात आर्थिक दारिद्र्यापेक्षाही बौद्धिक दारिद्र्य मोठे असल्याने या प्रश्नाच्या सोडवणुकीत अपयश येत आहे.''

सोशल वर्क यांचे भाषांतर 'समाजकार्य' असे करण्याऐवजी 'सामाजिक कार्य' असे करणे अधिक योग्य ठरेल. सामाजिक कार्य करण्यासाठी मूल्ये, दृष्टिकोन यांचा विकास होणे आवश्यक असल्याचे अरुण कुमार यांनी सांगितले. पी. एस. शेजवलकर यांनी प्रास्ताविक केले.

## * बुजुर्ग अभिनेत्री संध्या यांना व्ही. शांताराम पुरस्कार

जुहूच्या नोवोटेल हॉटेलमध्ये २३ डिसेंबर २००९ रोजी व्ही. शांताराम पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त राणी मुखर्जीपासून नंदिता दासपर्यंत आणि पं. जसराज यांच्यापासून ते यश चोप्रापर्यंत अनेक सेलिब्रेटी हजर होते.

'पिंजरा', 'चंदनाची चोळी अंग अंग जाळी', 'इये मराठीचिये नगरी', 'नवरंग',

'दो आँखे बारह हाथ', 'झनक झनक पायल बाजे' अशा अनेक मराठी-हिंदी सिनेमांमधून आपल्या कसदार अभिनयाची आणि बहारदार नृत्यांची मोहिनी रसिकांवर टाकणाऱ्या अभिनेत्री संध्या यांना 'व्ही. शांताराम पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. 'नवरंग' या त्यांच्या गाजलेल्या चित्रपटाला पन्नास वर्षे झाल्यानिमित्त किरण शांताराम आणि प. जसराज यांनी संध्या यांना शाल आणि सन्मानचिन्ह बहाल केले. हा पुरस्कार म्हणजे माझ्या गुरूंचा सन्मान आहे. व्ही. शांताराम यांच्या स्मृती अखंड राहण्यासाठी काम करणाऱ्या मुलांना सहकार्य करा, असे विनंतीवजा आवाहन संध्या यांनी केले.

भारतातील विविध भाषांतील चित्रपटांना देण्यात येणाऱ्या व्ही. शांताराम पुरस्कारांमध्ये 'कांजीवरम्' या तमिळ चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचे, तर प्रियदर्शन यांना उत्कृष्ट दिग्दर्शनाचे सुवर्णपदक मिळाले.

'गाभ्रीचा पाऊस' या चित्रपटाला रौप्यपदक आणि दिग्दर्शक सतीश मनवर यांना दिग्दर्शनाचे वैयक्तिक रौप्यपदक मिळाले. 'लव्ह आज कल' या हिंदी चित्रपटाला कांस्यपदक देण्यात आले. दिल बोले हडिप्पा या सिनेमासाठी राणी मुखर्जीला अभिनयाचा, 'फिरक' चित्रपटासाठी नंदिता दास हिला दिग्दर्शनाचा, तर न्यूयॉर्क चित्रपटासाठी आदित्य चोप्रा याला पटकथेचा व्ही. शांताराम पुरस्कार देण्यात आला.

प्रकाश राज, अनुष्का शर्मा, इरफान खान यांनाही अभिनयाचे पुरस्कार देण्यात आले. तांत्रिक विभागातील पुरस्कारांचेही वितरण योवळी करण्यात आले. 'कांजीवरम्' या तमिळ चित्रपटाने सर्वाधिक पुरस्कार पटकावले.

### * आगाशे बाल साहित्य पुरस्कार

शशिकलाताई आगाशे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी दासू वैद्य (औरंगाबाद) यांच्या 'क कवितेचा' आणि अनंत भावे (मुंबई) यांच्या 'गिरकी घेऊन कबुतर सांगतंय' या संग्रहांची निवड करण्यात आली. प्रत्येकी पाच हजार रुपयांचे हे पुरस्कार ३१ जानेवारी २०१० रोजी समारंभपूर्वक देण्यात आले.

यापूर्वी आगाशे स्मृती बालवाङ्मय पुरस्कार रेखा बैजल (प्रकाशाची फुले), लीला दीक्षित (मुके मित्र), डॉ. कल्याण इनामदार (उलट्या सुलट्या देशात), प्रवीण दवणे (गाणे स्वातंत्र्याचे), प्रशांत गौतम (शूर झाले वीर), निर्मला माने (बाहुलीचं घर), दत्ता टोळ (अमृतपत्र विवेकानंद), राजीव तांबे (आमची शाळा), शंकर विटणकर (लाडके आजोबा), मधू सावंत (निवडुंगाची फुले), रमेश चिल्ले (मन वढाय वढाय), भारत सासणे (टुण् टुण् बेडकाचा प्रवास), प्रतिमा इंगोले (मोठ्ठं व्हायचं कसं?), रेणु पाचपोर (एक हिरवगार वर्ष), श्रीनिवास पंडित (डेनिसच्या गोष्टी), अमर हबीब (खरी कमाई), गिरिजा कीर (तू सावित्री हो) या बालसाहित्यकारांना

सन्मानपूर्वक देण्यात आला आहे.

### * कुमार केतकर यांना जीवन गौरव पुरस्कार

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दै. लोकसत्ता चे संपादक कुमार केतकर यांना जीवन गौरव पुरस्कार २६ जानेवारी रोजी सांगलीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. पन्नास हजार रुपये रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे यांनी दिली.

पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना दरवर्षी महाराष्ट्र राज्य पत्रकार पत्रकार संघाच्या वतीने 'जीवन गौरव' पुरस्कार देण्यात येतो.

मराठी पत्रकारितेबरोबरच इंग्रजी व अर्थविषयक मान्यवर दैनिकात श्री. केतकर यांनी तीन दशकांहून अधिक काळ काम केले आहे. त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' देऊन सन्मानित केले आहे.

### * ह. मो. मराठे यांना कोकण साहित्य भूषण

कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा यंदाचा 'कोकण साहित्य भूषण' पुरस्कार प्रसिद्ध लेखक ह. मो. मराठे यांना जाहीर झाला आहे. 'कोमसाप'च्या ठाणे जिल्हा साहित्य संमेलनात पुरस्काराची घोषणा करण्यात आली. याआधी श्री.ना पेंडसे, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, रवींद्र पिंगे, मधु मंगेश कर्णिक, विद्याधर भागवत आदी कोकणच्या नामवंत मराठी साहित्यिकांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

ह. मो. मराठे यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीपासून ३०-३५ कि.मी. अंतरावरील दोडामार्ग तालुक्यातील झोळंबे या गावचा. त्यांचे शिक्षण मालवण, रत्नागिरी येथे झाले. त्यांच्या सुरवातीच्या 'काळेशार पाणी', 'देवाची घंटा' या कादंबऱ्या आणि 'समाधी', 'विहिर', 'देऊळ', इत्यादी गाजलेल्या कथा कोकणच्या पार्श्वभीवरच्या आहेत. 'बालकाण्ड', 'पोहरा' या अलीकडच्या कादंबऱ्यांत त्यांनी आपल्या बालपणीची हकीकत कथन करता करताच पुन्हा एकदा अर्धशतकाआधीचे कोकण सजीव केले आहे.

❐

**www.mehtapublishinghouse.com**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

# वाचकांचा प्रतिसाद

संपादक,

स.न.वि.वि.

'मेहता मराठी ग्रंथजगत' चा दिवाळी २००९ चा दीपावली विशेषांक हाती पडला. वाचला. आवडला. काही लेख दोन-दोन वेळा वाचले. उत्कृष्ट वाचनीय अंकाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

काही वर्षांपूर्वी एक चित्रपट खूप गाजला होता. शीर्षक होतं : अराऊंड द वर्ल्ड इन एटी डेज. तो सिनेमा म्हणजे संपूर्ण जगाच्या प्रदक्षिणेवरील धावती कॉमेंटरी होती. आपला यावर्षीचा दिवाळी अंक म्हणजे साठ रुपयात सुमारे वीस देशांची सफर! संपूर्ण अंकच संग्राह्य आणि वाचनीय आहे. अंकामधील लेख म्हणजे निव्वळ धावती प्रवासवर्णने नसून रोचक, नवनवीन माहितीची जणू दालनेच वाचकांसाठी खुली केलेली आहेत. शशिकला टाकळकर (सिंगापूर), शोभना शिकनीस (अमेरिका), रणजीत मिरजे (आफ्रिका) वगैरे लेख आवर्जून वाचावेत असे आहेत.

आकाशवाणी-विविधभारतीची भरभराट होण्यापूर्वी, दूरदर्शनचाही जन्म भारतात होण्यापूर्वी येथील जनतेवर राज्य होते रेडिओ सिलोनच्या बिनाका गीतमालेचे. ती ऐकण्यासाठी बुधवारी सायंकाळी सगळी हॉटेल्स सर्वत्र फुल असायची. त्यासाठी एक कप चहा घेण्याकरता एक आणा (म्हणजे सहा नव्या पैशांचे जुने पितळी नाणे. त्याला 'गिन्नी' म्हणत. सोळा आण्यांचा एक रुपया) मी जपून ठेवीत असे. रेडिओ सिलोनचे 'भूले बिखरे गीत' आजही स्मणात आहे. तर असे हे सिलोन रेडिओ स्टेशन; आर्थिक कारणांमुळे शेवटची घटका मोजत आहे. भले ते परदेशी असेल, पण गेली साठ-सत्तर वर्षे ते हिंदी राष्ट्रभाषा व मराठीसह इतरही भारतीय भाषांची सेवा करीत आहे. दिवाळीअंकातील श्रीलंकेवरील लेखामुळे ते जुने दिवस आठवले.

**चंद्रकांत अंबाडे, भुसावळ**

मा. श्रीमती लीनाताई सोहोनी,

सस्नेह नमस्कार

आपण अनुवादित केलेली पुस्तके वाचली. सुधा मूर्ती यांचे 'गोष्टी माणसांच्या' फारच आवडले. इतर भाषेतील कथा, परिसर वर्णन, मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन घडले. पुस्तक संग्रही ठेवण्याची इच्छा झाली.

'नॉट विदाऊट माय डॉटर' हे पुस्तक वाचून तर अक्षरश: हादरूनच गेले. स्त्रीला किती अडचणी येऊ शकतात, पण तिच्यातील आई त्या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी तिला कशी शक्ती मिळवून देते हे खरोखरच बघण्यासारखे आहे. ज्या मुली आज परदेशात एकट्या राहतात, प्रेमविवाह करतात त्यांनी डोळसपणे सर्व निर्णय घेणे जरुरीचे आहे. स्वत:चे रक्षण करण्यासाठी सक्षम होणे जरुरीचे आहे ह्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. एका वेगळ्या जगाची ओळख आमच्यासारख्या सामान्य स्त्रियांना या पुस्तकामुळे होऊ शकते.

पुस्तकातील प्रसंग जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे राहतात. पुस्तक वाचताना प्रत्येक प्रसंगी आपण तिथेच आहोत असे वाटते. हे सगळे आपल्या साध्या सरळ भाषाशैलीमुळेच शक्य झाले. कुठेही औपचारिक, अलंकारिक भडकपणा जाणवला नाही. ही पुस्तके वाचून अनुवादित पुस्तके वाचण्याची गोडी निर्माण झाली. बाहेरील जगात काय चालू आहे हे जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली.

**सौ. रिमा राम लांजेकर,** निगडी, पुणे ४११ ०४४.


## प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरू राहील.

वेळ– सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

## व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **आपण : आपले ताणतणाव** : एक चिंतन | अंजनी नरवणे | १०० |
| **चला उठा कामाला लागा!** : स्वाती-शैलेश लोढा | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| **हितगूज तणावयुगातील तरुण पिढीशी** | अंजनी नरवणे | १२० |
| **निरामय यशासाठी ध्यान** | शुभदा गोगटे | ७० |
| **मनावर विजय** : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| **चिंतामुक्त जीवन** | आर.डी. मुनोत | १६० |
| **यशाचा कानमंत्र** : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| **आत्मविश्वासाचा कानमंत्र** : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ४० |
| **उत्तम स्मृतीचा कानमंत्र** : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| **आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र** : अनंत पै | अनु. प्रशांत तळणीकर | ८० |
| **पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र** | संजीव परळीकर | ७० |
| **पुढाकार घ्या** : प्रभावी व्यक्तिमत्वाचे सूत्र | संजीव परळीकर | २०० |
| **झटपट व्यक्तिमत्त्व विकास** | संजीव परळीकर | ५० |
| **चार शब्द द्यावे-घ्यावे** | संजीव परळीकर | ७० |
| **मुलांच्या समृद्ध जीवनासाठी** | डॉ. सुचित तांबोळी | १७० |
| **मुलांवरचे संस्कार** *(राज्य पुरस्कार)* | शं.व्यं. काश्यपे | ९० |
| **असे बना अन् बनवा विद्यार्थी** | शं.व्यं. काश्यपे | आ.सं. |
| **तुम्ही आणि तुमची मुलं!** | रुपांतर : अविनाश भोमे | ८० |
| **सुजाण पालकत्व** | मीना टाकळकर | ६० |
| **द मॅजिक ऑफ थिंकींग बिग** : डेव्हिड श्वार्ट्झ | अनु. प्रशांत तळणीकर | २०० |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४० |
| **सुंदर मन** : एडवर्ड डी बोनो | अनु. सुभाष जोशी | १२० |
| **द माइंड जिम** | अनु. श्याम भुर्के | २०० |
| **धीरुभाईझम** : ए.जी. कृष्णमूर्ती | अनु. सुप्रिया वकील | ८० |
| **प्रतिकूलतेवर मात** : ए.जी. कृष्णमूर्ती | अनु. सुप्रिया वकील | ७० |
| **डबेवाला** : श्रीनिवास पंडित | अनु. सुप्रिया वकील | ७० |
| **'चॅम्पियन' व्हा!** | डॉ. रमा मराठे | २२० |

मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे. **पोस्टेज खर्च प्रत्येकी २५**

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **सभेत कसे बोलावे** | श्याम भुर्के | ६० |
| **मंत्र श्रीमंतीचा** | श्याम भुर्के | १३० |
| **शर्यती स्पर्धा खेळ** | आ.पां. खरात | १२० |
| **बुद्धिबळाचा ओनामा** | ना.रा. वडनप | ८० |
| **सुसंघटित मारा** (बुद्धिबळ) | ना.रा. वडनप | १०० |
| **चतुरंग** (बुद्धिबळातील) **सापळे** | ना.रा. वडनप | १०० |
| **बुद्धिबळाचा श्रीगणेशा** | ना.रा. वडनप | १२० |
| **बुद्धिबळ शिका** | ना.रा. वडनप | १०० |
| **शिवणकला एक छंद :स्मॉकिंग** | हेमा कळके | १०० |
| **शिवणकला एक छंद :**सलवार कमिज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी | हेमा कळके | ८० |
| **गाऊन्स** | हेमा कळके | १६० |
| **क्रोशा विणकाम** | प्रभावती पुरम | २०० |
| **लोकरीचे विणकाम** | आशा पत्रावळी | ३५० |
| **डिझाईन युअर करिअर** : श्रीनिवास पंडित | अनु. सुप्रिया वकील | १२० |
| **द हंग्री स्पिरिट** : चार्ल्स हॅन्डी | अनु. प्रशांत तळणीकर | २०० |
| **मनगंगेच्या काठावरती** | डॉ. रमा मराठे | १२० |
| **केल्याने होत आहे रे...** | संजीव परळीकर | ६० |
| **विक्रीकौशल्य शिका :** उत्तम विक्रेता बना | संजीव परळीकर | ५० |
| **हे वयच वेडं असतं!** | शुभांगी खासनीस/ केतकी काळे/ प्रसन्न रबडे | २०० |
| **व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स** : बार्बरा/ॲलन पीस | ॲड. शुभदा विद्वांस | १२० |
| **अर्थाच्या शोधात** : व्हिक्टर फ्रँकल | अनु. विजया बापट | १३० |
| **प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स** : ॲलेक्स पॅटाकोस | अनु. विजया बापट | १४० |

**पोस्टेज खर्च प्रत्येकी २५** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

## अनुवादित अनुभवकथन

**अदम्य जिद्द** :डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अनु. सुप्रिया वकील १८०
*(आपटे वाचनमंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्टतर्फे २००८ सालचा 'उत्कृष्ट अनुवादित साहित्यकृती' पुरस्कार)*
**इट हॅपन्ड् इन इंडिया** : किशोर बियाणी दीपायन बैश्य अनु. उषा महाजन १८०
**शिंडलर्स लिस्ट** : थॉमस केनेली अनु. संजय दाबके ३००
**एनस्लेव्ह्ड** : राहिला गुप्ता अनु. सुनीती काणे ३००
**इराणमधून सुटका** : सुझान आझादी / अँजेला फेरान्ते अनु. विदुला टोकेकर २५०

## अनुवादित आत्मकथन

**द जॉय ऑफ कॅन्सर** :अनुप कुमार अनु. माधुरी शानभाग १५०
**ए कॉल टू ऑनर** : उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी साद : जसवंतसिंग अनु. अशोक पाध्ये ४००
**सेक्स वर्कर** : नलिनी जमीला अनु. सुप्रिया वकील १२०
**इट्स नॉट अबाउट द बाइक** : लान्स आर्मस्ट्राँग / सॅली जेनकिन्स अनु. अंजनी नरवणे २४०
**इन द नेम ऑफ ऑनर** : मुख्तार माई अनु. उल्का राऊत ८०
**मेरा परिवार** : नटालिया फ्लौमर अनु. विमल लिमये १२०
**''मी अनीता राकेश सांगतेय...''** : अनीता राकेश अनु. रजनी भागवत १६०
**अ वुमन्स करेज** : जॅकलिन गोल्ड अनु. प्रशांत तळणीकर २२०
**माय फॅमिली इज ऑल आय हॅव** : हेलन-ॲलीस डिअर अनु. चित्रा वाळिंबे २२०
*(पुणे मराठी ग्रंथालयातर्फे उत्कृष्ट अनुवादासाठी 'कै.ना.ह. आपटे पुरस्कार' २००९)*
**कॅच मी इफ यू कॅन** : फ्रँक अबॅग्नेल / स्टॅन रेडिंग अनु. ज्योत्स्ना लेले २००
**मॅन, इंटरप्टेड** : जेम्स बेली अनु. विदुला टोकेकर १८०

मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे. **पोस्टेज खर्च प्रत्येकी २५**

## अनुभवकथन

| | | |
|---|---|---|
| **स्ट्रगलर्स** | मुक्ता चैतन्य | ९० |
| **मोहतरम्मा ते अम्मा** | सुधा गोखले | १२० |

*(मराठी साहित्य परिषद, पुणे यांच्यातर्फे ललित लेखनाचा प्रा. उमाकांत कीर पुरस्कृत 'कृष्णाजी वामन कीर पुरस्कार २००८')*

| | | |
|---|---|---|
| **त्यांच्या सिंड्रोमची कथा** | कल्पना चारुदत्त | १३० |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **चाकाची खुर्ची** | नसीमा हुरजूक | १८० |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५० |

*(राज्य पुरस्कार-लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार २००६/स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार २००६/महाराष्ट्र फाउंडेशन ग्रंथ पुरस्कार २००७)*

| | | |
|---|---|---|
| **जिहाद** | हुसेन जमादार | २२० |
| **बारबाला** | वैशाली हळदणकर | २०० |
| **भोगले जे दुःख त्याला...** | आशा आपराद | २२० |

*(मराठी साहित्य परिषद, पुणे यांच्यातर्फे कीर्तनसंजीवनी डॉ. पुष्पलता रानडे पुरस्कृत 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार २००८', गाडगीळ भगिनींतर्फे 'मातृपितृ' पुरस्कारांतर्गत कै. काकासाहेब गाडगीळ पुरस्कार २००९, भैरूरतन दमाणी पुरस्कार २००९, महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००९, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांच्यातर्फे सुधाताई जोशी जी.ए. पुरस्कार' २००९)*

| | | |
|---|---|---|
| **Glimpses of Changing Banking Scenario** | P. N. Joshi | ३०० |
| **मी भरून पावले आहे** | मेहरुन्निसा दलवाई | १६० |
| **विमुक्ती** | दिपा महानवर | २२० |

**पोस्टेज खर्च प्रत्येकी २५** मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे.

# श्रद्धांजली

*** संस्कृतचे व्यासंगी प्राध्यापक डॉ. वा. का. क्षीरसागर**

कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. वासुदेव क्षीरसागर (वय ७२) यांचे निगडी येथे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम करीत असताना त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक चांगले उपक्रम राबविले होते. 'वसतिगृह व्यवस्थापन' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यांनी लिहिलेले 'रॅगिंग' या विषयावरील पुस्तक लवकरच प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

*** कवी अशोक हिंगे**

कवी अशोक किसनराव हिंगे (वय ५७) यांचे अल्पशा आजाराने ३० डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी व तीन कन्या असा परिवार आहे.

कवी हिंगे देहूरोड येथील ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये काम करीत होते. राज्यातील विविध वृत्तपत्रे, मासिके व दिवाळी अंकांसाठी त्यांनी काव्यलेखन केले आहे.

*** प्रभावती कुरुंदकर**

प्रभावती नरहर कुरुंदकर (वय ७३) यांचे दीर्घ आजाराने दि. ९ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, तीन विवाहित कन्या आणि नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ विचारवंत-साहित्यिक आणि वक्ते प्राचार्य (कै.) नरहर कुरुंदकर यांच्या त्या पत्नी होत.

नांदेड येथे वास्तव्य असलेल्या प्रभावती कुरुंदकर यांच्यावर दीड वर्षापूर्वी गुडघा प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर त्या पुन्हा नांदेड येथे राहावयास गेल्या. पार्किन्सन्सचा त्रास असलेल्या प्रभावती या प्रकृतिअस्वास्थ्यामुळे तीन महिन्यांपासून पुण्यामध्ये मुलाकडे वास्तव्यास आल्या. मात्र वृद्धापकाळामुळे त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

साहित्यलेखन, व्याख्याने या निमित्ताने कुरुंदकर सातत्याने घराबाहेर असायचे. त्या वेळी घरातील सर्व कामे सांभाळण्याबरोबरच प्रभावती यांनी मुलांचे संगोपन केले. कुरुंदकर हे नांदेड येथील पीपल्स कॉलेजचे प्राचार्यपद भूषवीत असताना संस्थेने देऊ केलेला सेवक त्यांनी नाकारला होता.

कुरुंदकर सरांचे मित्र आणि विद्यार्थी यांचा घरामध्ये राबता असताना प्रभावती यांनी घरामध्ये येणाऱ्या प्रत्येकाचे हसतमुखाने आदरातिथ्य केले. त्या कुरुंदकर यांच्या खऱ्या अर्थाने 'गृहिणी-सखी-सचिव' होत्या.

*** लेखिका मंदाकिनी गोगटे**

ज्येष्ठ लेखिका मंदाकिनी गोगटे यांचे १५ जानेवारी रोजी पहाटे पाच वाजता एका खाजगी रुग्णालयात दिर्घ आजाराने निधन झाले. त्या ७३ वर्षांच्या होत्या त्यांच्या पश्चात तीन कन्या आहेत.

मंदाकिनी गोगटे यांचा जन्म १६ मे १९३६ रोजी मुंबईत झाला. त्यांनी एस.एन.डी.टी. विद्यापीठातून आपले शिक्षण पूर्ण केले. 'सवत माझी लाडकी', 'प्रेमाच्या होड्या' या लघुकथा 'गार्गी' ही कादंबरी, 'त्या फुलांच्या सुंदर प्रदेशात' हे प्रवास वर्णन इत्यादी त्यांचे साहित्य लोकप्रिय ठरले आहे. साहित्य लेखनासाठी त्यांना राज्य सरकारतर्फे अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

❒

# बालनगरी

१४ नोव्हेंबरच्या बालदिनाचे निमित्त साधून पुण्यातील विविध शाळांच्यामधील मुलांसाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे एक निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या निबंध स्पर्धेसाठी इ.५ ते ७वी. आणि इ.८वी ते १०वी असे दोन गट करण्यात आले होते. स्पर्धेसाठी सुमारे २५० निबंध आले. त्यात प्रत्येक गटातील पहिल्या ५ क्रमांकांना पुरस्कार म्हणून 'मेहता मराठी ग्रंथजगत'चे एका वर्षाचे सभासदत्व व १५०रु. ची पुस्तके भेट म्हणून देण्यात येत आहेत. आणि पुरस्कार विजेत्या शाळांनाही 'मेहता मराठी ग्रंथजगत'चे अंक वर्षभर पाठवण्यात येतील.

**सर्व विजेत्यांचे अभिनंदन!**



## निबंध स्पर्धा निकाल

### इ. ५ ते ७ वी गट

१. कल्याणी कैलास मेमाणे, (७ वी तु. रायगड.)
विमलाबाई गरवारे शाळा, कोथरूड,
२. कोमल उदय धिवार, (इ. ७ वी तु. अ)
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ४.
३. मनाली राजेंद्र कुलकर्णी, (इ. ७ वी तु. अ)
नू. म. वि. मुलींची प्रशाला, पुणे ३०
४. कोमल चंद्रकांत तरळ, (इ. ६ वी तु. अ)
नू. म. वि. मुलींची प्रशाला, पुणे ३०.
५. प्रतिज्ञा जीवन मुसांडे, (इ. ७ वी तु. तोरणा)
विमलाबाई गरवारे प्रशाला, पुणे

### इ. ८ ते १० गट

१. शुभम शरद जगताप, (इ. ९वी तु. क)
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ४.
२. कल्याणी चंद्रशेखर पंचभाई, (इ. १०वी)
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ४.
३. अनघा नंदकुमार मालगुंडकर, (इ. १०)
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे. ४
४. तन्मयी राजेंद्र सरोदे, (इ. १० तु. क)
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ४.
५. स्नेहल विष्णू बने, (इ. ९ वी तु. गुलाब)
रेणुका स्वरूप म.मो. गर्ल्स हायस्कूल पुणे.

**सर्व विजेत्यांचे अभिनंदन!**

# माझा आवडता वैज्ञानिक
## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

इ.५ ते ७ वी गट - **प्रथम क्रमांक**

तामिळनाडूमधील रामेश्वरम या छोट्या धर्मक्षेत्री १९३१मध्ये जन्मलेला अब्दुल कलाम हा मुलगा मोठा झाल्यावर देशातील 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळवणारा ठरला. ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणून आपण त्या मुलाला ओळखतो.

त्यांच्या वडिलांचे नाव जैनुलबदीन होते. त्यांच्या आईचे नाव अशियम्मा. एक आदर्श जोडपे म्हणून त्यांना ओळखले जाई. आईच्या पूर्वजांपैकी कुणाला तरी ब्रिटिशसरकार कडून 'बहादूर' अशी पदवी मिळाली होती.

एकोणिसाव्या शतकात बांधलेल्या पिढीजात घरात त्यांचे वास्तव्य होते. त्यांचे वडील साध्या राहणीचे भोक्ते होते. अन्न, वस्त्र, औषधपाणी कुणालाही कमी पडू नये अशी काळजी आई-वडील घेत.

अब्दुल कलाम यांचे बालपण भावनिक, सांपत्तिकदृष्ट्या अगदी सुरक्षित व सुखाचे गेले. कलाम नेहमी त्यांच्या आईबरोबर स्वयंपाकघरात फरशीवर बसून जेवत असत. त्यांच्यासमोर केळीचे पान ठेवून आई अगदी प्रेमाने भाताचा ढीग वाढत असे, वरती मसाल्याच्या वासाने घमघमणारे सांबर असायचे. एका बाजूला तोंडाला पाणी सुटेल अशी चमचमीत, घरगुती लोणची असायची, तर दुसऱ्या बाजूला खोबऱ्याच्या स्वादिष्ट चटणीचा गोळा असायचा.

त्यांच्या घराच्या आजूबाजूची वस्ती प्रामुख्याने मुसलमान होती. काही हिंदू कुटुंबेही तेथे होती. कलाम वडिलांबरोबर नमाज पठण्यासाठी

जात असत.

रामेश्वराच्या शिवमंदिराचे प्रमुख पुजारी, लक्ष्मणशास्त्री आणि त्यांचे वडील एकमेकांचे चांगले मित्र होते.

अब्दुल कलाम यांचे वडील सांगत असत की, ''प्रत्येक माणूस स्वतंत्रपणे दुसऱ्यापासून वेगळा असतो. तरीही त्या सर्वांना बांधणारा एक दैवी अंश प्रत्येकात असतो. कितीही संकटे आली, दुःखे भोगावी लागली तरी माणसाने धीर सोडू नये.''

अब्दुल कलाम हे आठ वर्षांचे असताना १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यावेळी त्यांनी काम करून आयुष्यातील पहिली कमाई केली. त्या कमाईचा अभिमान आजही त्यांच्या मनातून ओसंडून वाहत असतो. बालपणी त्यांचे तीन जीवश्चकंठश्च मित्र होते. रामनाथ शास्त्री, अरविंदन आणि शिवप्रकाशन. श्री. इयादुराई सालोमन एक आदर्श शिक्षक होते. १९५० मध्ये अब्दुल कलाम यांनी त्रिचीच्या सेंट जोसेफ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथेही त्यांना रेव्हरंड फादर टी. एन. सिक्वेरा व सेट जोसेफ हे गुरू म्हणून लाभले. कॉलेजच्या शेवटच्या वर्षात त्यांना साहित्याची गोडी लागली. टॉलस्टॉय, हार्डी, स्कॉट हे त्यांचे आवडते लेखक होते. फिजिक्स हा त्यांचा आवडीचा विषय होता.

अब्दुल कलाम इंटरच्या परीक्षेनंतर अभियांत्रिकीकडे वळू शकले असते, पण त्यांना काहीच पूर्वकल्पना नव्हती. बी. एस्सी.नंतरच्या शिक्षणासाठी त्यांनी मद्रासच्या सुप्रसिद्ध अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी संपूर्ण भारतात मद्रास इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे सर्वोत्तम अभियांत्रिकी कॉलेज होते. एक हजार रुपये फी भरण्यासाठी त्यांच्या वडिलांकडे पैसे नव्हते. अशा वेळी त्यांची बहीण त्यांच्या पाठीशी उभी राहिली. तिने आपले सर्व दागिने गहाण ठेवून पैसे उभे केले. ते पाहून कलाम हेलावून गेले. त्याच वेळी त्यांनी शपथ घेतली की 'मी माझ्या स्वकमाईतून बहिणीला तिचे सर्व दागिने

माझ्या कमाईतून तिला परत देईन.'

एम.आय.टी. (मद्रास इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी)च्या प्रांगणात युद्धात निकामी झालेली काही विमाने ठेवली होती. विद्यार्थ्यांना विमानाचे वेगवेगळे भाग अभ्यासता यावेत, हा उद्देश त्या मागे होता. त्यांच्या एमआयटीमधल्या चार वर्षांच्या शिक्षणकाळात तीन प्राध्यापकांनी त्यांच्या अभ्यासाला वेगळी दिशा दिली. प्राध्यापक स्पॉडर त्यांना एअरोडायनॉमिक्स शिकवायचे. ते मूळचे ऑस्ट्रियन होते. आणि एरॉनॉटिकल इंजिनिअरिंगचा त्यांना अनुभव होता. दुसऱ्या महायुद्धात ते नाझींचे कैदी म्हणून काही काळ बंदिवान होते.

पुढे अब्दुल कलाम हिंदुस्थान एरॉनॉटिकल लिमिटेड या बँगलोरमधील संस्थेत प्रशिक्षणासाठी रुजू झाले. विमानांची देखभाल करणाऱ्या, त्यांना काटेकोरपणे सुस्थितीत ठेवणाऱ्या टीममध्ये त्यांचा समावेश झाला. १९५८ साली तंत्रज्ञान केंद्र 'सिव्हिल ॲव्हिएशन' या ठिकाणी त्यांची प्रथम नेमणूक करण्यात आली.

नंतर अमेरिकेत व्हर्जिनिया प्रांतांत हॅपटन येथे असलेल्या लॅगले मध्ये रिसर्च करण्यासाठी त्यांना पाठविण्यात आले. तेथेच त्यांनी 'नासा'चे प्रशिक्षण पूर्ण केले.

२१ नोव्हेंबर १९६३ रोजी भारताने आपले पहिले अंतराळयान अवकाशात सोडले. हे 'नाइके अपाची' यान नासामध्ये बनवण्यात आले होते. त्याचवेळी स्वतःची रॉकेट्स स्वतःच बनवायची असे अब्दुल कलाम यांनी ठरवले. हळूहळू थुंबा येथे त्यांनी दोन प्रकारची रॉकेट्स तयार केली. रोहिणी आणि मेनका. २० नोव्हेंबर १९६७ला रोहिणी-७५ चे उड्डाण यशस्वी झाले.

व्हॉन बाऊन यांच्या मार्गदर्शनाखाली 'नोर्थाऊझेन' येथील जमिनीखालच्या प्रचंड विस्ताराच्या कारखान्यात एप्रिल ते ऑक्टोबर १९४४या कालावधीत क्षेपणास्त्रे बनवली गेली.

२७ जुलै १९८३ रोजी आय.जी.एम.डी.पी.चे रीतसर उद्घाटन

केले. एल.एल.व्ही-३च्या साहाय्याने ‘रोहिणी’चे उड्डाण झाले. हा दिवस त्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा दिवस होता. १९ जुलै १९८४ रोजी श्रीमती इंदिरा गांधी त्यांच्या भेटीसाठी आल्या होत्या.

१५ ऑक्टोबर १९९१ला कलामना साठ वर्षे पूर्ण झाली. निवृत्त झाल्यावर त्यांनी गुणवान मुलांसाठी शाळा काढायचे ठरवले. विद्यापीठाच्या अतिथीगृहात राहून ते विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाचा लाभ देत राहिले. पुढे त्यांना राष्ट्रपती म्हणून निवडण्यात आले. तेव्हा देशभर संचार करून त्यांनी विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्व तरुणांच्या मनावर बिंबवले आणि २०२०मध्ये भारत ही एक महासत्ता व्हावी म्हणून संदेश दिला.

*ते आहे या थोर भूमितील एक विहीर*
*तिच्या लाखो करोडो मुलामुलीकडे पाहतो आहे*
*त्यांनी माझ्यातून काहीतरी घ्यावे,*
*कधीही न संपणारे देवत्व*
*आणि सर्वदूर पसरावी, त्याची कृपा*
*जसे विहिरीतून काढलेले पाणी*

कोणत्याही देशाला वाढण्यासाठी, विकासासाठी आर्थिक सुबत्तेच्या बरोबरीने बलशाली संरक्षणव्यवस्थेची जरूरी असते.

आपल्या देशाच्या समोरील यापुढचे ध्येय ‘संरक्षण साधनसामग्रीमध्ये स्वयंपूर्णता’ असे आहे. स्वयंपूर्णता प्रकल्प आणि तंत्रज्ञान दृष्टी २०२० या दोन प्रकल्पामुळे देश बलशाली, संपन्न आणि विकसित बनू शकेल. तेव्हा अब्दुल कलाम यांचे योगदान आठवत राहिल.

कल्याणी कैलास मेमाणे
इ. ७ वी, तु. रायगड
सौ. विमलाबाई गरवारे शाळा,पुणे.

# माझा आवडता उद्योजक
## प्रकाश आपटे

इ.८ ते १० वी गट - **प्रथम क्रमांक**

*''धरित्रीच्या कुशीमधी*
*बीयबियानं निजली*
*वऱ्हे पसरली माटी*
*जशी शाल पांघरली''*

शेतकरी जिचा उल्लेख 'काळी आई' असा करतो, ती जमीन ही जगातील अशी संपत्ती आहे, की जी वाढत नाही आहे तेवढीच राहते. आपल्या देशात तर शेतकऱ्यांकडं असणारी ती एकमेव मालमत्ता आहे. तिचं जतन आणि संवर्धन करणं सगळयांच्याच हिताचं आहे. कायद्याप्रमाणे कॉर्पोरेट क्षेत्राला शेतजमीन विकत घेण्याचा अधिकार नाही, ही गोष्ट अत्यंत योग्य आहे असे स्पष्ट मत प्रकाश आपटे यांनी व्यक्त केले आहे.

आपले विचार कोणताही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने मांडताना प्रकाश आपटे कधीही बोटचेपेपणा करत नाहीत.

भारतातल्या शेतीक्षेत्रात काम करणारा जो कॉर्पोरेट सेक्टर आहे, त्यामध्ये पहिल्या काही नावामध्ये 'सिन्जेंटा' कंपनीचा उल्लेख आवर्जून केला जातो. मुख्यतः बियाण्यांची निर्मिती आणि विक्री करणारी ही कंपनी आहे. भाज्या, फुलं, कापूस अशा विविध प्रकारची झाडे चारशे उन्नत वाणांची बियाणं ही कंपनी तयार करते आणि विकते. कपंनीची भारतातील वार्षिक उलाढाल तब्बल एक हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. त्यामुध्ये दोनशे पन्नास कोटी रुपयांची निर्यात दरवर्षी होते.

खरं तर आपटेंचा शेतीशी अर्थाअर्थी काही संबंध नाही. त्यांचं शिक्षण इंजिनिअरींग आणि व्यवस्थापन क्षेत्रातलं. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात लार्सन ॲन्ड टुब्रो या कंपनीपासून झालेली असली तरी पुढे 'सिबा' कंपनीमध्ये काम सुरू केल्यावर त्यांना खऱ्या अर्थाने अनेक क्षेत्रांचा आणि कामांचा अनुभव घेता आला. केवळ भारतामधीलच नाही तर जपान-जर्मनी-अमेरिका अशा अनेक देशांमधील कंपन्यांबरोबर त्यांना व्यवहार करता आला. त्या त्या देशामधल्या कॉर्पोरेट क्षेत्राच्या कामाच्या पद्धतीचा अंदाज आला.

'सिबा' कंपनीची पुढं वेगवेगळ्या कंपन्यांबरोबर मर्जर्स किंवा कोलॅबरेन्स होत राहिली. कधीही दोन कंपन्या जेव्हा एकमेकांत विलीन होतात तेव्हा तेव्हा एका कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरला बाजूला व्हावे लागते. आपल्यामधील क्षमताच इतक्या ताकदीच्या होत्या की, आजवरच्या क्रमांमध्ये प्रत्येक वेळेला त्यांचं पद शाबूत राहिलं आणि करीअरची एक एक पायरी ते वर चढत राहिले. त्यातलीच आणखी वरची पायरी म्हणजे सध्या ते सिन्जेंटा कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट क्षेत्र आणि सामान्य शेतकरी यांच्यामधला दुवा म्हणून काम करायला आता सिन्जेंटाने स्वतःपासून सुरुवात केली आहे. कंपनीच्या आजवरच्या कामाला हे नवीन आणि प्रभावी वळण आहे. या देशाच्या शेतीच्या समस्या लक्षात घेता या प्रयत्नांना असलेल्या मर्यादांची जाणीव प्रकाश आपटे यांना आहे. पण अशा अनेक कंपन्यांनी आपापल्या परीने प्रयत्न केले तर, काही प्रमाणात बदल घडू शकेल असा विश्वास त्यांना वाटतो. त्यामागची कल्पना आणि पुढाकार आपटे यांचाच आहे. यापुढच्या काळात शेती क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांचे योगदान वाढणार आहे. अशा काळात त्यांच्याशी वाटाघाटी करून आपला योग्य वाटा पदरात पाडून घेण्याइतकी क्षमता सामान्य शेतकऱ्यात नाही. ती क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण

होईपर्यंत त्याला मदतीची गरज लागणार आहे. ही मदत आपटे यांची टीम करत आहे. इथल्या शेतीमध्ये वर्षानुवर्षे काम करत असल्यामुळे या टीममार्फत अनेक शेतकऱ्यांशी संपर्क साधण्यात आलेला आहे. त्यांचा उल्लेख 'सिन्जेंटा शेतकरी' असा केला जातो.

मालाचं योग्य मार्केटिंग, एक्सपोर्ट आणि उरलेल्या मालाचं प्रोसेसिंग असे तीन ठोस पर्याय समोर ठेवून काम केलं तर शेतकऱ्यांचं आज होणारं नुकसान टळू शकेल. कारण मार्केटिंगसाठी सध्या सर्वांत मोठा पर्याय तयार झाला आहे, तो म्हणजे शहरामधल्या मॉल्सच्या साखळीचा. त्यामुळे या मॉल्सना कोणत्या प्रकारच्या भाज्या, फळं, फुलं आणि धान्य लागतं, यांचं प्रशिक्षण शेतकऱ्यांना द्यायला सिन्जेंटाने सुरुवात केली आहे.

मध्यस्थी-दलाल यांच्याशी तुलना केली तर मॉल्स हा पर्याय कधीही चांगला आहे. ''सध्या जर बाजारात टोमॅटो पंचवीस रुपये किलो मिळत असतील तर शेतकऱ्यांच्या हातात त्यातले पाच रुपये पडतात.'' मधले वीस रुपये घेणारे लोक त्या मालामध्ये काहीच व्हॅल्यू ॲडिशन करत नाहीत. त्या मालाचा बाजारात भाव वाढावा म्हणून काही करण्यापेक्षा आपल्या खिशात जास्त पैसे कसे पडतील एवढाच विचार करतात असे आपटे यांचे मत आहे.

कंपनीचे प्रमुख म्हणून आपटे मुंबईत मुख्यालयामध्ये बसत असले तरी तथाकथित कॉर्पोरेट शैलीमध्ये ते काम करीत नाहीत. केवळ सहकाऱ्यांनी पाठवलेले अहवाल लॅपटॉपवर वाचून जमिनीवरच्या वास्तवाचा नेमका अंदाज येत नाही अस त्यांना वाटत. त्यामुळे वेगवेगळया राज्यांमध्ये ग्रामीण आणि दुर्गम भागात प्रत्यक्ष शेतावर जाण्यावर त्यांचा भर असतो. पेरण्यांच्या मोसमाच्या काळात तर महिन्यातले वीस दिवस ते कोणत्या ना कोणत्या शेतात असतात. तिथे ते शेतकऱ्यांशी चर्चा करतात. आपल्या बियाण्यांविषयीची त्यांची प्रतिकूल मतेही ऐकून घेतात. त्यातूनच ते कंपनीच्या धोरणाची

दिशा ठरवतात.

'कृषी शक्ती केंद्र' हा आपटे यांच्या कल्पनेतून साकारलेला आणखी एक उपक्रम होय. अशा केंद्रांची उभारणी संपूर्ण देशात होत असून पुणे जिल्ह्यात 'मंचर' इथं त्यातलं पहिलं केंद्र सुरू झाले आहे. शेतकऱ्यांना प्रशिक्षणातून शक्ती देणारी ही केंद्रे आहेत. त्या ठिकाणी शेतीविषयक ग्रंथालय, प्रदर्शन आणि इंटरनेटची सुविधा आहे. एकूणच शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या क्षेत्रात 'शक्ती' प्राप्त करून देणारं, डोळस बनवणारं असं हे केंद्र आहे. या केंद्रात आणखी बऱ्याच उपक्रमांची भर पडणार आहे.

भारतात अनेक वर्षे काम केल्यानंतर एशिया-पॅसिफिकची जबाबदारी कंपनीने त्यांना देऊ केली होती. त्यामुळे अधिक व्यापक क्षेत्रात काम करता आलं असतं. पण ती त्यांनी नम्रपणे नाकारली, कारण आपली बुद्धी, अनुभव आणि श्रम आपल्या देशासाठी वापरताना जी आत्मीयता वाटते ती इतर देशांबद्दल वाटणं शक्य नाही.

एकूणच प्रकाश आपटे यांची शेती व शेतकऱ्यांविषयीची तळमळ ही वरवरची नाही. स्वतःच्या विचारांतून व प्रत्यक्ष कार्यातून एक सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

प्रकाश आपटे हे शेतकऱ्यांना मदत करतात. त्यासाठी त्यांनी 'कृषी शक्ती केंद्र' हा उपक्रम सुरू केला आहे. म्हणून सर्वांना मदत करणारे उद्योजक प्रकाश आपटे हे मला खूप आवडतात.

**''यांच्यासारख्या व्यक्तींची भारताच्या प्रगतीसाठी मोठी गरज आहे.''**

**शुभम शरद जगताप**
लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ४

## संस्मिता गुप्ते

प्राणी, पक्षी, खेळणी आणि जादू हे विषय सगळ्याच मुलांना आवडतात. या पुस्तकात या सगळ्याच विषयांवरच्या मजेदार गोष्टी आहेत.
या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळण्यांची मजा तर आहेच, पण त्यातून चांगलं कसं वागावं हेही कळतं. आपल्या आजूबाजूच्या गोष्टींची काळजी घ्यावी, दुसऱ्यांना मदत करावी, कोणालाही त्रास देऊ नये अशा अनेक गोष्टी या 'मजेदार गोष्टी'तून शिकायला मिळतात. या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळणीसुद्धा बोलतात, त्यामुळे या सगळ्या गोष्टी खऱ्या अर्थाने 'मजेदार' झाल्या आहेत.

**किंमत प्रत्येकी ५०रु. | एकत्रित पोस्टेज ४० रु.**











## अरुंधती महाम्बरे

छोट्टे-मोठ्ठे, प्राणी-पक्षी रुसवा-फुगवा, भांडण-मैत्री सारं काही
तुमच्यासारखं तिथेच जाऊन पहायला हवं चटकन् चला,
पाहूया गंमत दोस्तांना दाखवू जंगल जंमत...






**किंमत प्रत्येकी ५०रु.**
**एकत्रित पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**


'फ्रँकलिन' कासवाच्या
धमाल गोष्टींची मालिका
आता मराठीत!
मूळ लेखिका
पोलेत बूर्ज्वा
अनुवाद
मंजूषा आमडेकर
किंमत प्रत्येकी ५०रु.
एकत्रित पोस्टेज ४०रु.

# The Secret Seven द सीक्रेट सेव्हन

धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत



**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.

एकत्रित पोस्टेज ४० रु.

# चित्र रंगवा




## सुविचार

**आत्मविश्वास ही यशाची गुरूकिल्ली**

# ओळखा पाहू



मराठीतील एक नामवंत
समीक्षक

विजेत्यास रु. १०१ चे रोख
पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ मार्च २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल एप्रिल २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

**प्रायोजक**
श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

## सभासदांना सूचना

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता,फोन नंबर लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%  तीन वर्षांना २५%  पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**


**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'सभेत कसे बोलावे'**
लेखक : श्याम भुर्के
हे ६० रु.चे
पुस्तक भेट!

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'धुमारे'**
लेखिका : माधवी देसाई
हे ७० रु.चे
पुस्तक भेट!





**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 February 2010

**आगामी**

किरणजीत अहलुवालियाची कहाणी तशी भयानक आणि धक्कादायक असली तरी तिचा शेवट मात्र आश्वासक आहे. अतिशय कठीण परिस्थितीतही जगण्याची दुर्दम्य इच्छा आणि आशावाद यांचं ज्वलंत उदाहरण म्हणजेच ही जीवनगाथा!




# सर्कल ऑफ लाइट

सर्कल
ऑफ लाइट

**किरणजीत अहलुवालिया, राहिला गुप्ता**

अनुवाद : उषा महाजन

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________

____________________

____________________

____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.